लव्ह जिहादच्या संशयातून तरुणाची धुलाई
वाचा पान ३ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१। अंक : ६७। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+६=१४ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प



राष्ट्राची प्रगती व अवनती समाजातील गुण-दोषांमुळे होत असते. राष्ट्र वैभवसंपन्न करायचे असेल तर प्रगतीला बाधक असे दोष दूर करावे लागतील. अशी पद्धती समाजाची असली पाहिजे.

**सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### अर्जित गर्ग सर्वांत तरुण सेबी रिसर्च ॲनालिस्ट

**नवी दिल्ली :** वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी अर्जित राजीव गर्ग हे अधिकृतपणे सेबीचे नोंदणीकृत रिसर्च ॲनालिस्ट झाले आहेत. ते भारतातील



सर्वांत तरुण व्यावसायिकांपैकी एक आहेत. ही उपलब्धी आर्थिक नियमनात्मक व्यवस्थेत अतिशय मोलाची मानली जाते. अर्जित यांनी ॲमिटी युनिव्हर्सिटी नोएडा येथून बीबीए केले असून, त्यांच्याकडे एनआयएसएम सीरिज एक्सव्ही प्रमाणपत्रही आहे. भांडवली बाजारातील व्यावसायिकांसाठी हे प्रमाणपत्र गरजेचे असते. किशोरावस्थेतच सुरू झालेला त्यांचा वित्तीय आवडीचा प्रवास आणि अखंड परिश्रमामुळे ते कमी वयात या पदाला पोहोचले आहेत.

# मोदींची शेतकऱ्यांना दिवाळीची बम्पर भेट

## ३५,४४० कोटी रुपयांच्या दोन महत्त्वाकांक्षी योजनांची घोषणा

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी दिवाळीची भेट म्हणून ३५,४४० कोटी रुपयांचे दोन पॅकेज जाहीर केले. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना आणि राष्ट्रीय डाळ आत्मनिर्भर मिशन अशा दोन महत्त्वाकांक्षी योजनांची मोदी यांनी घोषणा केली.

भारतरत्न लोकनायक जयप्रकाश नारायण आणि भारतरत्न नानाजी देशमुख या दोन महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधत मोदी यांनी आज भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या एका कार्यक्रमात देशातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांची घोषणा केली. हे दोन्ही सुपुत्र ग्रामीण भारताचा आवाज, देशातील लोकशाही क्रांतीचे प्रणेते होते. दोघांनीही आपले संपूर्ण जीवन शेतकरी आणि देशातील गोरगरीब नागरिकांच्या कल्याणासाठी समर्पित केले होते, असे मोदी यांनी म्हटले.

**कृषी धन-धान्य योजना २४ हजार कोटींची**

१०० जिल्ह्यांत राबवली जाणारी पंतप्रधान कृषी धनधान्य योजना २४ हजार कोटी रुपयांची आहे. यामुळे देशातील कृषी उत्पादनात वाढ होणार आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही भर पडणार आहे. त्याबरोबर देशातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान लागू होणार आहे, असे मोदी म्हणाले.



**धनधान्य कृषी योजनेची उद्दिष्ट्ये**

- कृषी उत्पादनात वाढ करणे
- शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करणे
- सिंचनाच्या सुविधा वाढवणे
- पीकरचनेत विविधता आणणे

**३,६५० कोटींची कृषी आधारभूत निधी योजना**

शेतकऱ्यांच्या विविधांगी गरजा लक्षात घेत ३६५० कोटी रुपयांची कृषी आधारभूत निधी योजनाही मोदी यांनी आज जाहीर केली. यातून धान्याची साठवण करण्यासाठी गोदामांची, मालवाहतुकीची तसेच अन्न प्रक्रिया उद्योगांची सुविधा विकसित केली जाणार आहे.

**राष्ट्रीय डाळ आत्मनिर्भर योजना सहा वर्षांसाठी**

राष्ट्रीय डाळी आत्मनिर्भर मिशन ही योजना देशात सहा वर्षांसाठी राबवली जाणार असून, देशातील शेतकऱ्यांना डाळ लागवडीसाठी प्रोत्साहित करीत डाळींचे उत्पादन वाढवत डाळींच्या आयातीपासून देशाची सुटका करणे हा योजनेचा उद्देश आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

**पशुपालनासाठी १,१६६ कोटींची योजना**

पशुपालन क्षेत्रासाठी ११६६ कोटी रुपयांची एक योजनाही मोदी यांनी जाहीर केली. देशातील दुग्धउत्पादन वाढावे, या योजनेमागचा उद्देश आहे. मत्स्यपालन क्षेत्रासाठी ६९३ कोटी रुपयांची एक योजनाही मोदी यांनी आज जाहीर केली. अन्न प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी ८०० कोटी रुपयांची आणखी एका योजनेचीही मोदी यांनी आज घोषणा केली.

## रिलायन्स पॉवरच्या ‘सीएफओ’ला अटक

**नवी दिल्ली :** उद्योजक अनिल अंबानी यांच्या समूहातील रिलायन्स पॉवर कंपनीच्या मुख्य वित्तीय अधिकाऱ्याला ६८ कोटी रुपयांची बनावट बँक हमी दिल्याच्या संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने अटक केली, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी शनिवारी दिली.

तपास यंत्रणेने चौकशी केल्यानंतर अशोक पाल यांना शुक्रवारी रात्री बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत अटक करण्यात आली. शनिवारी त्याला विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्याला दोन दिवस ईडीच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. ईडीची कोठडी वाढवून घेण्यासाठी तपास यंत्रणा त्याला १३ ऑक्टोबर रोजी पुन्हा न्यायालयासमोर हजर करेल असे सूत्रांनी सांगितले. हे प्रकरण रिलायन्स पॉवरची उपकंपनी असलेल्या रिलायन्स एनयू बेस लिमिटेडच्या वतीने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ला (एसईसीआय) सादर केलेल्या ६८.२ कोटी रुपयांच्या बँक हमीशी संबंधित आहे. ही बँक हमी बनावट असल्याचे आढळले. ही कंपनी औपचारिकपणे महाराष्ट्र एनर्जी जनरेशन लि. या नावाने ओळखली जाते. व्यावसायिक गटांना बनावट बँक हमी देण्यासाठी चालवणाऱ्या आरोपी कंपनीची ओळख ईडीने ओडिशातील बिस्वाल ट्रेडलिंक म्हणून दिली आहे. ईडीने कंपनी आणि तिच्या संचालकांच्या विरोधात ऑगस्टमध्ये छापेमारी करीत त्याचा व्यवस्थापकीय संचालक पार्थसारथी बिस्वालला अटक केली होती.

# चीनच्या उत्पादनांवर अमेरिकेत शंभर टक्के शुल्क

## दुर्मिळ खनिजांची निर्यात रोखल्याने ट्रम्प संतप्त

## १ नोव्हेंबरपासून एकूण १३० टक्के शुल्क लागणार

◆ **वॉशिंग्टन, ११ ऑक्टोबर**

दुर्मिळ खनिजांची अमेरिकेला करण्यात येणारी निर्यात रोखल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनच्या सरसकट उत्पादनांवर १०० टक्के व्यापार शुल्क लादण्याची घोषणा शनिवारी केली. १ नोव्हेंबरपासून अतिरिक्त १०० टक्के आणि पूर्वीचे ३० टक्के असे एकूण १३० टक्के शुल्क चीनच्या वस्तूंवर लागणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

चीनने शुक्रवारी अमेरिकेच्या मालवाहू जहाजांवर अतिरिक्त शुल्क लादण्याची घोषणा केल्याच्या काही तासांतच प्रत्युत्तर म्हणून ट्रम्प यांनी चीनला लक्ष्य करीत नव्याने शुल्क लादण्याची घोषणा केली. ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, दुर्मिळ खनिजांची निर्यात रोखून चीन अधिकाधिक आक्रमक होत आहे. संगणक चिप्स, लेजर, जेट इंजिन आणि इतर तंत्रज्ञानात वापरल्या जाणाऱ्या धातू आणि चुंबकांवर ते निर्बंध घालत आहे. यामुळे व्यापार संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. अनेक देशांनी आमच्याशी संपर्क साधला आणि यावर उपाययोजना करण्याची विनंती केली. चीनच्या व्यापार धोरणाला प्रत्युत्तर म्हणून त्यांच्या उत्पादनांवर १ नोव्हेंबर २०२५ पासून अमेरिकेत शंभर टक्के अतिरिक्त आणि पूर्वीचे ३० टक्के असे एकूण १३० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीकोनातून हा निर्णय घेण्यात आला.



**अमेरिकेत उत्पादित चिनी मालावर बंधने**

ट्रम्प यांनी म्हटले की, अमेरिकेत येणाऱ्या चिनी वस्तूंशिवाय अमेरिकेत चिनी कंपन्यांकडून तयार करण्यात येणारे सॉफ्टवेअर आणि इतर वस्तूंवर कठोर नियंत्रणे आणण्याची योजना आहे. याशिवाय अमेरिकेत तयार होणाऱ्या आणि त्यांची निर्यात करण्यात येणाऱ्या चिनी वस्तूंवर बंधने लादणार येईल. चीनच्या अटी-शर्तींच्या व्यापार धोरणाने जागतिक बाजारपेठेत असमतोल निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**जिनपिंग यांच्यासोबतची बैठक रद्द**

ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले की, दक्षिण कोरिया येथे होणाऱ्या एपीईसी शिखर परिषदेत मी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेणार होतो. पण आता असे करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. चीनच्या धोरणाला अमेरिका कठोरपणे प्रत्युत्तर देईल. त्यांनी दुर्मिळ खनिजांच्या निर्यातीवरील निर्बंध उठविल्यानंतर जिनपिंग यांच्याशी चर्चा केली जाईल.

## मायक्रोसॉफ्टमध्ये नोकरी करताहेत ऋषी सुनक

**लंडन :** ब्रिटनचे माजी पंतप्रधान आणि नारायण मूर्ती यांचे जावई ऋषी सुनक आता नोकरी करीत आहेत. ऋषी सुनक यांनी आता जागतिक स्तरावरील दोन मोठ्या कंपन्यांमध्ये वरिष्ठ सल्लागार म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे. यात अमेरिकेची टेक दिग्गज कंपनी मायक्रोसॉफ्ट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आघाडीचे स्टार्टअप अँथ्रॉपिकचा समावेश आहे. स्वतः सुनक यांनी आपल्या लिंक्डइन पोस्टमध्ये ही माहिती दिली.






## थोडक्यात महत्त्वाचे...

### 'एक भारत-आत्मनिर्भर भारत' कार्यक्रम बामखेडा महाविद्यालयात उत्साहात

**शहादा :** ग्रामविकास संस्था संचलित बामखेडा त. त. (ता. शहादा) येथील कला व विज्ञान महाविद्यालयात 'एक भारत-आत्मनिर्भर भारत' कार्यक्रम घेण्यात आला. केंद्रीय युवक कार्यक्रम, क्रीडा मंत्रालय (नवी दिल्ली), महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित् हा कार्यक्रम घेण्यात आला. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. वाय. सी. गावित यांनी प्रास्ताविकात एकात्म भारत निर्मितीसाठी सरदार पटेल यांची भूमिका कोणत्या प्रकारची होती, हे स्पष्ट केले. प्रमुख वक्ते प्रा. एम. एस. निकुंभे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचे नेतृत्व कौशल्य आणि राष्ट्रीय एकतेसाठी किती कटिबद्ध होते याविषयी विविध ऐतिहासिक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. यानंतर विद्यार्थ्यांना एकता व आत्मनिर्भरतेची शपथ दिली. प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग विभागातर्फे कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले.

### जिल्ह्यात रस्ता अपघातामध्ये ११ जण जखमी

**जळगाव :** वेगवेगळ्या रस्ता अपघाताच्या घटनेत शनिवारी (११ ऑक्टोबर) ११ जण जखमी झाले. जखमीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राजु पटेल (वय ४६,रा. किनगाव), गोपाल शिवा पाटील (वय २८,रा.रावेर), भगवान न्यारसिंग बारेला (वय ४०, नरवाडे), महेद्र पवार (वय ३१,रा.खोटेनगर), मनोज मणक झा (वय ३५,रा. सालाबरिहार चौतारस राज्य बिहार), हितेश रामसिंग शिरसाठ (वय २३,रा.बाभोंरी), अंजली सुनील बारेला (वय ८), सुनील प्रकाश बारेला (वय ३०), गणेश बारेला (वय १०), सुरेश सत्तरसिंग बारेला (वय ३०) तसेच विजय संझार बारेला (वय ३०, सर्व रा.एरंडोल) यांचा जखमीमध्ये समावेश आहे.जखमींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

### शिरपूरला भाजपतर्फे पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान

**शिरपूर :** भाजप शहर युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी संदीप चंद्रकांत माळी, तर



शहर महिला आघाडी अध्यक्षपदी डॉ. जयश्री मनोज निकम यांची नियुक्ती करण्यात आली. माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, भाजपचे शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते जनक विला येथे पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल आदींनी स्वागत केले.

## निधन वार्ता



### डॉ. उषा जगताप

**जळगाव :** येथील जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध डॉ. उषा नारायण जगताप (वय ८४) यांचे ११ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांनी जळगावातील अनेक सेवाभावी संस्थांमध्ये आपली सेवा दिली होती. चिन्मय मिशन परिवाराच्या त्या शेवटपर्यंत सक्रिय सदस्य होत्या. जळगाव येथील आयुर्वेद प्रसारक मंडळाच्या अनेक वर्षे अध्यक्ष होत्या. संपूर्ण खान्देशमधूनच नाही तर मध्यप्रदेश, गुजराथमधून त्यांच्याकडे रुग्ण येत असत. अनेक मोफत शिबिरे त्या वर्षभर घेत असत, तर चिन्मय मिशनतर्फे मोफत दवाखाना त्या आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात चालवत असत. त्या शमा सराफ , उमा पशीने व ऑब्लिकॉमचे प्रसाद नारायण जगताप यांच्या आई, तर अजिंक्य अर्णव, क्षितीज, आयुष, राधा जगताप यांच्या आजी होत.



### निर्मलाबाई गरुड; आज अंत्ययात्रा

**शेंदुर्णी :** येथील रहिवासी निर्मलाबाई श्रीराम गरुड (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने शनिवारी (११ ऑक्टोबर) दुपारी पाऊणच्या सुमारास निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवारी (१२ ऑक्टोबर) सकाळी नऊला श्रीराम मंदिराजवळील राहत्या घरापासून निघेल. त्यांच्या पश्चात तीन मुली, अरुण व अशोक हे दोन मुले, सुना नातवंडे, असा परिवार आहे.



### मैनाबाई पाटील

**न्हावी (ता. यावल) :** येथील सदाशिवनगर भागातील रहिवासी मैनाबाई पुरुषोत्तम पाटील (वय ९१, मू. रा. वडोदा) यांचे शनिवारी (११ ऑक्टोबर) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, दोन मुली, जावई, नातवंडे, पतवंडे, असा परिवार आहे. लीलाधर, विष्णू, रघुनाथ पाटील यांच्या त्या मातोश्री होत.



### दत्तात्रय विसपुते

**जळगाव :** शहरातील रामानंदनगर पोलिस चौकीजवळील रहिवासी दत्तात्रय रामदासशेठ विसपुते (वय ४८) यांचे अल्प आजाराने शनिवारी (११ ऑक्टोबर) सकाळी सहाच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, मोठे भाऊ, पुतणे, असा परिवार आहे. वेदांत विसपुते यांचे वडील, तर रमेश विसपुते यांचे ते लहान भाऊ होत.



### उज्ज्वला पाठक

**जळगाव :** शहरातील शिरसोली रस्त्यावरील विनोबानगर भागातील रहिवासी उज्ज्वला दिनकर पाठक (वय ८०) यांचे शनिवारी (११ ऑक्टोबर) पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. पाळधी येथील ग्रामसेवक दीपक पाठक यांच्या मातोश्री त्या होत.



### तुषार भोळे

**जळगाव :** शहरातील श्रीनिवास कॉलनीतील रहिवासी तुषार ज्ञानदेव भोळे (वय ४८) यांचे शुक्रवारी (१० ऑक्टोबर) दुपारी साडेतीनच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे.



### कथ्थू पाटील

**शहादा :** अलखेड (ता. शहादा) येथील रहिवासी कथ्थू विठ्ठल पाटील (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नात, नातवंडे, नातजावई, असा परिवार आहे. सातपुडा साखर कारखान्याचे निवृत्त कर्मचारी राजाराम पाटील, प्रगतिशील शेतकरी भरत पाटील यांचे ते वडील होत.

# आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अक्कलकुव्यात भाजपच्या बैठकीत चर्चा

## तालुक्यातील काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**तळोदा, ११ ऑक्टोबर**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. विजयकुमार गावित व माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्या नेतृत्वात वाण्याविहीर, अक्कलकुवा, मोरंबा, देवमोगरा, खापर या पाच गटातील ग्रामपंचायतनिहाय बैठकांच्या नियोजनासाठी अक्कलकुवा येथील कुबेर पार्कमधील भाजप कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीत काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य किरसिंग वसावे, प्रताप वसावे, खापरचे उपसरपंच विनोद कामे यांनी मार्गदर्शन केले. बैठकीला मंडळ अध्यक्ष तथा सरपंच आकाश वसावे, पंचायत समितीचे माजी सदस्य ॲड. सुधीर पाडवी,



ज्येष्ठ कार्यकर्ते अनिल पाडवी, राजमोईची माजी सरपंच जयमल पाडवी, अलिविहीरचे माजी सरपंच किसन पाडवी, नाला येथील सरपंच भूपेंद्र पाडवी, भाबलपूरचे उपसरपंच हर्शद वसावे, खटवाणीचे उपसरपंच जगदीश वसावे, कडवामहूचे उपसरपंच सुरेश पाडवी, जयपाल वसावे, गणपत पाडवी, उरशा नाईक, सरपंच नरेश पाडवी, दिलवरसिंग नाईक, उमेश पाडवी, हिरालाल वळवी, बाबूराव तडवी, सुभाष पाडवी, मनोज पाडवी, भूषण पाडवी, वैभव पाडवी, यशवा दुलजी पाडवी, सागर कालूसिंग पाडवी (सिगपूर बुद्रुक), रविकांत पाडवी, मनोज गावित, अमरदीप पाडवी, हिरालाल पाडवी, अमरसिंग नाईक यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश

यावेळी आमदार डॉ. विजयकुमार गावित, माजी खासदार डॉ. हिना गावित, माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत कंकाळा येथील माजी सरपंच अविनाश देवराम पाडवी, ग्रामपंचायत सदस्य अर्जुन भरतसिंग पाडवी, विनेश गोण्या पाडवी, नितेश जेमा पाडवी, केशवराव सिगा पाडवी, धमा मांगा पाडवी, सुनील जेता पाडवी, गजेंद्र दौलतसिंग पाडवी, मोहन दौलतसिंग पाडवी या प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. राजमोईचे माजी सरपंच जयमल पाडवी, मौलीपाडा येथील माजी सरपंच किसन नाईक, नाला येथील सरपंच भूपेंद्र पाडवी, भाबलपूरचे उपसरपंच हर्शद वसावे, सुभाष पाडवी, उरशा नाईक, रविकांत पाडवी, भूषण पाडवी, अमरदीप पाडवी, मनोज पाडवी उपस्थित होते.

# हुतात्मा श्रीकांत लिंगायत यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात कार्यक्रम

**जळगाव :** हुतात्मा श्रीकांत लिंगायत जयंतीनिमित्त रविवारी (१२ ऑक्टोबर) पुण्यात विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. 'संघ समजून घेताना' या विषयावर माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी मार्गदर्शन करतील.

माजी खासदार ज्येष्ठ विचारवंत प्रदीप रावत आणि श्रीकांत लिंगायत यांच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांची विशेष उपस्थिती असेल. हुतात्मा श्रीकांत लिंगायत स्मृती समिती, (कै.) श्रीकांत लिंगायत मेमोरिअल ट्रस्ट, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विवेक विचार मंच, राजे शिवराय प्रतिष्ठान आणि सकल हिंदू समाज यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले आहे.

श्रीकांतची हत्या अशाप्रकारची पहिली अथवा शेवटची घटना नाही श्रीकांतच्या हत्येमागील वृत्ती आजही आपल्याला दिसते. नुपूर शर्मा प्रकरणात कन्हैयालाल आणि उमेश कोल्हे यांची निर्घृण हत्या असो किंवा पेहेलगाम येथे धर्म विचारून ठार मारण्यात आलेले आपले बांधव असोत. या घटना आजही आपला सर्वसमावेशक संस्कृती, लोकशाही आणि संविधानासमोरील गंभीर आव्हानांची आठवण करून देतात. म्हणून संघ शताब्दी साजरी करताना श्रीकांतसारख्या हिंदू बलिदानी वीरांचे स्मरण करण्याची गरज आहे.

### कोण आहे श्रीकांत लिंगायत?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शंभरी गाठली. पण, हा प्रवास सोपा नव्हता. याकरिता अनेक स्वयंसेवकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यापैकी एक म्हणजे पुण्यातील श्रीकांत लिंगायत. १९७५ मध्ये संविधानासाठी आणीबाणीच्या विरोधात आंदोलन केल्याने श्रीकांतने मिसा कायद्याखाली १९ महिने तुरुंगवास भोगला. तुरुंगातून सुटल्यावर त्याने आणीबाणीमुळे बंद पडलेली पुण्यातील लष्कर भागातील शिवजयंती मिरवणूक पुन्हा सुरू केली. संघ कार्यात स्वतःला झोकून दिले. मात्र २६ जानेवारी १९८२ संध्याकाळी धर्मांध मुसलमानांनी श्रीकांतवर धारदार शस्त्राने हल्ला केला. १५ मार्च १९८२ रोजी त्याने अखेरचा श्वास घेतला. यावेळी त्याचे वय होते फक्त २६ वर्ष. तत्कालीन सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी श्रीकांतच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

# चोरट्यांचा धुमाकूळ ; एका रात्रीत तीन घरात डल्ला

## डांभुर्णी येथे ग्रामस्थांमध्ये भीती : यावल पोलिसात गुन्हा

**जळगाव :** एका रात्रीत तीन ठिकाणी चोरट्यांनी डल्ला मारला. डांभुर्णी ता.यावल येथे या घटना गुरुवारी (९ ऑक्टोबर) उघडकीस आल्या. याप्रकरणी शुक्रवारी (११ ऑक्टोबर) यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रकाश भिका कोळी (वय ५२.रा. उंटावद रोड डांभुर्णी) हे दुध विक्री करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.गुरुवारी मध्यरात्री चोरट्याने त्यांच्या घराचा दरवाजा उघडुन आत प्रवेश केला. लोखंडी कपाटातील सामान अस्तव्यस्त करत आतील लॉकरचे लॉक तोडले. त्यात ठेवलेली ३१ हजाराची रोकड घेत पोबारा केला. त्यानंतर चोरट्यानी अनिल भिवा न्हावी यांच्या घराकडे मोर्चा वळविला. त्यांच्या घराच्या दरवाजाला लावलेले कुलुप तोडुन आत प्रवेश केला. शोकेसचे मधील सामान अस्तव्यस्त करत मुद्देमालाचा शोध घेतला. आतील लॉक तोडुन त्यात ठेवलेली २७ हजाराची रोकड चोरुन चोरटे पसार झाले.

या परिसरातील बापु मुरलीधर कोळी यांच्या घराच्या खिडकीच्या विटा काढत चोरट्यांनी आतमध्ये एन्ट्री केली. धान्याच्या लोखंडी कोठीत ठेवलेले १२ हजाराची रोकड असा एकुण ७० हजाराचा मुद्देमाल घेत चोरटे फरार झाले.हा प्रकार गुरुवारी उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी प्रकाश कोळी यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांनी डांभुर्णी येथे जावुन पाहणी करत प्रकार जाणुन घेतला. हवालदार संदीप सुर्यवंशी हे तपास करीत आहेत.

### पं. स. सभापतिपदासाठी उद्या आरक्षण सोडत

**नंदुरबार :** जिल्ह्यातील आगामी पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर गठीत होणाऱ्या पंचायत समित्यांमधील पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी असणारे सभापतिपद अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आले असून, या आरक्षणाची सोडत सोमवारी (१३ ऑक्टोबर) दुपारी बाराला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बिरसा मुंडा सभागृहात काढण्यात येणार आहे. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील सदस्यांनी आणि नागरिकांनी सोडतीच्या सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) प्रमोद भामरे यांनी केले आहे.






# धनधान्य कृषी योजना, कडधान्य आत्मनिर्भरतेचा प्रारंभ

## कोळदा येथे कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांचे दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन

**नंदुरबार :** केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने शनिवारी (११ ऑक्टोबर) पुसा (नवी दिल्ली) येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना व कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाचा प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमात त्यांनी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना व कडधान्य आत्मनिर्भरता मिशन, कृषी अवसंरचना, पशुपालन, मत्स्यपालन, अन्नप्रक्रिया आदी क्षेत्रात ११०० पेक्षा जास्त योजनांचा प्रारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पाडला. यावेळी पंतप्रधानांनी आयात कमी करून निर्यात वाढविणे. जेणेकरून भारत आत्मनिर्भर होण्यासाठी मदत होईल. त्यासाठीच शेतकऱ्यांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी शेतकरी आत्मनिर्भर होण्यासाठी केंद्र सरकार व पंतप्रधान करीत असलेले प्रयत्न व त्यासाठी नवनवीन योजना याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात कृषी राज्यमंत्री भगीरथ चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कोळदा येथे कृषी विज्ञान केंद्रात करण्यात आले. या वेळी प्रधानमंत्री

धनधान्य कृषी योजना व कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाचा प्रारंभ या कार्यक्रमासोबत रब्बी पीक परिसंवाद घेण्यात आला. डॉ. हेडगेवार सेवा समितीचे अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले अध्यक्षस्थानी होते. आमदार डॉ. विजयकुमार गावित, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ आर. एस. दहातोंडे, दीपक पटेल, तालुका कृषि अधिकारी एस. एस. राजपूत, कृषी उपसंचालक राऊत आदी प्रमुख पाहुणे होते.

श्री. दहातोंडे यांनी प्रास्ताविकात, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनवाढीचे आवाहन केले. त्यांनी कृषी विज्ञान केंद्रातील विविध प्रकल्पांचा

जिल्ह्यातील पीक उत्पादनवाढीवर असलेला प्रभाव सांगितला. आमदार डॉ. गावित यांनी विविध पिकांतील उत्पादनवाढीसाठी शासन करीत असलेले प्रयत्न व शेतकऱ्यांचे निव्वळ नफा वाढीसाठी शासनाच्या विविध योजना मांडल्या. यासाठी शेतकऱ्यांनीही नवनवीन तंत्रज्ञान शिकून घेण्याची मानसिकता ठेवण्याचे आवाहन केले.

श्री. कवडीवाले यांनी जमिनीचे बिघडलेले आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना राबविण्याचे आणि शेतीतील निविष्ठांचा खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याचे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून शेतकरी व मुक्त कृषी शिक्षण केंद्रातील विद्यार्थी उपस्थित होते. पी. सी. कुंदे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

### रब्बी पीक परिसंवादात शेतकऱ्यांना मार्गदर्शन

कार्यक्रमादरम्यान आयोजित रब्बी पीक परिसंवादात कृषी विज्ञान केंद्राचे कृषी विद्यावेत्ता यू. डी. पाटील यांनी नैसर्गिक शेती व त्यात समाविष्ट निविष्ठा याबद्दल मार्गदर्शन करून रब्बी हंगामातील पिकांसाठी नैसर्गिक शेती कशी करता येईल, याची माहिती दिली. पीक संरक्षणतज्ज्ञ पी. सी. कुंदे यांनी रब्बी पीक व्यवस्थापनावर मार्गदर्शन करताना रब्बीतील विविध पिकांसाठी बीजप्रक्रिया, रोग व कीड व्यवस्थापन याबद्दल माहिती दिली. उद्यानविद्यातज्ज्ञ डॉ. वैभव गुरवे यांनी भाजीपाला लागवडीविषयी मार्गदर्शन केले. उपकृषी अधिकारी करणसिंग गिरासे यांनी एआय महाविस्तार ॲपबद्दल सांगून प्रचलित योजनांची माहिती दिली.

# परमपूज्य टेंबे स्वामी महाराज प्रबोधिनीतर्फे संस्कृत, पाली साहित्य अधिवेशनास प्रारंभ

### इटाली खेडा येथे गुरू-शिष्य संवादावर आज मार्गदर्शन

**जळगाव, ११ ऑक्टोबर**

परमपूज्य श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज प्रबोधिनी व महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालयाचा प्राकृत विभाग, कला-संस्कृती विभाग (बडोदा) यांच्यातर्फे इटाली खेडा, (जि. सलुम्बर, राजस्थान) येथील परमपूज्य परमहंस स्वामी सुगंधेश्वरानंदजी राजयोगी प्रभूबा संचलित एकता ध्यान योग सेवा ट्रस्टच्या काशी शिवपुरी आश्रम शिवशक्ती सिद्धपीठात २१ वे संस्कृत व पाली साहित्य अधिवेशन होत असून, रविवारी (१२ ऑक्टोबर) गुरू-शिष्य संवादावर मार्गदर्शनपर कार्यक्रम होणार आहे.

दोनदिवसीय साहित्य अधिवेशनास डॉ. माधव प्रपन्नाचार्य युवराज स्वामी श्री रामानुज (कोट, उज्जैन) यांच्यासह भक्तगणांचा सहभाग आहे. अधिवेशनात शनिवारी (११ ऑक्टोबर) सकाळी उद्घाटन प्रतिमापूजन, वेदघोष, दत्तात्रय प्रार्थना, स्वागतपर भाषण झाले. डॉ. श्वेता जेजूरकर, विश्वस्त तथा प्रबोधिनी अध्यक्ष प्रा. भालचंद्र भणगे, कुलपती महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालय (बडोदा), स्वामी हृदयानंद (काशी शिवपुरी आश्रम शिवशक्ती सिद्धपीठ, इटाली खेडा), नितीन देशपांडे (विश्वस्त तथा प्रबोधिनी), परमपूज्य परमहंस राजयोगी प्रभूबा यांच्या हस्ते विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. स्वामी गुरू राजेश्वरानंद (काशी शिवपुरी आश्रम शिवशक्ती सिद्धपीठ, इटाली खेडा), डॉ. माधव प्रपन्नाचार्य युवराज स्वामी श्री रामानुज (कोट- उज्जैन), प्रा. मनोहरलाल कालरा (माजी कुलगुरू, कोटा), डॉ. प्रदीप तराणेकर (अध्यक्ष, प्रबोधिनी) यांची उद्घाटन सत्रास उपस्थिती होती. प्रा. कल्पना गवळी (अधिष्ठाता, कला-संस्कृती विभाग, महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालय, बडोदा), हरिभक्त परायण समीर ओझे (पनवेल), धनंजय शास्त्री वैद्य (मुंबई), प्रा. नितीन शर्मा (मोहनलाल सुखडिया विद्यापीठ, उदयपूर), डॉ. प्रपिी तराणेकर, डॉ. श्रुती त्रिवेदी (बडोदा), स्नेहा शिनखेडे (नागपूर), प्रकाश पुजारी (पुणे), डॉ. मोहन तगारे (येवला), प्रा. श्रीकृष्ण जुगनू (उदयपूर) आदींनी मार्गदर्शन केले.

अधिवेशनात रविवारी (१२ ऑक्टोबर) गुरू-शिष्य संवादावर डॉ. वैभवी देहूकर (बडोदा), परमपूज्य श्रीमद वासुदेवानंद सरस्वती, डॉ. जया सागडे, डॉ. दक्षा वाघेला, चिराग प्रजापती, डॉ. विपुल पटेल, डॉ. मनीषा पाठक, डॉ. श्वेता जेजूरकर, नितीन देशपांडे (गरुडेश्वर दत्त संस्थान), मितवा जोशी, नीता अग्निहोत्री, ज्ञानेश्वर नेवारे (नागपूर), प्रा. नीरज शर्मा (मोहनलाल सुखडिया विद्यापीठ, उदयपूर), तर दुसऱ्या सत्रात जेनी चौहान, ऋचा पंचाक्षरी, मानसी पटेल, दीक्षिता दल, हेत्वी भट्ट, आकांक्षा परमार, नंदिनी हिराणी, हरिप्रसाद तिवारी, डॉ. खेमचंद शर्मा, रमा नेयोपाने, डॉ. निधी चौधरी. डॉ. विश्वनाथ जेना, डॉ. कुंजन आचार्य (मोहनलाल सुखडिया विद्यापीठ, उदयपूर), डॉ. प्रदीप तराणेकर, प्रभूबा सुगंधेश्वरानंद आदींच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले जाणार आहे. अधिवेशनास उपस्थिती द्यावी, असे आवाहन परमपूज्य वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. प्रदीप तराणेकर, विश्वस्त तथा प्रबोधिनी अध्यक्षा डॉ. श्वेता जेजूरकर, विश्वस्त सीए संदीप राहुलकर, विश्वस्त सीएस नितीन देशपांडे यांनी केले आहे.

# शहाद्यात किराणा दुकानातून गुटखा जप्त; एकाला अटक

**शहादा, ११ ऑक्टोबर**

राज्यात प्रतिबंधित असलेला विमल गुटखा, तंबाखू आणि पानमसाल्याची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने माल बाळगणाऱ्या एकाला शहादा पोलिसांनी रंगेहाथ पकडले. कारवाईत पोलिसांनी १५ हजार १०२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, एकाविरुद्ध अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४ ऑक्टोबरला शहादा पोलिस ठाण्याचे दीपक विठ्ठल चौधरी यांना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांनी पाडळदा रस्त्यावरील तिखोरा गावातील पद्मावती किराणा दुकानात छापा टाकला. या वेळी पोलिसांनी अमित ऊर्फ छोटू दगा राजपूत (वय ३८, रा. तिखोरा, ता. शहादा, जि. नंदुरबार) याला ताब्यात घेतले. तो महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेली सुगंधित तंबाखू, विमल गुटखा, पानमसाला व इतर पानमसाला अवैधरीत्या बाळगून चोरटी विक्री करण्याच्या तयारीत होता. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून १५ हजार १०२ रुपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त केला. यामध्ये ६९ केसरयुक्त विमल पानमसाल्याची पाकिटे आणि ६० तंबाखूची पाकिटे यांचा समावेश आहे.

शहादा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी निरीक्षक नीलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. उपनिरीक्षक प्रदीपसिंग राजपूत तपास करीत आहेत.

विकणे आहे
१४८, आदर्श नगर, जळगाव येथील ३ बी.एच.के. रो-हाऊस (१४०० स्के.फीट प्लॉट, १४०० स्के.फीट बांधकाम ) सर्वसोयी सुविधांयुक्त, विकणे आहे.
संपर्क - ९८८१५७९१६७, ९४२२२१५६७४

CLASSIFIEDS

11th 12th CA & B.Com
All Subject Under One Roof
Accounts - CA Dinesh Lodha
Maths -Prof. Smita Sharma
Eco -CA CS Sneha Lodaya
OCM & SP - CA Rakhi & Adv. Aniket
3 Students Scored 100
PARSHWANATH COMMERCE ACADEMY
Near M. J. College, jalgaon
Mob - 8149-666-339

तरुण भारत'तर्फे लवकरच ज्येष्ठ नागरिक मंच
राष्ट्रीय विचारांच्या 'जळगाव तरुण भारत'तर्फे लवकरच 'ज्येष्ठ नागरिक मंच'ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करावी.
संपर्क - ९७६४९०३७०१

"Exchange Rate Minimum 5,000/-*"
धुलिया सायकल कंपनी
८२३७३५६१५९, ९४२३९७७१९४, ९४२३९७५३९२
आता सायकल ०% डाऊनपेमेंटवर उपलब्ध
प्लॉट नं. २१, सीटीएस-७१५४, सर्वे नं. २४७/ए/३ हॉटेल सायली जवळ, स्टेट बँक ऑफ इंडिया (एडीबी ग्रामीण शाखा) च्या खाली, रिंग रोड, जळगाव

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
भारतात प्रथम क्रमांकावर असलेले बिर्लांचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप
ZENITH-BIRLA LIGHT
ZENITH-BIRLA MEDIUM
ZENITH-BIRLA HEAVY
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

महाराष्ट्र चे सुप्रसिध्द ज्योतिषी १५० वर्षाची परंपरा असलेले
श्रीभृगूज्योतिषकेंद्र
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरुपी समाधान. जिथं समस्या आहेत, तिथ "निराकरण" ही आहे । गरज आहे, ती योग्य मार्ग दर्शनाची । समस्या, चिंता, निराशा, सोडा, एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा. मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्ने (खडे), मंत्रसिध्दसर्व यंत्र (अनुभव हिच खात्री) दादावाडी जळगाव
मो.९८२२७७४१५१,९८२३०४७८११

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी–८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४–२०२६.
■ फोन : ०२५७ – २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com



## महत्त्वाचे

### नाभिक हितवर्धक संघाची जळगावात गुरुवारी बैठक

**जळगाव** : शहर श्री संत सेना नाभिक हितवर्धक संघाची बैठक गुरुवारी (१६ ऑक्टोबर) दुपारी साडेचारला संत गाडगे बाबा उद्यानात होणार आहे. बैठकीत मागील सभेचे इतिवृत्त वाचणे, लेखापरीक्षण अहवाल, २० ऑगस्टला झालेल्या श्री संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळाचा जमा-खर्च, महिला मंडळ व युवा संघटना स्थापना करणे, तसेच वीरभाई कोतवाल यांच्या चौक व पुण्यतिथी यांसह आयत्या वेळेच्या विषयावर चर्चामंथन करणार आहे. बैठकीला श्री संत सेना नाभिक हितवर्धक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दीड लाखाची भांडी घेत चोरटा फरार

**जळगाव** : विक्रीसाठी ठेवलेली सुमारे १ लाख ४९ हजार १५० रुपयांची घरगुती भांडी चोरट्याने चोरुन नेली. शहरात मायादेवी मंदिरासमोर हतनूर कॉलनीत ही घटना घडली. याप्रकरणी शुक्रवारी (१० ऑक्टोबर) रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे तसेच रामानंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांनी घटनास्थळी जावुन माहिती घेतली. अविनाश बबन रंधे (वय ४५, रा. गौरी अपार्टमेंट, रायसोनीनगर) यांनी घरगुती भांडी विक्रीसाठी हतनूर कॉलनी क्लॉस ४५ क्वॉटर ब्लॉक नं.१४ येथे ठेवली होती. चोरट्याने ही भांडी चोरुन नेली. हा प्रकार २८ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २५ दरम्यान घडला. या प्रकरणी दाखल गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक सचिन रनशेवरे हे करीत आहेत.

### बंद घर फोडुन लाखाचा मुद्देमाल लंपास

**जळगाव** : मुख्य दरवाजाचा कडीकोयंडा तोडुन चोरट्याने घरात एन्ट्री केली. कपाटातील सामान अस्ताव्यस्त करत सोनेचांदीचे दागिने तसेच रोकड असा सुमारे ९७ हजाराचा मुद्देमाल घेत चोरटा फरार झाला. शुक्रवारी (१० ऑक्टोबर) पहाटे पाच वाजेच्या सुमारास ही घटना शहरातील बिबानगरात हनुमान मंदिराजवळ उघडकीस आली. प्राजक्ता संजय तायडे (वय २८, रा. बिबानगर, जळगाव) यांचे बंद घर होते. ही संधी हेरत चोरट्याने बंद दरवाजाचा कडीकोयंडा तोडत घरात प्रवेश केला. घरातील सामान अस्ताव्यस्त करत किमती मुद्देमालाचा शोध घेतला. सुमारे ६० हजार किमतीचे दहा ग्रॅम सोन्याची चैन, चार हजार किमतीचे अर्धा ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या तीन अंगठ्या, दोन हजार किमतीचे चांदीचे कडे तसेच १९ हजार रुपये रोकड असा मुद्देमाल लंपास केला. या प्रकरणी तक्रारीनुसार जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक फौजदार शामकुमार मोरे हे तपास करीत आहेत.

### घराबाहेर गेलेले गृहस्थ बेपत्ता

**जळगाव** : थोड्या वेळ बाहेर जावुन येतो, असे कुटुंबियांना सांगुन घराबाहेर पडलेले ३९ वर्षीय गृहस्थ बेपत्ता झाले. बुधवारी (८ ऑक्टोबर) सकाळी आठ वाजेच्या सुमारास ही घटना शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी तक्रारीनुसार गुरुवारी (९ ऑक्टोबर) शहर पोलिसात मिसिंग दाखल करण्यात आली. हवालदार प्रदीप पाटील हे तपास करीत आहेत.




गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध

संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९



अंकासाठी संपर्क

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२३३४५५५० ९६२३६०४७१२


# लव्ह जिहादच्या संशयातून तरुणाची धुलाई

## संतप्त जमावाने पेटविली मोपेड : मोहाडी रस्त्यावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑक्टोबर**

बाहेर गावाहून हिंदू मुलीला सोबत फिरण्यासाठी संशयित मुस्लिम तरुणाने आणले. हा लव जिहादसारखा प्रकार असल्याच्या संशयावरुन जमावाने त्याला बेदम मारहाण केली. संतप्त जमावाने त्याची मोपेड पेटवुन दिली. शनिवारी (११ ऑक्टोबर) दुपारी ही घटना मोहाडी रोडवर पेट्रोलपंपाजवळ घडली. एमआयडीसी तसेच रामानंदनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संशयित तरुण तसेच मुलीला पोलीस ठाण्यात नेले. जाळपोळप्रकरणी काही



तरुणांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार बाहेर गावाहुन आलेल्या संशयित मुस्लिम तरुणाने अन्य बाहेर गावातून हिंदू मुलीला सोबत शहरात आणले. त्यानंतर मोपेडवरुन ते दोघे मोहाडी रोडवरील लांडोरखोरी उद्यानात नेले. येथे ते बराच वेळ एकांतात वावरले. मोपेडने मुलगी आणि संशयित तरुण उद्यानाकडून शहराकडे निघाले. पेट्रोलपंपाच्या पुढे रस्त्याच्याकडेला मोपेड लावुन हा तरुण एका दुकानावर खाद्य पदार्थ घेण्यासाठी आला. याठिकाणी काही जणांनी दोघांची विचारपूस केली असता संशयित तरुणाने अरेराविची भाषा केली. त्यानंतर हा लव जिहादचा संशय बळावला. गर्दीतील तरुणांनी संशयिताला मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच त्याची मोपेड पेटविली. एमआयडीसी पोलिसांनी परिसरात घटनेबद्दल प्रकार जाणुन घेण्याचा प्रयत्न केला.

खबर कळताच रामानंदनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. एमआयडीसी पोलिसही धावुन आले. पोलिसांनी संशयित तरुणाला उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. दरम्यान परिसरात दिवसभर ही घटना चर्चेचा विषय ठरली.

**सीसीटीव्ही प्रणालीची गरज**

मोहाडी रोडवरील उद्यान परिसरात सीसीटीव्ही प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी, अशी मागणी या घटनेनंतर परिसरातून करण्यात आली.

# अर्धवेळ स्त्री परिचारिकांना दिवाळीपूर्वी मानधन मिळणार

## जि.प. सीईओंच्या निर्देशानंतर कार्यवाहीला गती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑक्टोबर**

अर्धवेळ स्त्री परिचारिकांच्या मानधनाबाबत जिल्हा परिषद आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे की, शासनाकडून निधीची उपलब्धता न झाल्यामुळे सप्टेंबर महिन्याचे मानधन जमा होऊ शकलेले नाही, मात्र आता निधी उपलब्ध करून देण्याची तजवीज करण्यात आली असून दिवाळीपूर्वी सप्टेंबर महिन्याचे मानधन वितरित करण्यात येईल.ऑक्टोबर महिन्याचे मानधनही त्याचबरोबर देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांनी दिली.

अर्धवेळ स्त्री परिचारिकांनी आपली मागणी मांडण्यासाठी जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढला होता. या मोर्चासोबतच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या विषयाची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागाला आवश्यक निधी उपलब्ध करून मानधन वितरणाची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अर्धवेळ स्त्री परिचारिकांना दिलासा मिळणार असून, त्यांच्या सेवाभावाला आणि कामातील प्रेरणेला नवी ऊर्जा मिळेल, असे आरोग्य विभागाने कळविले आहे

# भरतनाट्यम, शास्त्रीय समुहनृत्याचा कलाविष्कार

## आज पारितोषिक वितरण; अभिनेत्री केतकी माटेगावकर येणार

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ११ ऑक्टोबर**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड मॅनेजमेंट, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन युवारंग युवक महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सकाळ सत्रात विद्यार्थी कलावंतांनी भारतीय संगीत, नाट्य, शास्त्रीय व समुहनृत्यांचा कलाविष्कार सादर केला. यामुळे युवारंगाच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संस्कृतीचे रंग भरले गेल्याने प्रेक्षकांमध्येही आनंदोत्सव होता. तसेच बेल्जीयम येथील विद्यार्थ्याने देखील युवारंगात जल्लोष केला.

जी.एच.रायसोनी महाविद्यालयाच्या प्रांगणात ९ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या युवारंग युवक महोत्सवाच्या तिसऱ्या



दिवशी सकाळी रंगमंच क्र. १ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय सभागृहात भारतीय लोक समुहनृत्य ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत 'केसरीया बालमा आओ पधारो मारे देश,' 'रून झुन बाजे पुखराज,' 'ताहू की गोमेल,' 'घेरू-घेरू,' 'मारा देशारा दिल,' 'सोना आहुती में काय काय,' 'घागर घुमु दे,' 'रामा पावा वाजू दे,' 'आरारारा रंगीलो मारो ढोलना,' 'वेसावसी पारू नेसली गे नेसली,' 'विठूचा गजर हरी नामाचा झेंडा रोवीला,' 'आईच्या नावाचा गोंधळ मांडीला' अशा विविध समुहनृत्याद्वारे राजस्थानी, गुजराथी, कोळी नृत्य, आदिवासी पारंपरिक वेशभुषा परिधान करीत आदिवासी नृत्य, खान्देशी, गोंधळ, दिंडी पारंपरिक वेशभुषा परिधान करून प्रत्येक सहभागी स्पर्धक अतिशय तन्मयतेने आपली कला सादर करताना दिसून येत होता. एकूण २२ महाविद्यालयांच्या संघांनी यात सहभाग घेतला. विविध रंगमंचावर युवारंगचे स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, कार्याध्यक्ष अॅड. नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिसभा सदस्य प्रा. संदिप नेरकर, प्रा. मंदा गावीत, स्वप्नाली काळे, दीपक पाटील, ऋषिकेश चित्तम, नेहा जोशी, प्राचार्य एस.एन.भारंबे, डॉ. प्रिती अग्रवाल, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, डॉ. संजय शेखावत, प्रा. राम भावसार, आदींनी युवारंग युवक महोत्सवाच्या रंगमंचावर भेटी देत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

**आज पारितोषिक वितरण**

या युवक महोत्सवातील गेल्या चार दिवसात झालेल्या विविध कला, सांस्कृतीक स्पर्धेतील विजेत्यांना कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली समारंभात पालकमंत्री गुलाबराव पाटील, ना.संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, सिनेकलावंत केतकी माटेगावकर, आमदार सुरेश भोळे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण रविवारी १२ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

# परिवहन निवृत्त कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी मोर्चा

**जळगाव** : राज्य परिवहन महामंडळातील निवृत्त अभियंते आणि कर्मचारी यांना वेतनफरक, थकबाकी व वाढीव पेन्शन यासह प्रलंबित लाभ तातडीने देण्यात यावेत, या मागणीसाठी सोमवार (१३ ऑक्टोबर ) रोजी 'राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना, जळगाव' तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे सचिव सुरेश चांगरे व उपाध्यक्ष योगराज पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सन २०१६ ते २०२० दरम्यान परिवहन मंत्र्यांनी कर्मचाऱ्यांसाठी जाहीर केलेल्या वेतनवाढीची, घरभाडे भत्त्याची आणि इतर सुविधा लागू करण्यात आलेल्या नाहीत. त्या काळात ३ टक्के वाढ देण्याचे जाहीर झाले असताना केवळ २ टक्के वाढच मंजूर करण्यात आली. तसेच घरभाडे भत्ता २० टक्क्यांवरून फक्त ७ टक्केच ठेवण्यात आला, असा आरोप संघटनेने केला आहे. तसेच २०२० मध्ये जाहीर झालेली ६५०० रुपयांची वेतनवाढ आजतागायत लागू करण्यात आलेली नाही, तर अनेक कर्मचारी निवृत्त किंवा निधन पावले आहेत. त्यांच्या थकबाकी रकमा व वाढीव पेन्शनचा लाभ न मिळाल्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्यांचे आर्थिक हाल होत आहेत. ईपीएफओ अंतर्गत वाढीव पेन्शन मंजूर करण्याची मागणी देखील प्रलंबित असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. महामंडळाकडून वारंवार आश्वासने दिली जात असूनही प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजी आहे. शासनाने लवकर निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल, असा इशारा संघटनेने दिला. पत्रकार परिषदेला सुरेश चांगरे, योगराज पाटील, पांडुरंग महाजन, अशोक गाढे, विलास पाटील, संजय सूर्यवंशी, अरुण साळुंखे, सुधीर पाटील, भगवान ब्रम्हे, बशीर खान, दीपक सोनवणे, सुनील बडगुजर, रामभाऊ सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अनुभूती विद्यानिकेतनमध्ये आज दिवाळी मेळा

**जळगाव** : अनुभूती विद्या निकेतन आणि अनुभूती बाल निकेतनद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जातात. अनुभूती उद्यमिता कार्यक्रमाच्या अंतर्गत रविवारी १२ ऑक्टोबर रोजी 'दिवाळी मेळा २०२५' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी जैन इरिगेशन अध्यक्ष अशोक जैन, उपाध्यक्ष अनिल जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन, अतुल जैन आणि जैन कुटुंबियांची उपस्थिती असणार आहे. मेळ्यात मॉन्टेसरी आणि इयत्ता १ चे विद्यार्थी स्वतः तयार केलेले अन्न पदार्थ, कला आणि हस्तकला उत्पादने सादर करतील. या सर्व तयारी आणि व्यवस्थापनात त्यांना पालकांची साथ लाभणार आहे. 'दिवाळी मेळा २०२५' कार्यक्रम १२ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ४:०० ते ७:०० वाजे दरम्यान होणार आहे. या उपक्रमाचा उद्देश मुलांमध्ये वित्तीय साक्षरता, सर्जनशीलता आणि उद्यमशील विचारसरणीला प्रोत्साहन देणे आहे.



# ऑटोरिक्षा चालक राज्यभर चक्का जाम आंदोलन करणार

**जळगाव** : विविध मागण्यांच्या पूर्तीसाठी राज्यातील ऑटो रिक्षा चालकांनी राज्यभर चक्का जाम आंदोलन करण्याचा ऑटो रिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समितीने निर्णय घेतला आहे.

शनिवारी (४ ऑक्टोबर) ऑटोरिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समितीची राज्यव्यापी बैठक मुंबई येथे ठाकूरव्दार येथील मुंबई टॅक्सी रिक्षा चालक युनियनच्या सभागृहात कृती समितीचे अध्यक्ष शशांक राव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी समितीचे सरचिटणीस विलास भालेकर, कार्याध्यक्ष प्रल्हाद सोनवणे (खान्देश विभाग),मारूती कोंडे (मुंबई विभाग), अहमद बाबा (मराठवाडा विभाग), सल्लागार शंकर साळवी, प्रवक्ता इमरान पठाण व्यासपीठावर उपस्थित होते. खान्देशात हे आंदोलन जळगाव येथे होणार असून विभागीय स्तरावर टप्पानिहाय आंदोलन करण्यात येईल.

**अशा आहेत मागण्या**

स्व. आनंद दिघे ऑटो रिक्षा व मिटर टॅक्सी कल्याणकारी मंडळातील त्रुटी दूर व्हाव्यात, महामंडळाची सदस्यत्व फि रद्द करून लाभ स्पष्ट करावा, छुप्या पद्धतीने फोटो काढून चलन पाठवण्याची पद्धत बंद व्हावी, गुन्हा झाला तरच चलन करण्यात यावे, पूर्वीचे सर्व चलन रद्द करण्यात यावे, राज्य ई बाईक टॅक्सी परवानगी रद्द करण्यात यावी, शहरातील ई बाईक व ई रिक्षा वाहतूक नियम ानुसार करण्यात यावी यासह अन्य मागण्यांकडे संघटनेने लक्ष वेधले आहे.

यावेळी विजय पाटील, प्रकाश साखरे, राहूल वारे, सिताराम तामाणी, ओमिन शेख, किशन मिरेकर, नाना वैद्य, अजय रामटेके, निजामुद्दीन शेख, ज्ञानेश्वर कोळी, श्रीरंग जाधव, नामदेव जगताप, रंजना चव्हाण, महमद म ोसिन, प्रमोद वाणी, किशोर खरताडे, किरण गवळी, तसलीम खान, फकिरा चव्हाण, भूषण वाणी, पद्मनाभ गिते, सतीश वाघमारे यांच्यासह राज्यातील विविध संघटनेचे अध्यक्ष पदाधिकारी व रिक्षा चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुकानातून रोकड चोरुन पसार होणाऱ्या संशयिताच्या स्टेशनवर आवळल्या मुसक्या

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑक्टोबर**

दुकानाच्या शटरचे कुलूप तोडुन गल्ल्यातील सुमारे ५५ हजार २०० रुपयांची रोकड चोरट्यांनी चोरुन नेली. शहरातील शाहुनगर परिसरातील बद्री विशाल अॅन्ड जे.के. पान मंदिर याठिकाणी ही घटना गुरुवारी (९ ऑक्टोबर) सकाळी उघडकीस आली. ही रोकडसह पसार होण्याच्या तयारीत असलेल्या संशयिताला शहर पोलिसांनी रेल्वे स्टेशनवर शुक्रवारी अटक केली.

विशाल कैलास शेळके (वय ३६, रा. शाहुनगर, जळगाव) यांच्या मालकीचे जे. के. पान सेंटर नावाचे दुकान आहे. बंद दुकानाचे कुलुप तोडुन संशयिताने दुकानात प्रवेश केला. दुकानाच्या गल्ल्यातील रुपये ५५ हजार २०० रुपये रोकड लंपास केली. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे तसेच पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांनी धाव घेत प्रकार जाणुन घेतला. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान शहर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत तपासाला गती दिली. संशयित पसार होण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळताच शहर पोलिसांच्या पथकाने रेल्वे स्टेशन येथे शोध मोहिमेतून दगडुबा मुकुंदा बोर्डे (वय ३८,रा. पेरजापूर, ता.भोकरदन) याला अटक केली. जळगाव शहरासह इतरत्र चोरी केली असून त्याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात १३ गुन्हे दाखल असल्याचे तपासातून समोर आले. संशयिताचे अजुन साथीदार किंवा कसे? या अनुषंगाने पोलिसांनी तपास सुरू केला असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

# ग्रामपंचायत मासिक सभेत राडा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,११ ऑक्टोबर :**

नंदगाव ग्रामपंचायतीची मासिक सभा सुरू होती. या सभेत बेकायदेशीर प्रवेश करत व्यायाम शाळेसाठी जागा देण्याच्या कारणावरुन सहा सात जणांनी हुज्जत घातली. सरपंच, उपसरपंच आणि एका सदस्याला अश्लील शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार घडला. ही घटना ३० सप्टेंबर रोजी सकाळी दहा ते अकरा वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी तक्रारीनुसार सात जणांवर तालुका पोलीस ठाण्यात शुक्रवारी (१० ऑक्टोबर) गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीत गैरकायद्याची मंडळी जमवून सभेत त्रास दिला. तसेच अपमानास्पदरित्या वर्तन करत धमकाविले असे नमूद केले आहे. त्यानुसार स्वप्निल सोनवणे, कल्पेश सोनवणे, जितेंद्र बाविस्कर यांच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार दीपक चौधरी हे तपास करीत आहेत.

# सर्पदंश होऊन तब्बल नऊ जण अत्यवस्थ

**जळगाव** : सर्पदंशाच्या वेगवेगळ्या घटनेत तब्बल नऊ जणांना विषबाधा होऊन प्रकृती अत्यवस्थ झाली. शनिवारी (११ ऑक्टोबर) बाधितांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले.

बाधित झालेल्या रुग्णांमध्ये देवानंद गजानन सपकाळे (वय २५, रा. किनगाव), नरेंद्र तुकाराम चिंचोरे (वय ४८, रा. म्हसावद), मनिषा राजेंद्र देवरे (वय ३५,रा.बोरनार), राजेंद्र धना पाटील (वय ४७, शेंदुर्णी), सागर उमाकांत जोशी (वय ३०,रा. विवेकानंदनगर), कैलास अभिमन्यू बाऊस्कर (वय ६०,रा.पहुर कसबे) तसेच प्रभुलाल अर्जुन धनगर (वय ५८,रा. शिंदाड) यांचा समावेश आहे. रुग्णांची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.



# बेवारस रुग्णाला उपचाराअंती पाठविले सुखरूप घरी

## 'जीएमसी'च्या वैद्यकीय पथकाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,११ ऑक्टोबर :**

६० वर्षीय अनोळखी इसमाला अत्यवस्थ अवस्थेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याच्या सोबत कोणीच नातेवाईक जवळ नव्हते. मात्र तेथील डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर नियमित उपचार केले. रुग्ण पूर्ण बरा झाल्यानंतर समाजसेवक इसाक बागवान यांच्या मदतीने त्यांना अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांच्या उपस्थितीत सुखरूप घरी रवाना करण्यात आले. यशवंत पुंजा सपकाळे (वय ६० वर्ष, रा. पिंप्री ता. यावल) हे आजारी असल्याने उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे दाखल झाले होते. दाखल झाल्यापासून संबंधित रुग्णाचे नातेवाईक कोणीही आले नाही. तथापि रुग्णालयाने रुग्णावर योग्य प्रकारे उपचार करून त्यांच्या गावी पाठवण्यात आले. रुग्णास रुग्णालयातून अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांच्या उपस्थितीत डिस्चार्ज देण्यात आला. यावेळी उप वैद्यकीय अधीक्षक इम्रान पठाण, समाजसेवा अधीक्षक अनिल ठाकरे, बी. एस. पाटील, समाजसेवक इसाक बागवान, आरोग्य कर्मचारी शकील पठाण इत्यादी उपस्थित होते.

या घटनेचे उपस्थित साक्षीदार असलेल्या अन्य रुग्णांच्या नातेवाईकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. रुग्णांच्या प्रती आपुलकीचा भाव कर्मचाऱ्यांमध्ये दिसत आहे, अशी भावनाही व्यक्त झाली.

# वर्सी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी पंचामृत स्नान

## देशभरातील सिंधी भाविकांचा महोत्सवात सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑक्टोबर**

वर्सी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात पंचामृत स्नानाने करण्यात आली. देशभरातील भाविक वर्सी महोत्सवासाठी जळगावात दाखल झाले असून भक्तीमय वातावरणात त्यांनी सहभागी होत संतांचे दर्शन घेतले.

सिंधी समाज बांधवाचा वर्सी महोत्सवाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. शनिवारी दुसऱ्या दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात समाजबांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत ५१ भाविकांनी रक्तदान केले. तसेच 'जय बाबा महिला मंडळातर्फे मोहाडी रस्त्यावरील संत बाबा गेलाराम उद्यानात भजनाचा कार्यक्रम उत्साहात



पार पडला. रायपुरच्या अम्मा चोले वारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

**देशभरातील संत जळगावात**

वर्सी महोत्सवासाठी उल्हासनगर, पुणे, पिंप्री, सोलापूर, सांगली, सातारा, मिरज, नाशिक, चाळीसगाव, भुसावळ, खामगाव, बोदवड, अमरावती, अकोला, यवतमाळ, दुर्ग, भिलाई, इंदौर, भोपाळ, खंडवा, बऱ्हाणपूरसह विविध प्रांतातील सिंधी समाजबांधव जळगावात आले आहेत.

तसेच साई राजेशलाल, साई युधिष्टरलाल, साई अर्जुनदास, साई बलराम, साई किशोरीलाल, साई हरीराम, साई बिरबलदास यांचे चिरंजीव, साई फकीरराम या संतांचेही आगमन झाले आहे. रात्री संत बाबा हरदासराम साहेब यांच्या जीवनावर आधारीत भजनाचा कार्यक्रम रंगला. यात विरानी ईसरानी, साधवी राधे नंदिनी, बेबी कशिश, बेबी फ्रान्सी, अनिल भगत यांनी भजनात सहभाग घेतला. जळगावच्या बालकलाकारांनी 'बाबल प्यारो, जलगाँव वारो' ही नाटिका सादर केली. रिध्दी-सिध्दी डान्स गृप, रामशाम पार्टी, क्रांतिकारी नारी, असे कार्यक्रम सादर करण्यात आले.

**हे देत आहेत सेवा**

वर्सी महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टतर्फे राम कटारीया, अशोक मंधान, रमेश मतानी, शामलाल कुकरेजा, बनाराम शामनानी, जगदीशलाल कुकरेजा, नारायण रंगलानी, पंचायत दिलीप मंधवानी, गुरमुखदास तलरेजा,सुरेश कुकरेजा, विजय तुलसी यांच्यासह सेवा मंडळाचे सहकारी सेवा देत आहेत.





## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १२/१०/२०२५ **वार** : रविवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षिण **ऋतू** : शरद **मास** : आश्विन **पक्ष** : कृष्ण **महिना** : ऑक्टोबर
**संवत** : २०८१ **अयनांश** : २४-१३-०६ **तिथी** : षष्ठी **नक्षत्र** : मृग
**योग** : वरिया **करण** : वणिज **सूर्योदय** : ६-३३ **सूर्यास्त** : १८-१७
**चंद्रराशी प्रवेश** : मिथुन **शुभाशुभ** : १४ पावेतो शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : आर्थिक व्यवहारात चुका होतील.
**वृषभ** : अचानक घटना घडू लागतील.
**मिथून** : धार्मिक कार्यासाठी खर्च करावा लागेल.
**कर्क** : नातेवाईकांशी वाद करू नका.
**सिंह** : उत्तमात उत्तम असा दिवस असेल.
**कन्या** : जवळपास प्रवास करावा लागेल.
**तुला** : विद्यार्थी वर्गास उत्तम यश मिळेल.
**वृश्चिक** : संततीच्या समस्या सोडवाव्या लागतील.
**धनू** : मातृ आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.
**मकर** : कामामध्ये दिवसभर व्यस्त रहाल.
**कुंभ** : अविवाहितांना स्थळे येतील.
**मीन** : मन प्रसन्न राहील असा दिवस असेल.
**विशेष**: हिरवी फळे खावी.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव मोबा. ९८५००१५५५८**

# भुसावळ न. पा. निवडणुकीसाठी इच्छुकांची होणार भाऊगर्दी !

## विधानसभा निवडणुकीतील चेहऱ्यांसह अन्य परिवारातील उमेदवारांचा उत्साह

**उत्तम काळे**
**भुसावळ, ११ ऑक्टोबर**

जळगाव जिल्ह्यातील नव्हे तर नाशिक विभागातील एकमेव 'अ' वर्ग असलेल्या भुसावळ नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद यावेळेस प्रथमच अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. विधानसभा निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीतही इच्छुकांची 'भाऊगर्दी' होणार असे चित्र आहे.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेले उमेदवार किंवा त्यांच्या पत्नी निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीप्रमाणेच नगरपरिषद निवडणुकीलाही चांगलाच रंग येणार आहे.

दरम्यान, नगरपालिकेची निवडणूक लढवायची किंवा नाही, याचा निर्णय वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी अद्याप जाहीर केला नाही. त्यामुळे वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांच्या पत्नी तथा प्रतिष्ठा महिला मंडळ अध्यक्षा रजनी सावकारे यांचे नाव जोरदार चर्चेत असून मतदारांची उत्कंठा वाढली आहे.

भुसावळ शहराची लोकसंख्या १ लाख ८७ हजार ४२१ असून जळगाव जिल्ह्यातच नव्हे तर नाशिक विभागात भुसावळ नगरपालिका ही एकमेव 'अ' वर्ग नगरपालिका आहे. या नगरपालिकेतून एक



लोकनियुक्त नगराध्यक्ष व ५० नगरसेवक निवडून येणार असल्याने २५ वार्ड असलेल्या या नगरपालिकेच्या निवडणुकीकडे जिल्ह्याचे नव्हे तर राज्याचे लक्ष लागून आहे.

**वडिलांपाठोपाठ मुलालाही पहावी लागणार आरक्षण मुक्ततेची वाट!**

दरम्यान, माजी आमदार संतोष चौधरी हे या नगरपालिका निवडणुकीमध्ये त्यांचा मुलगा व सामाजिक कार्यकर्ता सचिन चौधरी यांना रिंगणात उतरवण्याच्या तयारीत होते. मात्र त्यांच्याप्रमाणेच मुलाच्या नशिबाने धोका खाल्ला आहे. व विधानसभेप्रमाणे नगरपालिका निवडणुकही अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यामुळे सचिन चौधरी यांचे स्वप्नही तात्पुरते का होईना मात्र भंगले आहे. त्यांना आता विधानसभा निवडणुकीप्रमाणेच नगरपालिका निवडणुकीतील ही आरक्षण खुले होण्यासाठी वाट पाहावी लागणार आहे.

**विधानसभेतील पराभव पचवून मधू मानवतकर पुन्हा न.पा. साठी रिंगणात उतरण्याच्या तयारीत**

विधानसभा निवडणुकीप्रमाणेच न.पा. निवडणुकीतही प्रथितयश डॉ. राजेश मानवतकर यांच्या पत्नी डॉ. मधू मानवतकर या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. डॉ. मानवतकर यांच्या पत्नी डॉ. मधू मानवतकर यांनीही विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यावेळेस त्याही पराभूत झाल्या होत्या. भाजप व सत्ताधारी पक्ष वगळता विरोधी सर्वच पक्षातून त्यांना उमेदवारीची तयारी दर्शविण्यात आली असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. मात्र त्यांनी अद्याप कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवायची याचा निर्णय घेतला नसल्याचे दिसून येत आहे .



### आरक्षण जि.प. असो की न.पा.! आघाडीवर सावकारेंचे नाव चर्चेत

शासनस्तरावरून नुकत्याच जाहीर झालेल्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षण सोडतीत लोकनियुक्त नगराध्यक्षपद हे भुसावळ नगरपरिषदेसाठी प्रथमच अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून आरक्षित झाले आहे. त्यामुळे या नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा बुलडाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी तथा प्रतिष्ठा महिला मंडळाच्या अध्यक्ष रजनी सावकारे ह्या निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे यावेळेस कोण बाजी मारणार याकडे जिल्ह्याचे नव्हे तर राज्याचे लक्ष लागून राहणार आहे. दरम्यान, सात-आठ वर्षांपूर्वी कुऱ्हे (पानाचे) - वराडसिम हा जिल्हा परिषद गट आरक्षित झाला होता. त्यावेळेस या गटातून वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांच्या वहिनी पल्लवी सावकारे यांनी निवडणूक लढवत या गटातून त्या ६ हजार मतांनी निवडून आल्या होत्या.

**लेवा पाटीदार समाजाकडून तीन उमेदवारांच्या नावावर चर्चा**

विधानसभा निवडणुकीप्रमाणेच न.पा. निवडणुकीवरही शहरात लेवा पाटीदार समाजाचा मोठ्या प्रमाणात प्रभाव आहे. त्यामुळे या निवडणुकीतही विरोधी पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढवलेल्या स्वाती जंगले यांनाही उमेदवारी देण्याच्या तयारी दिसून येत आहे. विरोधी पक्षाकडून केवळ स्वाती जंगलेच नव्हे तर अजून लेवा पाटीदार समाजामधून दोन उमेदवार तयारीत असल्याचेही चर्चिले जात आहे. मात्र समाज प्रतिनिधी काय निर्णय घेतात, यावर शहरवासीयांचे लक्ष लागून आहे .

**पुष्पा सोनवणे रिंगणात उतरणार**

गतवर्षी विधानसभा निवडणुकीत चांगलाच फटका खाल्ल्यानंतरही समाजसेवेची आवड असलेले जगन सोनवणे हे विधानसभा निवडणुकीचा पराभव पचवून पुन्हा सामाजिक कार्यात गुंतले आहेत. आता तर त्यांनी त्यांचे समाज कार्य केवळ भुसावळ, जळगाव जिल्ह्यापुरते नव्हे तर राज्यात वाढवले आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते राज्यभर मोर्चे काढून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करीत आहेत. भुसावळ नगरपालिका ही अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यामुळे पंचायत समितीच्या माजी सदस्या तथा नगरपालिकेच्या माजी नगरसेविका पुष्पा जगन सोनवणे यांना ते रिंगणात उतरवण्याच्या तयारीत असून मात्र यावेळेस सर्व विरोधी पक्षांनी माझ्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन सोनवणे यांनी केले आहे.

## थोडक्यात महत्वाचे.....

### आदर्श शाळेतील देशना जैनची विभाग स्तरावर निवड



**मुक्ताईनगर** : येथील आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी देशना नितीन जैन ही जळगाव येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत विजयी झाल्याने तिची विभागस्तरावर निवड करण्यात आली आहे. देशना ही मुक्ताईनगर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नितीन जैन यांची मुलगी आहे. या यशाबद्दल तिचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष कुमार टावरी, कोषाध्यक्ष वसंत तळेले, सचिव डॉ. रवींद्र पाटील, संचालक नारायण चौधरी, बाळकृष्ण राणे, मुख्याध्यापक नितीन पवार, मुख्याध्यापिका सरला पाटील, पर्यवेक्षक लिना रडे क्रीडाशिक्षक मनीष चौधरी, संजय राणे, रुचिता नेहते, भारती सुरवाडे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



### महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धेत पूजा सापकर यांचे सुयश

**सिंगनूर (ता. रावेर)** : येथून जवळच असलेल्या सावदा येथील रहिवासी पूजा रवींद्र सापकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेत यश मिळविले. या परीक्षेतून जीऑलॉजिस्ट असिस्टंट साईंटिस्ट या पदावर पूजा सापकर यांची नियुक्ती झाली असून अखिल भारतीय जीवा सेना रावेर तालुका तथा नाभिक समाजातर्फे पूजा सापकर व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय जीवा सेना उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष गणेश सेठी, तालुका अध्यक्ष सुरेंद्र शिरनामे, सुरेश ठाकरे, सतीश महाजन, युवराज सापकर, पिंटू सापकर, युवराज ठाकरे, महेंद्र सापकर, किरण बोरसे आदी नाभिक समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन धनराज बोरनारे यांनी केले. आभार सुरेंद्र शिरनामे यांनी मानले.



### ऐनपूर महाविद्यालयात वाढदिवस रक्तदान क्लब स्थापन

**रावेर** : तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककामार्फत वाढदिवस रक्तदान क्लब स्थापन करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. एस. एन. वैष्णव, प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. जे. पी. नेहेते उपस्थित होते. त्यांनी वाढदिवस रक्तदान क्लब संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती व रक्तदानाचे महत्त्व सांगितले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपल्या वाढदिवसाला जवळच्या रक्तपेढीवर जाऊन रक्तदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयात रक्तदान शिबिर घ्यावेत, असे डॉ. वैष्णव यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रमुख कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. एन. रामटेके यांनी केले. आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी एस. पी. उमरीवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, उपप्राचार्य डॉ. एस. एन वैष्णव, डॉ. जे. पी. नेहेते, डॉ. एस. ए. पाटील, डॉ. एम. के. सोनवणे, डॉ. व्ही. एन. रामटेके, एस. पी. उमरीवाड डॉ. पी. आर. गवळी, प्रा. अक्षय महाजन, प्रा. प्रदीप तायडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### अजनसोंडे बोरघाटात अपघात, १ ठार ११ जखमी

**पाल (ता. रावेर)** : पाल खिरोदा दरम्यान असलेल्या बोरघाटात १० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता खासगी प्रवासी वाहन क्रूझर क्र. एमएच-१९ सीएफ-३९२० चा भीषण अपघात झाला. यात भुसावळ तालुक्यात अंजनसोंडा येथून पालकडे येत असताना हे वाहन बोरघाटात उलटून अपघात झाला. यात १ जणाचा जागीच मृत्यू झाला असून ११ जण जखमी झाले आहेत. अंजनसोंडा येथून पालकडे येत असलेल्या खासगी वाहनचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. या वाहनात एकूण १२ प्रवासी होते. त्यात पाल येथे पद्माकर पाटील (वय ६२), गणेश चौधरी (वय ६४), गोपाळ कोळी (वय ७१) आणि चालक प्रशांत चौधरी (वय ४८) हे जखमी पाल ग्रामीण रुग्णालयात दवाखान्यात दाखल असून विजय राणे (वय ५५, रा. अंजनसोंडा) हे या अपघातात मृत झालेले आहेत. जखमींना प्राथमिक उपचारासाठी पाल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी जळगाव जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.





### मनाचं आरोग्य सांभाळा, प्रत्येक दिवस मोलाचा : प्रा. डॉ. ढाके

**मुक्ताईनगर** : समता फाउंडेशन मुक्ताईनगरचे फॅशन डिझायनिंग वर्गात १० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक व्ही. के. वळस्कर, प्रमुख व्याख्याता प्रा. डॉ. प्रतिभा ढाके आदी उपस्थित होते. डॉ. प्रतिभा यांनी मानसिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम, योग-ध्यान, नियमित व पुरेशी झोप, सकारात्मक विचार, आपले मन मोकळे करणे, छंद जोपासणे, तणाव व्यवस्थापन, आरोग्यदायी आहार, डिजीटल डिटॉक्स, मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेत मनाचे आरोग्य सांभाळत प्रत्येक दिवस मोलाचा असल्याचे प्रतिपादन केले. मुख्याध्यापक वळस्कर यांनी जागतिक मानसिक आरोग्य निमित्त मानसिक आरोग्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. टिम ट्रेनर आशा तडवी यांच्या मार्गदर्शनात उपक्रम पार पडला. सूत्रसंचालन एफ. डी. ट्रेनर गीता भोई यांनी केले. आभार हर्षदा दैवे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समता फाउंडेशनच्या फॅशन डिझायनिंगच्या महिलांनी परिश्रम घेतले.

# प्रभाग रचनेत बदल नसताना मतदारांच्या संख्येत वाढ

## प्रभाग ८ च्या प्रारूप मतदार यादीत चुकांसंदर्भात प्रा. धिरज पाटील यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ११ ऑक्टोबर**

नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी भुसावळ नगरपालिकेतर्फे नवीन प्रभाग क्र. ८ ची प्रारूप मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात आला. प्रभाग रचनेत कोणताही बदल झालेला नसताना अधिकाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षपणामुळे या प्रभागात मतदारांच्या संख्येत वाढ झालेली आहे. यासंदर्भात प्रा. धिरज पाटील यांनी थेट निवडणूक आयोगाकडे धाव घेत तक्रार दाखल केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश व सूचनांकडे दुर्लक्ष करीत अधिकारी कर्मचाऱ्यांकडून कामकाजात गांभीर्य राखले जात नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. अंतिम प्रभाग रचनेत गवळी वाडा, सुतार गल्ली, गमाडिया प्रेस, फकिरवाडा, न्यु सातारा फाईल, कुटे गल्ली, मामाजी टॉकीज परिसर, महात्मा फुले नगर, हबंर्डीकर चाळ, हिरकणी शेटचा वाडा, जवाहर हॉटेल जवळील भाग, इमाम वाडा, बौध्द वाडा आदी नमूद नसलेल्या परीसरातील सुमारे ७५० पेक्षा जास्त नागरिकांची नावे प्रभाग क्रमांक ८ च्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत.

प्रभाग रचना बदललेली नसताना मतदार संख्येत वाढ

प्रारूप मतदार यादीत शेकडो दुबार नावे आहेत. तसेच मृत व्यक्तींची देखील नावे समाविष्ट आहेत. बीएलओंना यासंदर्भात सूचना देऊनही त्यावर कार्यवाही झालेली नसल्याने या प्रभागात १० हजार ५०० हून अधिक मतदार आहेत. २०२२ दरम्यान निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला, त्यावेळी अंतीम मतदार यादीत व आताच्या प्रारूप यादीत खूप मोठी तफावत आहे. या ठिकाणी रहिवासी लोकसंख्येपेक्षा मतदार संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे ती वाढीव मतदार नावे आली कोठून, असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रभाग रचना बदललेली नसताना मतदार वाढले असून काही ठिकाणी नावे दुसऱ्या प्रभागात गेली आहेत. यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या हक्काच्या प्रभागात मतदानापासून वंचित राहावे लागणार आहे.

**न्यायालयात धाव घेणार : प्रा. धिरज पाटील**

मतदारांच्या नावातील दुरुस्तीबाबत मतदारांना दुरुस्ती करावयाची असल्यास नगर परिषद कार्यालयामध्ये सोमवार १३ ऑक्टोबरपर्यंत अर्ज उपलब्ध आहेत. ज्याठिकाणी निवास आहे, त्या ठिकाणचा पुरावा आणि आधार, मतदार नोंदणीचे कार्ड, वीज बिल, कर भरल्याची पावती, मिळकत उतारा सोबत जोडावा लागेल. यात नागरिकांची दमछाक होणार आहे. पारदर्शक पद्धतीने निवडणूक होण्यासाठी निवडणूक आयोगात तक्रार केली आहे, गरज भासल्यास न्यायालयात न्यायासाठी धाव घेणार असल्याचेही प्रा. पाटील यांनी सांगितले.

# प्रभाग रचना अन् आरक्षणावर हरकती नोंदवण्यासाठी मुदतवाढ

## २४ ऑक्टोबरपर्यंत अंतिम आरक्षण यादी, तर २८ रोजी अंतिम मतदार यादी होणार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ११ ऑक्टोबर**

येथील नगरपालिका निवडणुकीच्या तयारीने वेग घेतला असून प्रशासनाने प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी, प्रभाग रचना आणि आरक्षणाची यादी नुकतीच जाहीर केली आहे. या यादीवर नागरिकांना हरकती नोंदवण्यासाठी मुदत देण्यात आली असून, मतदार यादीवर १३ ऑक्टोबर आणि प्रभाग आरक्षणावर १४ ऑक्टोबर पर्यंत हरकती सादर करता येणार आहेत.

प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी जाहीर झाल्यानंतर शुक्रवारी सायंकाळपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग आरक्षणावर दोन व्यक्तींनी तीन हरकती दाखल केल्या आहेत, तर मतदार यादीवर



एक हरकत प्राप्त झाली आहे.

यंदाच्या प्रारूप मतदार यादीमध्ये अनेक प्रभागांमध्ये मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही मतदारांची नावे संबंधित यादीतून वगळली गेली असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. त्यामुळे यावर्षी मतदार यादीवर हरकतींची संख्या लक्षणीय वाढण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हरकतींची सुनावणी झाल्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल. तसेच ७ नोव्हेंबर रोजी मतदान केंद्रांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

प्रभाग आरक्षणावर प्राप्त झालेल्या हरकतींवर विभागीय आयुक्तांकडून सुनावणी घेण्यात येणार असून, त्यानंतर २४ ऑक्टोबरपर्यंत अंतिम आरक्षण यादी मंजूर होईल आणि २८ ऑक्टोबर रोजी ती राजपत्रात प्रसिद्ध केली जाईल.

निवडणुकीसंदर्भातील बहुतेक प्रक्रिया ऑक्टोबर महिन्यात पूर्ण होणार असून, नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबर महिन्यात मतदान प्रक्रिया पार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेची तयारी प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे.

# कोणतीही कारवाई न करता जेसीबी यंत्र सोडले

## विभागीय आयुक्तस्तरावरून जिल्हाधिकाऱ्यांना तहसिलदारांविरूद्ध कारवाईचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ११ ऑक्टोबर**

पकडलेले जेसीबी कोणतेही कागदपत्र व दंडात्मक कारवाई न करता भुसावळच्या तहसिलदार नीता लबडे यांनी पदाचा गैरवापर करीत सोडून दिले होते. याबाबत सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते केदारनाथ सानप यांनी नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. याची दखल घेत विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी तत्कालीन जळगाव जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना याप्रकरणी शासन नियमातील तरतुदीनुसार चौकशी करून उचित कारवाईचे आदेश दिले होते.

वरणगाव परिसरात १४ जुलै २०२५ रोजी अवैध गौण खनीज विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली होती. यात चार वाहने जप्त करण्याची कारवाई भुसावळ तहसीलदार निता लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी रजनी तायडे, तलाठी सुप्रिया बिराजदार, रेणुका पाटील, नितीन केले, रोशन कापसे व जितेश



चौधरी यांच्या संयुक्त पथकाने केली. जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये ट्रॅक्टर, डंपर, जेसीबी इ. वाहने पोलिस बंदोबस्तात भुसावळ तहसील कार्यालय परिसरात जमा करण्यात आली होती.

त्यात ट्रॅक्टर व डंपर या वाहनधारकांनी दंड रक्कम भरणा केल्याने सोडण्यात आले होते. तसेच दि. ११ जुलै २०२५ च्या शासन निर्णय माहिती असतांना सुध्दा जेसीबी यंत्राचे कोणतेही कागदपत्र तपासणी वा दंड कारवाई न करता तहसीलदार निता लबडे यांनी सोडून दिले.

या संदर्भात सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते केदारनाथ सानप यांनी १५ सप्टेंबर २०२५ रोजी विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रार अर्जात तहसीलदार नीता लबडे यांची चौकशी करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी सानप यांनी केली होती.

या तक्रार अर्जाची दखल घेत विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी ३० सप्टेंबर २०२५ रोजी पत्र क्र. मशा-२/ कार्य/ गोख/ई टपाल नं.६८४६६९७/२०२५ अन्वये तत्कालीन जिल्हाधिकारी जळगाव यांना अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करून तरतुदीनुसार उचित कारवाई करण्याचे व अर्जदार यांना माहिती देण्यात यावी, असे आदेशात म्हटले आहे.



### चिंचोली येथे 'क्षयमुक्त गाव माझी जबाबदारी' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ११ ऑक्टोबर**

किनगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत उपकेंद्र चिंचोली येथे क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत 'क्षयमुक्त गाव माझी जबाबदारी 'उपक्रम उत्साहात पार पडला. जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन भायेकर व तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजू तडवी यांच्या मार्गदर्शनानुसार वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना निकम व सरपंच सुमित्रा अनिल सोळंके यांनी माहिती रुग्णांना दिली.

या अभियानाव्दारे उपकेंद्रांतर्गत असलेल्या गावांमध्ये ५९ रुग्णांची थुंकी व १० रुग्णांचे एक्स-रे तपासणी करण्यात आली. तसेच सीवाय व टीबी ची लस १० रुग्णांना देण्यात आली. वैद्यकिय अधिकारी डॉ. दर्शना निकम, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. वकार शेख, डॉ. सोनल भंगाळे, डॉ. अशफाक शेख, डॉ. मोहसिन कुरेशी, डॉ. धनंजय जोशी यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिर यशस्वीतेसाठी आरोग्य सेविका कविता सपकाळे, आरोग्य सेवक जयेश माळी, मनोज बारेला, उमर रझा, मुजाहिद तडवी, सरदार कानाशा, क्षयरोग पर्यवेक्षक मिलिंद राणे, आशा सेवीका अनिता रुळे, वंदना सोळुंके, आशा सोळुंके, जयमाला सोळुंके, सरला पाटील, किरण पाटील, मदतनीस सुनीता पाटील, वाहन चालक कुर्बान तडवी यांनी परिश्रम घेतले.

# यावल पोलीस ठाण्याजवळ स्वच्छतेचा अभाव

## घाणीमुळे दुर्गंधी, परिसर स्वच्छतेची मागणी

**तभा, वृत्तसेवा**
**यावल, ११ ऑक्टोबर**

यावल पोलिस ठाणे कार्यालयाच्या पाठीमागील भागात भूमी अभिलेख तसेच तालुका कोषागार कार्यालय आहे. या परिसरात नगरपरिषद आरोग्य विभागाकडून परिसराची स्वच्छता वेळोवेळी होत नसल्याने मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता पसरली आहे. यामुळे परिसरात दुर्गंधीयुक्त वातावरण असून तत्काळ नगर परिषद प्रशासनाने स्वच्छता करावी, अशी मागणी भाजपचे चेतन अढळकर यांनी केली आहे.

येथील पोलिस ठाण्याच्या मागील बाजूस भूमी अभिलेख कार्यालय तसेच सेतू सुविधा केंद्र आणि कोषागार कार्यालय असून पोलीस ठाणे परिसरालगतच्या मागील भागात नागरिकांकडून अडगळीच्या जागी मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्यामुळे या परिसरात बऱ्याच दिवसापासून अस्वच्छतेमुळे प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. अंकलेश्वर-बऱ्हाणपूर राज्य मार्गालगतच्या



परिसरामुळे रस्त्यापर्यंत दुर्गंधी येते. त्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. नगर परिषदेने या भागात तत्काळ स्वच्छता करावी, अशी मागणी भाजपचे चेतन अढळकर यांनी केली आहे.



### जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींचे सुयश

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ११ ऑक्टोबर**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कला उत्सव स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यात येथील जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे.

जिल्हास्तरीय कला उत्सव स्पर्धेत मिताली कोल्हे, डिंपल पाटील, कल्याणी फालक, वेदिका धनगर, गुंजन तळेले या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. यात जिल्हास्तरावर मिताली कोल्हे हिने प्रथम क्रमांक मिळविल्याने तिची नाशिक विभागीय स्तरावर निवड झाली. यात देखील नाशिक विभागीय स्तरावर तृतीय क्रमांकाचे यश मिळविले. या सर्व विद्यार्थिनींचे गटशिक्षणाधिकारी धनके, शिक्षण विभागीय अधिकारी सरोज पाटील, आशिक हुसेन, सर्व केंद्रप्रमुख ठाकुर व तडवी, गोजखान, चौधरी, नेहेते, गोहील व सातघरे, शाळेचे अध्यक्ष शरद महाजन, संचालक मंडळ, प्राचार्या रंजना महाजन व दिपाली धांडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले. गटशिक्षण अधिकारी धनके व इतर सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन शाबासकी देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात महत्त्वाचे...



**गजमल पाटील यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन**

**नंदुरबार** : येथील जी. टी. पाटील महाविद्यालयात संस्थेचे माजी चेअरमन (स्व.) गजमल तुलसीराम पाटील बापूजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम झाला. संस्थेचे चेअरमन तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते बापूजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष मनोज रघुवंशी, सरचिटणीस यशवंत पाटील, संचालक तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. राम रघुवंशी, संचालक यशवर्धन रघुवंशी, बी. के. पाटील, प्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी, संस्थेचे समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. रघुवंशी, प्राचार्य डॉ. एन. डी. चौधरी, प्राचार्य पुष्पेंद्र रघुवंशी, माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे, माजी नगरसेवक दीपक दिघे, बाजार समितीचे सभापती दीपक मराठे, पंचायत समितीचे माजी उपसभापती कमलेश महाले, ताराचंद मालचे, किशोर पाटील, अंकुश पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमात मान्यवरांनी (स्व.) जी. टी. बापूजींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्वक उल्लेख करत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहितकारी कार्याला उजाळा दिला. प्रा. डॉ. उपेंद्र धगधगे, प्रा. डॉ. मनोज शेवाळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रा. डॉ. डी. एस. पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. हर्षबोध बैसाणे यांनी सहकार्य केले.



**हस्ती स्कूलच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय रोलर हॉकी स्पर्धेत यश**

**दोंडाईचा (शिंदखेडा)** : हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी जिल्हास्तरीय शालेय रोलर हॉकी स्पर्धेत घवघवीत यश मिळवत विभाग स्तरावर प्रवेश मिळविला. धुळे येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे ५ ऑक्टोबरला चावरा पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय शालेय रोलर हॉकी स्पर्धेचे उद्घाटन तालुका क्रीडा अधिकारी स्वप्नील गोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी धनंजय पाटील, अजय चौराशी, भावना चौराशी आदी उपस्थित होते. रोलर हॉकी स्पर्धेत १९ वर्षांआतील गटात हस्ती स्कूलच्या खेळाडूंनी घवघवीत यश मिळवत विभाग स्तरावर प्रवेश मिळवला. सांघिक खेळाच्या प्रकारात हस्ती स्कूलमधील रोहन ठाकरे, सुमित गवळी, किरण शिंदे, भूषण साबळे, भावेश चौरे, ईशांत पवार, रोशन अहिरे, दर्शन देसाई, अश्विन पवार, रूपेश बहिरम, कुणाल मोरे, शरद सोनवणे यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांचा हस्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष उद्योगपती अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन व संचालक मंडळ, हस्ती पब्लिक स्कूलचे प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन यांनी गौरव केला. विद्यार्थ्यांना हस्ती स्कूलचे क्रीडाशिक्षक धनिकलाल ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.




**ज्येष्ठांनी दिली कोजागरीबाबत वैज्ञानिक माहिती**

**नंदुरबार** : नंदुरबार तालुका ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे कोजागरीनिमित्त कार्यक्रम झाला. याप्रसंगी कोजागरीचे महत्त्व तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन काय असतो यासंदर्भात निवृत्त प्राचार्य बी. एस. पाटील यांनी सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला. वसंतराव चौधरी अध्यक्षस्थानी होते. त्यांनी संस्थेने केलेल्या कार्याची माहिती दिली. सदस्या गीता पंडित यांनी कवितावाचन केले. महिला मंडळाच्या अध्यक्षा देवकन्या सोनार यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे उपाध्यक्ष अशोक टेंभेकर यांनी कोजागरीबद्दल माहिती दिली. कोषाध्यक्ष दरबारसिंग गिरासे यांनी संघटनेबद्दल माहिती दिली. सचिव राधेश्याम सोनार यांनी दीपावलीच्या पूजेबद्दल माहिती दिली. माजी प्रा. प्रभाकर भावसार यांनी कैवल्याचा चांदण्याला अभंग गायला. रंजना शिंपी यांनी गाणी म्हटली. श्री. टेंभेकर यांनी आभार मानले. याप्रसंगी ॲड. पी. एन देशपांडे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंपी, प्रा. एम. आर. गुजराथी, ॲड. श्रीराम सोनार, तात्या पिंगळे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजाराम निकम, देविदास वसईकर, रामा बुधा चौधरी, दत्तात्रेय शिंपी, अनिल शंकरराव चौधरी, सुधाकर चौधरी, रवींद्र परदेशी यांनी सहकार्य केले.



**न्या. गवईंवर हल्ला; बहुजन समाज पक्षातर्फे निवेदन**

**नंदुरबार** : दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयाचे न्या. भूषण गवई यांच्यावर वकील धावून गेला. याबाबत येथील बहुजन समाज पक्षातर्फे निवासी उपजिल्हाधिकारी कल्पना निळ्ठुबे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब ब्राह्मणे, जिल्हा प्रभारी जितेंद्र तायडे, मनोज वसईकर, जिल्हा उपाध्यक्ष ललित पानपाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा प्रमिला जाधव, जिल्हा कार्यकारी सदस्य देविदास अल्हाट, विश्वास पवार, सना शाह, राजेंद्र महाले, अविनाश वाघ, बिरजू बैसाने, चंद्रकलाबाई मोरे, सुभाष महिरे, संजय जावरे, गणेश पवार, सुनील पाडवी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




**धुळे सीए शाखेत टॅक्स ऑडिटवर परिसंवाद**

**धुळे** : इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया पश्चिम विभागांतर्गत कार्यरत धुळे सीए शाखेतर्फे टॅक्स ऑडिटमधील नव्या सुधारणा या विषयावर परिसंवाद धुळे सीए शाखा कार्यालयात झाला. याप्रसंगी प्रमुख वक्ते नाशिक येथील निकुंज रुंगटा यांनी नव्या कर सुधारणा, कर ऑडिटची बदललेली प्रक्रिया व त्यातील व्यावहारिक बाबींवर मार्गदर्शन केले. सदस्यांना प्रत्यक्ष कामकाजात उपयुक्त ठरणारे महत्त्वाचे मुद्दे समजावून सांगण्यात आले. शाखेचे चेअरमन यश आंचलिया, उपाध्यक्ष संकेत खंडेलवाल, खजिनदार आयुष अगरवाल, तसेच सीए विद्यार्थी संघटना अध्यक्षा सोनी सोनार यांनी संयोजन केले.

**धुळ्यात २४ ऑक्टोबरला महिला लोकशाही दिन**

**धुळे** : जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होऊन त्यांना न्याय मिळावा यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून प्रत्येक महिन्यात जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. महिला लोकशाही दिन २४ ऑक्टोबरला सकाळी अकराला जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. तक्रार, निवेदन अर्जदाराचे वैयक्तिक असावे, तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवाविषयक, आस्थापना विषय अर्ज-तक्रार-निवेदन तसेच टपालाने पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे महिला लोकशाही दिनाचे सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी राजेंद्र भामरे यांनी कळविले आहे.

# नंदुरबार जिल्ह्यात चार तोतया डॉक्टरांविरुद्ध गुन्हे दाखल

## तीन दिवसांत शहादा, धडगाव, अक्कलकुवा तालुक्यात धडक कारवाई; सर्व संशयित परराज्यातील

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ११ ऑक्टोबर**

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची कोणतीही वैद्यकीय पदवी किंवा परवाना नसताना ॲलोपॅथीचा वापर करून रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या आणि त्यांची फसवणूक करणाऱ्या चार तोतया डॉक्टरांविरुद्ध जिल्हा आरोग्य विभागाने पोलिसांच्या मदतीने धडक कारवाई केली.

गेल्या तीन दिवसांत शहादा, धडगाव आणि अक्कलकुवा या तीन पोलिस ठाण्यांच्या हद्दीत हे गुन्हे दाखल झाले असून, सर्व संशयित मूळचे पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेशातील आहेत. विशेषकरून आदिवासीबहुल भागात जनतेच्या निरक्षरतेचा व अज्ञानाचा फायदा घेत हे तोतया डॉक्टर जनतेच्या जीवाशी खेळत होते. या बोगस डॉक्टरांवर कारवाई झाल्याने जनतेने समाधान व्यक्त केले आहे.

**अक्कलकुव्यात दोन बोगस डॉक्टर जेरबंद**

अक्कलकुवा तालुक्यात मोलगी पोलिसांनी १० ऑक्टोबरला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तुप्ती पटले यांच्या तक्रारीवरून दोन परप्रांतीय तोतया डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यात दीपनकर सूर्यकांत



बिश्वास (रा. पश्चिम बंगाल) हा बर्डी उखलापाडा येथे, तर कृष्णपद जगन्नाथ मंडल (रा. पश्चिम बंगाल) हा हुणखांब चनवाईपाडा येथे कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना बेकायदेशीर डॉक्टरकीचा व्यवसाय करत असल्याचे आढळले. या दोघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

**शहादा, धडगाव येथील कारवाई**

यापूर्वी, नंदुरबार जिल्ह्यात आणखी दोन तोतया डॉक्टरांविरुद्ध गुन्हे दाखल झाले. ८ ऑक्टोबरला शहादा तालुक्यातील लंगडी भवानी परिसरात सुभाष सुपेन पांडे (रा. पश्चिम बंगाल) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. वैध परवाना नसताना ॲलोपॅथीचा वापर करून लोकांची दिशाभूल केल्याबद्दल तालुका वैद्यकीय अधिकारी राजेंद्र वळवी यांनी ही तक्रार दाखल केली. त्याचप्रमाणे ९ ऑक्टोबरला धडगाव-मोलगी रस्त्यावर नागेंद्र बहादूरसिंग राजपूत (रा. उत्तर प्रदेश) या तोतया डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल झाला. वैद्यकीय व्यवसाय चालवण्याचे प्रमाणपत्र नसतानाही तो व्यवसाय करत होता. या कारवाईत त्याच्याकडून हजारो रुपयांच्या औषधी व साहित्य जप्त करण्यात आले.

या सर्व प्रकरणांत फसवणूक, दिशाभूल आणि बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसाय चालवल्याबद्दल भारतीय न्यायसंहिता आणि महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ च्या संबंधित कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नागरिकांनी योग्य वैद्यकीय पदवी नसलेल्या व्यक्तींकडून उपचार घेणे टाळावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे.

# बेटावद येथील आरोग्य केंद्रात उपचाराअभावी रुग्णाचा मृत्यू

## डॉक्टर गैरहजर; ग्रामस्थांत तीव्र संताप; आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**बेटावद (शिंदखेडा), ११ ऑक्टोबर**

येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्री डॉक्टर उपलब्ध नसल्याने धनराज सुका माळी (वय ५२) या रुग्णाचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांत संतापाची लाट उसळली असून, आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (१० ऑक्टोबर) रात्री उशिरा धनराज माळी यांची प्रकृती बिघडल्याने कुटुंबियांनी त्यांना तातडीने बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, त्या वेळी केंद्रात एकही डॉक्टर उपस्थित नव्हता. ग्रामस्थ व कुटुंबीयांनी वारंवार



संपर्क साधून डॉक्टरांना बोलावण्याचा प्रयत्न केला; पण प्रतिसाद मिळाला नाही.

केंद्रात परिचारिका सोनाली कोळी व सुरक्षारक्षक किशोर कोळी उपस्थित होते. त्यांनी उपचारासाठी मर्यादित प्रयत्न केले; पण डॉक्टर नसल्याने योग्य उपचार मिळू शकले नाहीत. अखेर धनराज माळी यांची प्रकृती खालावली व अखेर त्यांचा मृत्यू झाला.

ग्रामस्थांच्या मते, रात्री डॉ. निखिल देसले हे ड्यूटी असतानाही हजर नव्हते. स्थानिक युवा कार्यकर्ता राजेंद्र माळी यांनी घटनेची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन बोडके यांना दिली. त्यांनी तत्काळ नरडाणा येथील डॉ. राजपूत यांना घटनास्थळी पाठविले. मात्र, त्यांनी पोहोचल्यावर रुग्णास मृत घोषित केले.

दरम्यान, रात्री जातोडे गावातून प्रसूतीसाठी आणलेल्या महिला रुग्णालाही डॉक्टरांची वाट पाहत थांबावे लागले, अशी माहिती मिळाली आहे.

बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात बेटावद, पढावद, मुडावद, पाष्टे, अजंदे, म्हळसर, भिलाली, बाह्मणे, एकलहरे अशी दहा गावे आरोग्यदृष्ट्या अवलंबून आहेत. रात्री डॉक्टर अनुपस्थित राहिल्याने परिसरातील ग्रामस्थांना धुळे, अमळनेर किंवा शिरपूर येथे ४० किलोमीटरवर उपचारासाठी धाव घ्यावी लागते. त्यामुळे अनेक वेळा रुग्णांचा जीव धोक्यात येत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, रात्री डॉक्टर उपलब्ध नसतात, परिचारिका मनमानी वागतात, साधे ड्रेसिंगही करून देत नाहीत. स्थानिक रुग्ण कल्याण समिती नुसती नावालाच आहे, प्रत्यक्ष कामकाजात कोणतीही जबाबदारी घेतली जात नाही, अशीही ग्रामस्थांची तक्रार आहे.

रात्री ड्यूटीवरील डॉक्टर नेहमीप्रमाणे केंद्रात उपस्थित राहावेत, गैरहजर राहणाऱ्या डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी आणि बेटावद आरोग्य केंद्रात २४ तास वैद्यकीय सेवा सुनिश्चित करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आरोग्य प्रशासनाकडे केली आहे.

# केळी-पपई बागायतदार संस्थेच्या भवनाचे शहाद्यात आज उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ११ ऑक्टोबर**

नंदुरबार जिल्हा केळी व पपई फळ बागायतदार सहकारी संस्थेच्या बागायतदार भवनाचे भूमिपूजन रविवारी (१२ ऑक्टोबर) सकाळी दहाला विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून, पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल अध्यक्षस्थानी असतील.

जिल्ह्यात केळी व पपई फळबागायत मोठ्या प्रमाणावर वाढले असून, फळबागायतदार शेतकऱ्यांसाठी बाजार समितीचे सभापती अभिजित पाटील यांनी फळबागायतदार संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेच्या स्वतंत्र बागायतदार भवनाचे भूमिपूजन पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते होईल. या वेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, अमळनेरचे आमदार अनिल पाटील, शहाद्याचे आमदार राजेश पाडवी, धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष अभिजित मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष एन. डी. पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख अरुण चौधरी, बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील, उपसभापती भानुदास पाटील, संचालक मंडळ व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत बाजार समितीच्या प्रांगणात कार्यक्रम होणार आहे. उपस्थितीचे आवाहन नंदुरबार जिल्हा केळी व पपई फळबागातदार सहकारी संस्थेचे चेअरमन बुधा गोपाळ पाटील, व्हाइस चेअरमन राहुल साहेबराव सनेर, सचिव हरी दत्तू पाटील व संचालक मंडळाने केले आहे.



# मालपूरमधील ऊसतोड मजुरांचे स्थलांतर

**तभा वृत्तसेवा**
**मालपूर (शिंदखेडा), ११ ऑक्टोबर**

मालपूरसह परिसरातील मजुरांच्या हाताला पुरेसे काम कायमस्वरूपी उपलब्ध नसल्याने ऐन खरीप हंगाम काढण्याच्या वेळी स्थलांतर सुरू झाल्याने आता परिसरात मजुरांची चांगलीच कमतरता निर्माण झाली आहे.

मालपूरसह परिसरातील सुराय, अक्कलकोस, कलवाडे येथील आदिवासी मजुरांचे गुजरातसह महाराष्ट्रातील बारामती, सांगली, सातारा येथे ऊसतोड करण्यासाठी स्थलांतर सुरू झाले असून, पहिला टप्पा दसऱ्याआधीच रवाना झाला, तर दुसऱ्या टप्प्यातील स्थलांतर सुरू झाले आहे. येथील खरीप हंगाम अर्ध्यावर टाकून त्यांचे मुकादम त्यांना गाडीतून जाताना दिसून येत आहेत. यामुळे येथील शेतकऱ्यांना मजुरांच्या कमतरतेला सामोरे जावे लागत आहे.

पावसाने उघडीप दिली आहे, तर कापूस लाल पडून केवळ बोंडच शिल्लक असल्याने तो संपूर्ण फुटला आहे. एक किंवा दोन वेचणीत खरिपातील कापूस संपणार आहे. यामुळे हाताला पुरेसे काम नसल्यामुळे मजूर मार्गस्थ झाले आहेत. दरवर्षी दिवाळीनंतर मजुर स्थलांतरित होत होते. मात्र, यावर्षी दिवाळीपूर्वीच स्थलांतर सुरू झाल्याने येथील हंगाम संपल्यावर या मजुरांना मार्गस्थ करावे, अशी येथील शेतकऱ्यांची मागणी आहे. मात्र, मुकादम मनमानी करत असल्यामुळे येथील शेतकऱ्यांना मजुरांच्या कमतरतेला तोंड द्यावे लागत आहे.

# शाश्वत उत्पादनासाठी नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा

## दीपक पटेल : नंदुरबारमध्ये कृषी सखींसाठी प्रशिक्षणासह प्रात्यक्षिक कार्यक्रम

**नंदुरबार** : नैसर्गिक शेती मिशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी शाश्वत आणि विषमुक्त उत्पादनासाठी नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचा अवलंब करावा. यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन योजनेंतर्गत अनुदान उपलब्ध करून दिले आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनचे प्रतिनिधी दीपक पटेल यांनी केले.

राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनअंतर्गत कृषी विज्ञान केंद्र (नंदुरबार) व आत्मा (नंदुरबार) यांच्यातर्फे ६ ते १० ऑक्टोबरदरम्यान कृषी सखींचा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. 'आत्मा'चे प्रकल्प संचालक तथा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख राजेंद्र दहातोंडे प्रमुख पाहुणे होते.

दीपक पटेल यांनी नैसर्गिक शेतीमधील निविष्ठा घरच्या बांधावर कशा तयार कराव्यात व बीआरसीची स्थापना करून त्याचा उपयोग कसा करावा. जेणेकरून पुढच्या पिढीला विषमुक्त अन्न कसे तयार करून देऊ शकतो, यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून नैसर्गिक शेतीचे निविष्ठा केंद्र उभारणार आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांनी कसा करावा, असे सांगितले.

राजेंद्र दहातोंडे यांनी प्रास्ताविकात, या प्रकल्पाचे




महत्त्व सांगितले. प्रकल्पाचा उपयोग शेतकऱ्यांनी प्रात्यक्षिकांतून सेंद्रिय व नैसर्गिक शेती तंत्रज्ञान देण्यावर भर दिला पाहिजे व शेतकऱ्यांना व्यावसायिक दृष्टिकोनातून नैसर्गिक व सेंद्रिय शेतीच्या दिशेने वळण्यासाठीच्या तंत्रज्ञानाचा उपयोग केला पाहिजे; त्याचबरोबर प्रशिक्षणानंतर कृषी सखींची मोठी जबाबदारी स्वीकारावी, असे सांगितले.

याप्रसंगी विविध विषयांवर तांत्रिक व्याख्याने घेण्यात आली. यात कृषी विज्ञान केंद्राचे उमेश पाटील, प्रवीण चौहान, डॉ. वैभव गुरवे, डॉ. राठोड, आरती देशमुख यांनी नैसर्गिक शेतीवर होणारे नवनवीन संशोधन यावर विचारमंथन करून शास्त्रज्ञांनी विविध प्रयोग करणे महत्त्वाचे आहे, असे म्हटले.

कृषी सखींनी कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर जीवामृत, बीजामृत, दशपर्णी अर्क व निमास्त्र यांसारखे नैसर्गिक शेतीसाठी लागणारे घटक प्रत्यक्षात बनवून घेतले. यादरम्यान क्षेत्रभेटीसाठी लोणखेडा येथील उद्यानपंडित गणेश भाये- पाटील यांच्या शेतात नैसर्गिक शेतीचे विविध प्रयोगाबद्दल जाऊन घेतले. यावर

उपस्थित कृषी सखींना प्रमाणपत्राचे वितरण करून प्रशिक्षणाचा समारोप झाला. उमेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सहा तालुक्यांतील कृषी सखींचा समवेश होता. यात दोन टप्प्यांत ५५ कृषी सखींनी प्रशिक्षण घेतले.

# व्यापाऱ्याच्या कर्ज प्रकरणी बँकेकडून मिळकतीवर ताबा

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ११ ऑक्टोबर**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे तळोदा येथील व्यापाऱ्याच्या कर्ज प्रकरणी मिळकत ताबा बँकेने घेतला होता, त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधित व्यावसायिकांना न्याय मिळावा, या मागणीचे निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे तळोदा येथील लक्ष्मी ट्रेडिंग कंपनीच्या मनीषा कलाल, नरेंद्रकुमार कलाल, छाया कलाल, प्रकाश कलाल यांनी येथील एका बँकेतून व्यापारासंदर्भात कर्ज घेतले होते. कर्ज परतफेडीची मुदत वीस वर्षे होती. मात्र, मध्येच कोरोना तसेच अन्य संकटे येऊ लागली. त्यामुळे व्यवसाय बंद ठेवावा लागला. उत्पन्नाचे स्त्रोत पूर्णपणे थांबले. त्यामुळे कर्ज थकीत झाले होते. बँकेने त्यांच्या मिळकतीवर ताबा घेण्यासाठी प्रयत्न केला. त्यांनी आपण मला सवलत द्या किंवा वेळ द्या, मी लवकरच कर्ज फेडेल, असे सांगितले. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे कर्जधारकांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल तहसीलदार फडकर यांना निवेदन दिले.




निवेदनावर संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष सुधाकर मोगल, निवृत्ती गारे, महिला जिल्हाध्यक्षा अनिता कोल्हे, मनीषा सोनवणे, उषा मोगल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तसेच यासंदर्भात जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन यांना, तसेच संबंधित बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

# नाभिक समाजाकडून शिवरत्न जिवा महाले यांना अभिवादन!

## दोंडाईचा येथे जयंतीनिमित्त शोभायात्रा; शिबिरात २५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**मेथी (शिंदखेडा), ११ ऑक्टोबर**

दोंडाईचा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू अंगरक्षक शिवरत्न जिवा महाले यांच्या ३९० व्या जयंतीनिमित्त शहरातील नाभिक समाज नवयुवक मंडळातर्फे भव्य शोभायात्रा काढून ज्येष्ठ नागरिक भवनात रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात २५ जणांनी रक्तदान केले.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ नाभिक समाजबांधवांनी शिवरत्न जिवा महाले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. त्यानंतर शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. महेश सैंदाणे यांनी जिवा महाले यांची वेशभूषा, तर मावळे म्हणून अजय ईशी, प्रथमेश सैंदाणे यांनी वेशभूषा परिधान केली होती. शोभायात्रेत सहभागी तिघांनी दोंडाईचावासियांचे लक्ष वेधून घेतले.




शोभायात्रेला सुरुवात होऊन राजपथ रस्ता, मानराज गल्ली, स्टेशन भागमार्गे राममंदिर, महादेवपुरा, ज्येष्ठ नागरिक भवनात समारोप झाला. बन्सीलाल चित्ते, महिला मंडळाच्या अध्यक्षा वत्सला चित्ते यांना अध्यक्षस्थानाचा सपत्नीक मान देण्यात आला. विचारमंचावर ज्येष्ठ समाजसेवक एम. बी. बोरसे, शहराध्यक्ष दिलीप सैंदाणे, दुकानदार संघाचे अध्यक्ष अनिल ईशी, युवक मंडळाचे अध्यक्ष राजेश मिस्त्री, ब्लड बँकेचे प्रमुख चौधरी आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी जिवा महाले यांच्या जीवनपटावर प्रकाशझोत टाकला.

याप्रसंगी नाभिक दुकानदार संघाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र सैंदाणे, तालुकाध्यक्ष रवींद्र चित्ते, माजी अध्यक्ष छोटू महाले, गोकुळ सैंदाणे, बन्सीलाल चित्ते, रमेश मोरे, साहेबराव पवार, छोटू चित्ते, कैलास चित्ते, महेंद्र चित्ते, राजेंद्र मोरे, राजेंद्र सैंदाणे, किरण सूर्यवंशी, अशोक सोनवणे, लोटन पवार, मच्छिंद्र पवार, राजेंद्र सोलंकी, भरत सैंदाणे, बन्सी मोरे, युवक मंडळाचे राजेश मिस्त्री, मुकेश चित्ते, जगदीश ईशी, गुलाब पवार, पत्रकार समाधान ठाकरे, योगेश मिस्त्री, भरत वरसाळे, गणेश पवार, रमेश सैंदाणे, श्रावण भदाणे, संदीप पवार, वीरेंद्र पवार, सोनू पवार, गोपाल बोरसे, दिनेश बोरसे, बंटी मिस्त्री, योगेश सूर्यवंशी, गोपाल पवार, शिवचरण सूर्यवंशी, अजय पवार, जयेश पवार, अर्जुन चित्ते, दीपक सैंदाणे, सागर भदाणे, शरद वरसाळे, जिभाऊ चित्ते, योगेश चित्ते, मल्हारी पवार, विशाल महाले, महिला मंडळाच्या पदाधिकारी उपस्थित होत्या.

**शिबिरात २५ जणांचे रक्तदान**

शिवरत्न जिवाजी महाले यांच्या ३९० व्या जयंतीनिमित्त नाभिक युवक मंडळातर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात पत्रकार समाधान ठाकरे व त्यांची भगिनी नंदा मच्छिंद्र पवार यांनी पहिल्यादाच रक्तदान केले. त्याबद्दल त्यांचा समाजबांधवांकडून गौरव करण्यात आला. शिबिरात २५ जणांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्यांना थर्मास व ब्लड बँकेतर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. शिबिराला धुळे येथील श्रीमती के. सी. अजमेरा रोटरी ब्लड बँकेचे सहकार्य लाभले.

## महत्त्वाचे

### गॅरी कास्पारोव्हचा आनंदवर विजय

**सेंट लुईस** : येथे झालेल्या क्लच चेस : द लेजेंड्स या प्रदर्शनी स्पर्धेत गॅरी कास्पारोव्हने विश्वनाथन आनंदचा पराभव केला. तीन दिवसांत, कास्पारोव्ह आणि आनंदने फ्रीस्टाइल स्वरूपात १२ रॅपिड आणि ब्लिट्झ गेममध्ये भाग घेतला, यात कास्पारोव्हने १३-११ गुणांनी विजय मिळवला. या स्पर्धेत कॅस्केडिंग पॉइंट्स सिस्टमचा वापर करण्यात आला- पहिल्या दिवशी जिंकल्याने एक गुण मिळाला, दुसऱ्या दिवशी दोन गुण मिळाले आणि तिसऱ्या दिवशी तीन गुण मिळाले - ज्यामुळे कास्पारोव्हने दोन डाव शिल्लक असताना आपला विजय निश्चित केला. त्यानंतर आनंदने शेवटचे दोन्ही डाव जिंकले. तीन दिवसांत आनंद मला काही मानसिक अस्वस्थ असल्याचे जाणवले, असे कास्पारोव्ह विजयानंतर म्हणाला. भारताचा पाच वेळा विश्वविजेता विश्वनाथन आनंदविरुद्धच्या पाचव्या डावामध्ये गॅरी कास्पारोव्हला स्पष्ट आघाडी मिळाली. हा सामना रॅपिड फॉरमॅटमध्ये खेळला गेला. तथापि, आनंदला वेळेच्या बंधनाचा विसर पडला आणि शेवटी तो हरला.

### सिमरन, प्रशिक्षक सैफी तात्पुरते निलंबित

**नवी दिल्ली** : जागतिक पॅरा-ॲथ्लेटिक्स स्पर्धेची सुवर्ण विजेती धावपटू सिमरन शर्मा हिला व तिचा मार्गदर्शक उमर सैफीला राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने (नाडा) डोप चाचणीत अपयशी ठरल्याने तात्पुरते निलंबित केले आहे. सिमरनचे पदक हिसकावून घेण्याची शक्यता आहे. सात महिन्यांहून अधिक काळ दृष्टिहीन सिमरनच्या नमुन्यात प्रतिबंधित औषधांचे अंश आढळले आहे. गत ७ सप्टेंबर रोजी दिल्ली स्टेट ओपनमध्ये सिमरनने २०० मीटर शर्यतीचे सुवर्णपदक जिंकले होते, तेव्हा तिची ही डोप चाचणी घेण्यात आली असण्याची शक्यता आहे.

नाड ने शुक्रवारी जारी केलेल्या तात्पुरत्या निलंबित खेळाडूंच्या अद्यतनित यादीत सैफीचे नाव आहे. तो या निष्कर्षाविरुद्ध अपील करू शकतो आणि बी नमुना चाचणी मागू शकतो. २७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या कालावधीत झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी त्याचे नाव नाडाच्या वेबसाइटवर का आले नाही हे स्पष्ट नाही. १०० मीटर टी-१२ सुवर्णपदकाव्यतिरिक्त सिमरनने २०० मीटर शर्यतीत रौप्य पदकही जिंकले. १०० मीटर सुवर्णपदक ही जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिची सलग दुसरी अव्वल कामगिरी होती.

आंतरराष्ट्रीय पॅरालिम्पिक समितीच्या नियमांनुसार, जर सैफी आपले निर्दोषत्व सिद्ध करू शकली नाही तर सिमरन तिचे पदक गमावू शकते.

### अनमोल खरबचे आव्हान संपुष्टात



**वांता, फिनलॅण्ड** : फिनलॅण्डमध्ये आयोजित आर्क्टिक ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत शनिवारी महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत तीन वेळा विश्वविजेत्या अकाने यामागुची हिच्याकडून भारताच्या अनुमोल खरबचा पराभव झाला, या पराभवाबरोबरच भारताचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. एकतर्फी झालेल्या लढतीत अकानेने अनमोल खरबचा २१-१०, २१-१३ असा पराभव केला. पहिल्या गेममध्ये अनमोलने चांगली सुरुवात केली, पहिल्या गेममध्ये ८-९ असा पिछाडीवर असताना यामागुचीला रोखले. मध्यांतरापर्यंत भारतीय खेळाडू ९-११ अशी पिछाडीवर होती, परंतु त्यानंतर ती पूर्णपणे हरली. खेळाच्या मध्यांतरापर्यंत अनमोल ९-११ ने पिछाडीवर होती, त्यानंतर उत्तरार्धात यामागुचीने सामन्यात परकड मजबूत करत केवळ २९ मिनिटांत २१-१०, २१-१३ असा सामना संपवला.

### अटीतटीच्या लढतीत विदर्भ संघाचा पराभव

**जानेफळ** : हरयाणामधील झज्जर येथील सेहवाग इंटरनॅशनल क्रिकेट स्कूलच्या क्रीडांगणावर १९ वर्षाखालील विनू मांकड चषकात विदर्भ विरुध्द गुजरात या दुसऱ्या साखळी सामन्यात गौरव निकमने दमदार खेळी करून ५०.८८ च्या सरासरीने ११४ चेंडूत ५८ धावा काढल्या. यात ५ चौकार आणि एक षटकाराचा समावेश आहे. हा सामना शेवटपर्यंत अत्यंत अटीतटीचा झाला.शेवटी सुपर षटकांमध्ये गुजरात संघाने विदर्भ संघाचा पराभव केला. गुजरातने नाणेफेक जिंकून ५० षटकात ९ गडी गमावून १८३ धावा केल्या. तर, विदर्भाने ५० षटकात ७ गडी गमावून १८३ धावा केल्या. सामनाधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार सुपर षटकांचा सामना खेळला गेला. यात विदर्भाने एका षटकांत १० धावा काढल्या. तर, गुजरात संघाने ५ चेडूत विदर्भाचे आव्हान संपुष्टात आणले. विदर्भाच्या गौरव निकम आणि कुश शर्मा या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ७८ धावांची भागीदारी करुन संघाला मजबूत स्थितीत पोहोचवले. कुश शर्मा ३६ धावांवर धावबाद झाला. त्यानंतर आलेला अर्णव लुंगे शून्यावर तुषार मकवानाच्या चेंडूवर पायचित झाला. त्यानंतर मल्हार दोशी धावपट्टीवर टिकून राहीला. त्याने ७५ चेंडूत ५४ धावा काढल्या. गुजरातच्या वासु देवाणीच्या चेंडूवर गौरव ५८ धावा काढून झेलबाद झाला. हा सामना बरोबरीत सुटला.

# भारताची दुसऱ्या कसोटीतही मजबूत पकड

**शुभमन गिल नाबाद १२९ ● जयस्वालचे द्विशतक हुकले ● नितीश रेड्डीचे अर्धशतक हुकले ● भारत ५ बाद ५१८ डाव घोषित ● वेस्ट इंडीज ४ बाद १४०**


नितीश कुमार रेड्डी


ऐन मोक्याच्या क्षणी यशस्वी जयस्वाल धावबाद

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

शनिवारी अरुण जेटली स्टेडियमवर वेस्ट इंडीजविरुद्धच्या दुसऱ्या व शेवटच्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताने १३४.२ षटकांत ५ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. कालचा नाबाद सलामीवीर यशस्वी जयस्वालचे द्विशतक थोडक्यात हुकले, तर कर्णधार शुभमन गिलने १२९ धावांवर नाबाद राहून कसोटी कारकिर्दीतील आपले यशस्वी वर्ष सुरू ठेवले. हे त्याचे कसोटी क्रिकेटमधील दहावे शतक आहे. प्रत्युत्तर देताना वेस्ट इंडीजने दिवस अखेर पहिल्या डावात ४३ षटकांत ४ गडी गमावित १४० धावा केल्या. वेस्ट इंडीज अजून ३७८ धावांनी पिछाडीवर आहे. एकंदरीत भारताने दुसऱ्या कसोटी सामन्यावरही आपली पकड मजबूत केली असून भारताला विंडीजविरुद्ध पुन्हा डावाने विजय नोंदविण्याची संधी आहे.

कर्णधार शुभमन गिलने १९६ चेंडूंत १६ चौकार व २ षट्कारांसह नाबाद १२९ धावा केल्या. ही त्याची आता घरच्या कसोटी सामन्यातील सर्वोतच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. त्याने मार्च २०२३ मध्ये अहमदाबाद येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध केलेल्या १२८ धावांच्या तुलनेत गिलने हा डाव जिंकला. कर्णधार म्हणून हे त्याचे पाचवे शतक आहे.

ध्रुव जुरेलला वेस्ट इंडीजचा कर्णधार रोस्टन चेसने ४४ धावांवर बाद केल्यानंतर लगेचच ही डाव घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला. गिल व यशस्वी जयस्वालच्या नेतृत्वाखालील प्रभावी फलंदाजीमुळे भारताला ५१८ धावांपर्यंत मजल मारता आली.

भारताने २ बाद ३१८ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली व २०० धावा जोडल्या आणि ५ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. गिल आणि जयस्वालशिवाय ध्रुव जुरेल, बी. साई सुदर्शन (८७) व नितीश कुमार रेड्डी (४३) यांच्या योगदानामुळे भारताने आपल्या संपूर्ण फलंदाजी डावात गती कायम राखली. गिलचा डाव नियंत्रण आणि वेगवान वेळेने भरला आणि अर्धशतक गाठल्यानंतर त्याने वेगवान स्ट्रोकप्लेने नाबाद राहण्याचा वेग वाढवला.

भारताचे लक्ष आता आपल्या फिरकी त्रिकुटावर- रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या कामगिरीवर केंद्रित असेल. ते बदलत्या उसळीच्या लक्षणांचा फायदा घेऊन काळ्या मातीच्या खेळपट्टीवर वळतील अशी अपेक्षा आहे.

अहमदाबादमधील गत कसोटीच्या दोन्ही डावात ५० षटके फलंदाजी करण्यात अपयशी ठरलेला वेस्ट इंडीज यावेळी अधिक लवचिकता दाखवण्याची आशा करेल, कारण खेळपट्टी अजूनही अहमदाबादपेक्षा फलंदाजीसाठी अधिक अनुकूल आहे.

**जयस्वालची इच्छा अपूर्ण**

दुसऱ्या दिवसाची सुरुवात भारतासाठी निराशाजनक झाली. यशस्वी जयस्वालची तिसरे कसोटी द्विशतक झळकवण्याची इच्छा दुसऱ्या षटकात एका विचित्र धावपळीत संपली. जयस्वालने चेंडू मिड-ऑफकडे फटकावल्यानंतर जलद एक धाव घेतली, परंतु गिलने त्या आवाहनाला नकार दिला. पण तोपर्यंत, टॅगेनरीन चंद्रपॉलने चेंडू यष्टिरक्षकाच्या टोकाला थेट मारला. जयस्वालने खेळपट्टीच्या अर्ध्याहून अधिक अंतरावर धावा घेतली असताना एक निराशाजनक वळण घेतले व यष्टिरक्षक तेव्हिन इमलाचने त्याला धावबाद केले. यशस्वी जयस्वालने २५८ चेंडूंत २२ चौकारांच्या मदतीने १७५ धावांची दिमाखदार खेळी केली.

पाचव्या क्रमांकावर खेळण्याची संधी मिळालेल्या नितीश कुमार रेड्डीला दुसऱ्या चेंडूवर जेडेन सील्सच्या गोलंदाजीवर एलबीडब्ल्यूचा धक्का बसला. नितीशने ५४ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारसह ४३ धावा केल्या. नितीशला आपले अर्धशतक पूर्ण करण्यासाठी सात धावा कमी पडल्या. नितीशने गिलसोबत चौथ्या गड्यासाठी ९१ धावांची भफागीदारी केली.

## शतक झळकावित गिलने घडवला इतिहास

### रोहित शर्माचा विक्रम मोडला

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**



भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिल कसोटी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट फॉर्म दाखवत आहे. शनिवारी त्याने वेस्ट इंडीजविरुद्ध दिल्ली कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शतक झळकावले. भारताच्या पहिल्या डावाच्या १३० व्या षटकात खॅरी पियरेच्या पाचव्या चेंडूवर तीन धावा काढून शुभमनने आपले १० वे कसोटी शतक पूर्ण केले. शुभमनने १७६ चेंडूत १३ चौकार व एक षटकार मारत आपले शतक पूर्ण केले.

कर्णधार म्हणून १२ डावांमध्ये शुभमन गिलचे हे पाचवे कसोटी शतक आहे. शुभमनपेक्षा कमी डावांमध्ये कर्णधार म्हणून इतके शतके झळकावणारे केवळ ॲलिस्टर कुक (९ डाव) व सुनील गावस्कर (१० डाव) आहेत.

शुभमनने या वर्षी पाच कसोटी शतके झळकावली आहेत. एका कॅलेंडर वर्षात कर्णधार म्हणून पाच कसोटी शतके झळकावणारा तो दुसरा भारतीय आहे. शुभमनपूर्वी केवळ विराट कोहलीने दोनदा ही कामगिरी केली होती. शुभमन गिल आता जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेमध्ये सर्वाधिक शतके करणारा भारतीय फलंदाज झाला आहे. त्याने रोहित शर्माचा विक्रम मोडला. रोहितने डब्ल्यूटीसीमध्ये ९ शतके केली होती. गिलने आतापर्यंत ७१ डावांमध्ये १० शतकांसह ४३.४७ च्या सरासरीने २,८२६ धावा केल्या आहेत. तो डब्ल्यूटीसीमध्ये सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाजही झाला आहे, त्याने रोहित शर्माला मागे टाकले आहे. रोहितने २,७१६ धावा केल्या होत्या.

**एका कॅलेंडर वर्षात पाच कसोटी शतके (भारतीय कर्णधार)**

**२०१७ - विराट कोहली**
**२०१८ - विराट कोहली**
**२०२५ - शुभमन गिल**

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचा फलंदाजीवर भर

### महिला वन-डे विश्वचषक

◆ **विशाखापट्टणम, ११ ऑक्टोबर**

आयसीसी महिला एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत रविवारी भारतीय महिलांचा गत विजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध साखळी सामना खेळला जाणार आहे. भारतीय संघ पुन्हा विजयाच्या मार्गावर परतण्यास उत्सुक असून त्याकरिता भारतीय संघाला अव्वल फळीतील फलंदाजीमध्ये सुधारणा करावी लागेल त्याचप्रमाणे सहाव्या गोलंदाजीच्या पर्यायावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

गुरुवारी दक्षिण आफ्रिकेकडून भारतीय संघाचा तीन गड्यांनी झालेल्या पराभवामुळे सर्व परिस्थितीत पाच गोलंदाजांच्या खेळाच्या मर्यादा उघड झाल्या.

सहाव्या गोलंदाजाच्या अनुपस्थितीत कर्णधार हरमनप्रीत कौरने ऑफ-स्पिन गोलंदाजी केली, परंतु ४० व्या षटकानंतर दक्षिण आफ्रिकेने वेगवान गोलंदाजांना लक्ष्य केल्यावर घरच्या संघाला कल्पनाच उरल्या नाहीत. क्रांती गौड व अमनजोत कौरने ४७ व्या व ४९ व्या षटकात १२ चेंडूत ३० धावा दिल्या आणि दक्षिण आफ्रिकेने २५२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले.


हरमनप्रीत कौर


एलिसा हिली

सध्याच्या भारतीय गोलंदाजी संघात दोन उजव्या हाताचे वेगवान गोलंदाज (गौड, कौर), दोन ऑफ-स्पिनर (दीप्ती शर्मा, स्नेह राणा) व एक डावखुरा फिरकी गोलंदाजाचा (श्री चरणी) समावेश आहे.

जर पुन्हा संकट आले तर भारताला सहाव्या गोलंदाजाची आवश्यकता असेल आणि हरमनप्रीतची अर्धवेळ फिरकी गोलंदाजी ऑस्ट्रेलियासारख्या संघाविरुद्ध तोफखान्यापेक्षा अधिक काही नाही. ऑस्ट्रेलियाकडे ॲशले गार्डनर, एलिसा हिली, एलिस पेरी इत्यादी उत्कृष्ट फलंदाज आहेत, पण भारताकडे सहाव्या गोलंदाजाची निवड करणे देखील सोपे पर्याय नाही.

**राणाच्या जागी राधाला संधी**

भारताकडे अनुभवी राधा यादवच्या रूपात डावखुरी फिरकी गोलंदाज आहे. ती तळाच्या फळीतही चांगली फलंदाज आहे. राणाच्या जागी तिला संधी मिळण्याची शक्यता आहे, परंतु ऑस्ट्रेलियाकडे बेथ मुनीव आणि सलामीवीर फोबी लिचफिल्ड या दोन डावखुरी गोलंदाज आहेत. बेथ मुनीने गत सामन्यात पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावले होते. कदाचित अमनजोतऐवजी वेगवान गोलंदाज अरुंधती रेड्डीला संधी देऊ शकतो. भारत हरलीन देओलच्या जागी यादवला घेण्याचा विचार करू शकतो.

**आजचा सामना**
**भारत वि. ऑस्ट्रेलिया**
**स्थळ** : एसीए-व्हीडीसीए स्टेडियम, विशाखापट्टणम्
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**अव्वल फळीतील चिंता**

भारतीय अव्वल फळीतील फलंदाजांचे संघर्ष या एकदिवसीय सामन्यात वारंवार घडत आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध हे वास्तवात रूपांतरित झाले. त्याउलट ऑस्ट्रेलियाकडे वैविध्यपूर्ण आणि कुशल आक्रमण आहे.

स्मृती मंधाना, हरमनप्रीत कौर व जेमिमाह रॉड्रिग्ज यांचे मोठे योगदान सात वेळा विजेत्या संघाविरुद्ध फारसे चांगले नाही. मंधानाला अधिक दर्जेदार खेळ करावा लागेल.

# भारतीय कनिष्ठ संघाची विजयी सलामी

**सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी**


भारत आणि ग्रेट ब्रिटनदरम्यानच्या हॉकी सामन्यातील एक अटीतटीचा क्षण

◆ **जोहोर बाहरू, ११ ऑक्टोबर**

भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघाने शनिवारी येथे ग्रेट ब्रिटनवर ३-२ अशी मात करून सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी स्पर्धेत आपल्या मोहिमेची शानदार सुरुवात केली. कर्णधार रोहितने दोन गोल करून उत्कृष्ट कामगिरी केली.

भारताकडून रोहित (४५+, ५२ व्या मिनिटाला) आणि रवनीत सिंगने (२३ व्या मिनिटाला) गोल केले, तर ग्रेट ब्रिटनकडून मायकेल रॉयडेन (२६) आणि काडेन ड्रेसेने (४६) गोल केले.

पहिल्या चरणत दोन्ही संघांनी एकमेकांविरुद्ध चिवट झुंज दिली, पण कोणताही संघ संरक्षण भिंत भेदू शकला नाही. १३ व्या मिनिटाला भारताला पहिला पेनॉल्टी कॉर्नर मिळाला, पण त्यांना ग्रेट ब्रिटनच्या खेळाडूंनी रोखले. १६ व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनॉल्टी कॉर्नर मिळाला, पण ग्रेट ब्रिटनच्या गोलरक्षकाने शिताफने गोल वाचवला.

२२ व्या मिनिटाला मनमीत सिंग गोल करण्याच्या जवळपास पोहोचला होता, परंतु ब्रिटनच्या बचावफळीने त्याचे मनसुबे उधळून लावले. तथापि, अखेर पुढच्याच मिनिटाला भारताला आपला पहिला गोल मिळाला. रवनीतने २३ व्या मिनिटाला शैलीदारपणे चेंडू जाळ्यामध्ये टाकला. काही क्षणांनंतर, २६ व्या मिनिटाला ग्रेट ब्रिटनने बरोबरीचा गोल केला. कर्णधार मॅक्स अँडरसनने उजवीकडून मायकेल रॉयडेनला पास केला व त्याने डाव्या कोपऱ्यात चेंडू टाकला.

तिसऱ्या चरणाची सुरुवात दोन्ही संघांनी चेंडूवर ताबा मिळवत गोल करण्याचा प्रयत्न केला. ४५ व्या मिनिटाला ग्रेट ब्रिटनला पेनॉल्टी कॉर्नर मिळाला पण भारतीय गोलरक्षक प्रिन्स दीप सिंगने शानदार बचाव केला. काही सेकंदांनंतर भारतालाही मैदानाच्या दुसऱ्या टोकाला पेनॉल्टी कॉर्नर मिळाला. रोहित (४५+) या वेळी पुढे आला व गोल करून भारताला पुन्हा आघाडी मिळवून दिली. ४६ व्या मिनिटाला ग्रेट ब्रिटनला पेनॉल्टी स्ट्रोक मिळाला, त्याचे रूपांतर काडेन ड्रेसीने (४६) करून पुन्हा ग्रेट ब्रिटनला बरोबरीवर आणले. भारताला अनुक्रमे ५० व्या, ५१ व्या आणि ५२ व्या मिनिटाला सलग पेनल्टी कॉर्नर मिळाले आणि पहिल्या दोन संधींचा फायदा उठवता आला नाही, तरी रोहितने तिसऱ्या प्रयत्नात एक शानदार स्ट्राइक करून आघाडी मिळवली आणि भारताचा विजय मिळवला. भारताचा पुढचा सामना रविवारी न्यूझीलंडशी होईल.

# विश्व पॅरा ॲथ्लेटिक्स पदकविजेत्यांना १.०९ कोटींपेक्षा जास्त रोख बक्षिसे

◆ **नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर**

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी शनिवारी नवी दिल्ली येथे नुकत्याच संपलेल्या जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेत्यांचा सत्कार केला आणि १.०९ कोटी रुपयांपेक्षा जास्त रोख बक्षिसे प्रदान केली.

२७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान नवी दिल्लीत झालेल्या या विश्वस्पर्धेत भारताने सहा सुवर्ण, नऊ रौप्य आणि सात कांस्यपदकांसह २२ पदके जिंकली. पॅरा खेळाडूंना १.०९ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे बक्षीस प्रदान करण्यात आली, असे भारतीय क्रीडा प्राधिकरणाने (साई) एका निवेदनात म्हटले आहे.


पदकविजेत्यांच्या सत्कार प्रसंगी क्रीडा मंत्री मनसुख मांडविया व इतर मान्यवर

तथापि, टी-१२ मध्ये १०० मीटर सुवर्ण व २०० मीटर रौप्यपदक जिंकणारी दृष्टिहीन धावपटू सिमरन शर्मा, तिचा मार्गदर्शक उमर सैफीला राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने (नाडा) डोप चाचणीत अपयशी ठरल्यामुळे तात्पुरते निलंबित केल्यामुळे ते या समारंभात सहभागी झाले नाही.

क्रीडा मंत्रालयाच्या धोरणानुसार, पॅरा-स्पोर्ट्समधील वार्षिक जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्यांना वैयक्तिक स्पर्धांमध्ये १० लाख रुपये मिळण्यास पात्र आहेत, तर रौप्य आणि कांस्यपदक विजेत्यांना वैयक्तिक स्पर्धांमध्ये ७ लाख रुपये आणि ४ लाख रुपये मिळतात.

### म्लाबाला मिळाला डिमेरिट पॉइंट

◆ **विशाखापट्टणम्, ११ ऑक्टोबर**

महिला विश्वचषकात भारताविरुद्धच्या सामन्यादरम्यान दक्षिण आफ्रिकेच्या डावखुऱ्या फिरकीपटू नोनकुलुलेको म्लाबाने आयसीसीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल डिमेरिट पॉइंट मिळाला.

भारताच्या डावाच्या १७ व्या षटकात ही घटना घडली, जेव्हा हरलीन देओलला बाद केल्यानंतर म्लाबाने फलंदाजाला हात लावला आणि निरोप दिला.

# भारत, जपानला कांस्यपदक प्रदान

### जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन



कांस्यपदक विजेता भारतीय कनिष्ठ बॅडमिंटन संघ

◆ **गुवाहाटी, ११ ऑक्टोबर**

बलाढ्य चीन बॅडमिंटन संघाने शनिवारी येथे झालेल्या जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या मिश्र सांघिक अंतिम सामन्यात गतविजेत्या इंडोनेशियाला २-० असे हरवून १५ व्यांदा सुहांदीनाता चषक जिंकला.

चीनने आशियाई ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेत तीन वैयक्तिक सुवर्णपदक विजेते व दोन रौप्यपदक विजेते खेळाडूंसह अंतिम फेरीत प्रवेश केला आणि गत वर्षी जिंकलेले विजेतपद राखण्यासाठी इंडोनेशियाला आपल्या काही खेळाडूंकडून विशेष कामगिरीची आवश्यकता होती. परंतु चिनी खेळाडूंना थांबता आले नाही, कारण त्यांनी इंडोनेशियन खेळाडूंना ४५-३०, ४५-४४ असे दोन तासांत पराभूत करून विजेतपद पटकावले.

उपांत्य फेरीत पराभूत झालेल्या भारत आणि जपान संघाला कांस्यपदक प्रदान करण्यात आले. बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन स्पर्धेत रविवारी विश्रांतीचा दिवस असेल आणि सोमवारपासून आय लेव्हल चषकासाठी वैयक्तिक बॅडमिंटन स्पर्धा सुरू होतील.

# आंध्र प्रदेश संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी गॅरी स्टेड

### एक चांगला संघ घडविण्याची संधी

◆ **विशाखापट्टणम्, ११ ऑक्टोबर**

मला एक चांगला संघ घडविण्याची संधी आहे. ही जबाबदारी मला काही नवीन शिकण्याची व माझ्या प्रशिक्षण ज्ञानाचा आधार वाढवेल, असे गॅरी स्टेड म्हणाले.

आगामी रणजी करंडक हंगामासाठी आंध्र प्रदेश क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून गॅरी स्टेड यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. न्यूझीलंडला विश्वचषक जेतेपद, २०२१ मध्ये टी-२० विश्वचषक अंतिम फेरी, २०१९ मध्ये एकदिवसीय विश्वचषक अंतिम फेरी आणि २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जेतेपदापर्यंत नेणारे गॅरी स्टेड यांच्यावर आता आंध्र क्रिकेटला चालना देण्याचे काम सोपवण्यात आले आहे.



मी माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर आहे असे मला वाटते. मी स्वतःला थोडे बाहेर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे आणि मला वाटते की या भूमिकेबद्दल अस्वस्थ वाटेल, परंतु मी निश्चितच पुढील आव्हानाची वाट पाहत आहे, असे स्टेड यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये काम करणाऱ्या परदेशी प्रशिक्षकांमध्ये स्टेड याचा समावेश झाला आहे, यात डेव्ह व्हॉटमोर, मायकेल बेवन, इंतिखाब आलम, डॅरेन होल्डर, शॉन विल्यम्स, डर्मोट रीव्ह आणि अल्विन कल्लीचरण यांचा समावेश आहे.

आंध्र क्रिकेट संघटनेचे (एसीए) अध्यक्ष के. शिवनाथ आणि सचिव एस. सतीश बाबू यांनी तीन महिन्यांच्या तीव्र वाटाघाटी दरम्यान त्यांना दिलेल्या दृष्टिकोनामुळे ते प्रभावित झाले आहेत असे स्टीड म्हणाले.

मी इथे येऊन संघासोबत काम करण्यास खूप उत्सुक आहे. प्रशिक्षकाची भूमिका म्हणजे संघाला चांगले बनवण्याचा प्रयत्न करणे आणि संघातील व्यक्तींना चांगले बनवण्याचा प्रयत्न करणे. मी येथे असताना निश्चितच माझे लक्ष असेल, असे ५३ वर्षीय गॅरी स्टेड म्हणाले.

गॅरी स्टेड हे भारतीय परिस्थितीशी परिचित आहे. त्यांनी न्यूझीलंडचे प्रशिक्षक म्हणून अनेक वेळा भारताचा दौरा केला आहे. गत वर्षी त्यांनी भारताला ३-० ने कसोटी मालिकेत व्हाईटवॉश दिला होता.

अनुभव मला माझ्या नवीन भूमिकेत मदत करेल. प्रशिक्षणाविषयी माझे तत्वज्ञान म्हणजे खेळाडूंना त्यांचे स्वतःचे सर्वोत्तम प्रशिक्षक करण्याचा प्रयत्न करणे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### अपंग महासंघाची दिव्यांग योजनेविषयी बैठक

**धरणगाव** : तालुक्यातील अपंग महासंघाची संजय गांधी निराधार योजनेसंबंधी नुकतीच तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांच्यासोबत बैठक झाली. याप्रसंगी दिव्यांगांना मिळणारे वाढीव अनुदानाविषयी चर्चा करण्यात आली. दिव्यांग कार्ड म्हणजे यूडीआयडी लहान, मोठे कार्ड व सर्टिफिकेट झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स तसेच त्यावर सही व मोबाईल नंबर, बँक पुस्तक झेरॉक्स ही कागदपत्रे लवकरात लवकर जमा करावीत. वरील कागदपत्रे संजय गांधी निराधार विभाग येथे जमा केल्यानंतरच दरमहा २५०० रुपये जमा होतील, असे आवाहन दिव्यांग तालुका अध्यक्ष संजय पाटील यांनी सर्व दिव्यांगांना आवाहन केले आहे. यावेळी पदाधिकारी व दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### धावत्या रेल्वेखाली झोकून देत प्रौढाची आत्महत्या

**चाळीसगाव** : धावत्या रेल्वेखाली झोकून देत प्रौढाने आत्महत्या केल्याची घटना ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. मुंबईकडून भुसावळकडे जाणाऱ्या हरिद्वार एक्सप्रेसखाली झोकून देत दत्तू देशमुख (वय ४५, रा. संगम हॉटेलजवळ, धुळे रोड, चाळीसगाव) असे मयताचे नाव आहे. चाळीसगाव रेल्वे स्टेशन प्लॉट फॉर्म क्रमांक २ च्या पुढे खांब क्रमांक ३२७/२९ जवळ हरिद्वार एक्सप्रेसखाली झोकून देत त्यांनी आत्महत्या केली. या घटनेनंतर रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व मृत व्यक्तीस ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. पुढील तपास पोलीस हवालदार राहुल पाटील हे करत आहे



### अंजनविहिरे येथे किटकजन्य आजारांविषयी मार्गदर्शन

**भातखंडे बुद्रूक** (ता,भडगाव) : किटकजन्य आजार प्रादूर्भाव रोखण्यासाठी डास, चिलटांसह किटकांची उत्पत्ती प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक घरोघरी आठवड्यातून एक दिवस पिण्याचे पाण्याचे माठ, हौद, मोठे भांडे आदी स्वच्छ करून कोरडे ठेवावे, तसेच पाण्याच्या टाक्या, हौद, पिंप, माठ आदीवर घट्ट झाकण ठेवून कोरडा दिवस पाळल्यास डास चिलटांची उत्पत्ती रोखण्यास मदत होईल, अशी माहिती आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.समाधान वाघ यांच्या मार्गदर्शनानुसार भडगाव तालुक्यातील अंजनविहीरे येथील जि.प. शाळेत पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक भोसले व डॉ. नीलेश देसले, आरोग्य निरीक्षक संजय सोनार, कळवाडीकर यांनी विद्यार्थ्यांना किटकजन्य आजारांविषयी मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने दिलेली माहिती आपल्या घरात, गल्लीत व संपूर्ण गावात सांगून जनजागृती करण्याविषयी सोनार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले. यावेळी भातखंडे येथील समुदाय अधिकारी रश्मी अहिरे, दिनेश ठाकरे, आरोग्य सेवक योगेंद्र विसपुते, आरोग्य सेविका अर्चना धनगर, आशा स्वयंसेविका आशा पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अमर बर्डे यांनी केले. आभार चंद्रकला चव्हाण यांनी मानले.

### मुक्ताईनगर येथे घरासमोरूनच मोटरसायकलची चोरी

**मुक्ताईनगर** : शहरातील प्रवर्तन चौकाजवळच राहत असलेल्या पत्रकार सचिन अरविंद झनके यांच्या मालकीची मोटरसायकल भर दुपारी घराच्या समोरून चोरून नेल्याची घटना घडली आहे. शनिवार रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास सचिन झनके यांच्या मालकीची हिरो कंपनीची पॅशन प्रो मोटरसायकल क्रमांक एमएच-१९ सी.एस.-७९७७ ही दारासमोर लावलेली असताना अज्ञात चोरट्याने मोटरसायकलचे लॉक तोडून ती चोरून नेल्याची घटना घडली आहे. मोटरसायकल चोरीस जाताना सीसीटीव्ही मध्ये स्पष्ट दिसत आहे. सीसीटीव्ही च्या माध्यमातून शोध घेतला असता ही म ोटरसायकल वरणगाव रस्त्याने अज्ञात चोरटा पळवून नेत असताना पोलिसांना आढळून आले आहे. घराच्या समोरच लावलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी पळवून नेल्याने नागरिकांमध्ये व वाहनधारकांमध्येसुद्धा भीतीचे वातावरण पसरलेले आहे.

### जळगावातील श्रीराम मंदिरात आज भजन

**जळगाव** : शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्रीराम मंदिर येथे रविवारी १२ ऑक्टोबर रोजी वै. पुष्पाई बाळकृष्ण महाराज जोशी यांच्या नवम मासिक पुण्यतिथीनिमित्त दुपारी ४ वा. भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुपारी ५ वा. भगीरथ इंग्लिश स्कूल शाळेच्या माजी शिक्षिका रजनी पाठक यांचे श्री संत जनाबाई या विषयावर व्याख्यान होईल भाविकांनी भजन व व्याख्यान श्रवणाचा लाभ घ्यावा.असे आवाहन रश्मी जोशी व श्रीराम मंदिर संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

### खळ्यातून ट्रॅक्टर नेले चोरुन

**जळगाव** : खळ्यात लावलेले ट्रॅक्टरचे धुड चोरट्यांनी चोरुन नेले. ही घटना १ ऑक्टोबर रोजी दुपारी गोरगावले खु (ता.चोपडा) येथे उघडकीस आली. याप्रकरणी अडावद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रकाश हैबत बावचे (वय ४७,रा. खडगाव पोस्ट गोरगावले येथे वास्तव्यास आहेत. त्यांच्या मालकीचे सुमारे एक लाख किमतीचे ट्रॅक्टर आहे. ट्रॅक्टर धुड नांदुरुस्त झाल्याने त्यांचा मुलगा धनराज बावचे यांनी गोरगावले येथील ओळखीचे वैभव पाटील यांच्या खळ्यात लावले होते. चोरट्याने हे ट्रॅक्टरचे धुड चोरुन नेले. ३० सप्टेंबर रात्री आठ वाजेपासुन ते १ ऑक्टोबर दुपारी दोन वाजेदरम्यान हा प्रकार घडला. बावचे कुटुंबियांनी परिसरात सर्वत्र ट्रॅक्टरचा शोध घेतला असता तपास लागला नाही. या प्रकरणी तक्रार दिल्यानुसार अडावद पोलीस ठाण्यात शुक्रवारी (१० ऑक्टोबर) गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी घटनास्थळी जावुन माहिती घेतली. हवालदार संजय धनगर हे तपास करीत आहेत.



### इंडिया पोस्ट ऑफिस स्कीम्स अँड बेनिफिट्सवर चर्चा

**जळगाव** : गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग येथे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत इंडिया पोस्ट ऑफिस स्कीम्स अँड बेनिफिट्स या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये विविध योजना व त्यांचे फायदे, जीवनमूल्य, तसेच संचय आणि गुंतवणूक या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोस्ट विभागाचे शेखर इंगळे यांनी उपस्थित राहून माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांच्यासोबत सतीश पाटील यांनीही माहिती दिली. कार्यक्रमाचे उद्दिष्ट अध्यापक व विद्यार्थ्यांना बचत, गुंतवणूक आणि विविध सरकारी योजनांची माहिती देणे हे होते. या उपक्रमाद्वारे उपस्थित सर्वांना भविष्यातील आर्थिक नियोजनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

# अतीवृष्टीच्या यादीत चाळीसगाव तालुक्याचा समावेश

## आमदार मंगेश चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**चाळीसगाव, ११ ऑक्टोबर**



यंदा सप्टेंबर अखेर जळगाव जिल्ह्यात विशेषतः पाचोरा भडगाव आणि चाळीसगाव तसेच पूर्व भागात रावेर, मुक्ताईनगर, जामनेर आदि परिसरात १०० ते ८४ मिलीमिटर अतीवृष्टी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे नदी नाल्यांना पूरस्थितीसह शेतजमीनी खरवडून गेल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. यात शासनस्तरावरून १० ऑक्टोबर रोजी चाळीसगाव तालुक्याच्या बाधीत क्षेत्राच्या यादीत समावेश केला असल्याने अतीवृष्टी नुकसान मदतीसंदर्भात आमदार मंगेश चव्हाण यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

यंदा महाराष्ट्र राज्यासह जळगाव जिल्ह्यालाही अतिवृष्टीचा फटका बसलेला आहे. यात चाळीसगाव तालुक्यात सुमारे १३७ गावांमध्ये ७३ हजार ३९८ शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे शेतपिकांसह पशुधनहानीचा फटका बसला आहे. त्यातच तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा असतानाच महापूर व अतिवृष्टी मदतीसाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या विशेष पॅकेजच्या शासन निर्णयात चाळीसगाव तालुक्यातील एकाही गावाचा समावेश नव्हता. त्यामुळे शेतकऱ्यांनी आमदार मंगेश चव्हाण यांचेकडे धाव घेतल्यानंतर आमदार चव्हाण यांनी चाळीसगाव तालुका अतिदृष्टी नुकसानीच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

आमदार चव्हाण यांनी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन व शासनाचे सचिव यांच्यासमवेत संपर्क साधून तालुक्यातील झालेल्या नुकसानीची बाब त्यांच्या निदर्शनास लक्षात आणून दिली. त्यानंतर वरिष्ठ स्तरावरून सुधारित यादीत चाळीसगाव तालुक्याचे नाव आले असून अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना मदत मिळणार असून त्यांची दिवाळी गोड होणार असल्याच्या निर्णयाम ुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी आ. मंगेश चव्हाण यांचे आभार मानले आहेत.

# राजकिय पक्षांना मतदार याद्या देण्यास नकार!

## तीन दिवसांनी दिली संकेत स्थळाची लींक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑक्टोबर**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद,महापािलका व नगरपािलका निवडणूकीच्या प्रारूप मतदार याद्या निवडणूक आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यावर हरकती मागविण्यात आल्या आहेत. परंतु राजकीय पक्षाना निवडणूक याद्या देण्यास आयोगाने नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. हरकती कमी प्रमाणात याव्यात यासाठी हा प्रयत्न केला असल्याचा आरोपही राजकीय पक्षाच्या नेत्यांनी केला आहे.हे केवळ जिल्हयातच नव्हे तर राज्यभरात अशी स्थिती असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

### संकेतस्थळावर विनाफोटोची यादी

राज्य निवडणूक आयोगाने प्रिंट प्रारूप यांदी राजकीय पक्षाना उपलब्ध केलेली नाही. तक्रारी केल्यानंतर संकेत स्थळाची लिंक देण्यात आली आहे. परंतु या संकेतस्थळावरील यादीही मतदाराच्या विनाफोटोची असल्याचा आरोपही करण्यात आला.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका जाहिर झालेल्या नाहीत मात्र प्रशासकीय पातळीवर जोरदार तयारी सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. पंचायत समितीचे सभापतीपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे, याशिवाय नगरपालिका व महापालिका अध्यक्षपद तसेच प्रभाग रचनाही अंतीम करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय पातळीवर निवडणूकांची जोरदार तयारी सुरू आहे. प्रारूप मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद,नगरपालिका व महानगरपालिका यांच्या प्रारूप मतदार याद्या ८ ऑक्टोबरला जाहीर केल्या आहेत. त्यावर हरकती मागविण्यात आल्या असून त्याची मुदत १४ ऑक्टोबरपर्यंत आहे.

**राजकीय पक्षाना याद्या नाहीत**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या मतदार याच्या निवडणूक आयोगाने प्रसिध्द केल्या असल्या तरी त्या राजकीय पक्षाना देण्यात आलेल्या नसल्याचा आरोप राजकीय पक्षानी केला आहे. लोकसभा,विधानसभा निवडणूकीत याद्या दिल्या जात असतात. मग स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत या प्रारूप याद्या का दिल्या जात नाहीत असा प्रश्नही राजकीय पक्षांनी उपस्थित केला आहे. जर याद्या उपलब्ध नसतील तर राजकीय पक्ष तसेच सर्वसामान्य जनतेने हरकती घ्यायच्या कशा असा प्रश्नही केला आहे.

# पाचोरा प्रांताधिकारी कार्यालय समोरील उपोषणकर्त्याची प्रकृती खालावली

**पाचोरा, ११ ऑक्टोबर**



तालुक्यातील आदिवासी टोकरे कोळी, महादेव कोळी आणि मल्हार कोळी या अनुसूचित जमातीच्या नागरिकांना वर्षानुवर्षे सबळ पुरावे असूनही अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळत नसल्याच्या निषेधार्थ पाचोरा येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोर आमरण अन्नत्याग उपोषण सुरू करण्यात आले असून प्रशासनाने दखल न घेतल्याने शनिवारी तिसऱ्या दिवशी ही उपोषण सुरूच असल्याने उपोषण कर्त्याची प्रकृती खालावली आहे.

डॉक्टर देखील या ठिकाणी हजर राहत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. उपोषण कर्ते संदीप मच्छिंद्र कोळी (रा. आखतवाडे, ता. पाचोरा) यांनी आपल्या जाती बांधवांच्यावतीने हे उपोषण सुरू केले असून, त्यांच्या म्हणण्यानुसार संबंधित जातीचे सर्व पुरावे, दस्तऐवज असूनही प्रशासनाकडून प्रमाणपत्र नाकारले जात आहे, किंवा प्रक्रिया प्रलंबित ठेवली जात आहे. आम्ही शैक्षणिक, नोकरी व शासनाच्या विविध योजनांपासून वंचित राहिलो आहोत. ही सामाजिक अन्यायाची परिसीमा आहे.

शासनाने त्वरित लक्ष घालून आमच्या न्याय हक्कांची पूर्तता करावी, असे कोळी यांनी सांगितले आहे. या उपोषणाला तालुक्यातील विविध कोळी समाज बांधवांचा पाठिंबा असून, प्रशासनाने त्वरित निर्णय घेऊन उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे किशोर रायसाकडा यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.



# कचरा संकलनाला जळगावातील नागरिकांचा विरोध

**जळगाव** : शहरातील रिलायन्स पेट्रोल पंप समोरील सम्राट कॉलोनी, टी. एम. नगर, येथील नागरी वस्तीत होऊ घातलेल्या मनपाच्या कचरा संकलन केंद्र व लिफ्टिंग रॅमला आरोग्याच्या कारणारून विरोध दर्शविला आहे. या परिसराला लागूनच लोकवस्ती, मंदिर, अंगणवाडी, मुलांना खेळायचे मैदान आणि समोर नेत्रज्योती हॉस्पिटल आहे.

या परिसरातील नागरिकांनी मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेत संतप्त भावना व्यक्त केल्या. त्यामुळे मंत्री गिरीश महाजन यांनी या कचरा संकलन प्रकल्पाला स्थगिती देण्याबाबत आयुक्तांना आदेश दिले जातील, असे आश्वासन दिले.

# लवकर निदान झाल्यास कर्करोग बरा होऊ शकतो : डॉ. गिरीश ठाकूर

## कर्करोग जागरूकता निमित्त पथनाट्याचे जीएमसीत सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑक्टोबर**

आंतरराष्ट्रीय स्तन कर्करोग जागरूकता महिनानिमित्त तसेच शासनाच्या 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियान अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे शल्यचिकित्सा विभागाच्यावतीने पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी, लवकर निदान झाल्यास जीव वाचतो. त्यासाठी तपासणी लवकर करा. स्तनाच्या कर्करोगाच्या तपासणीसाठी ओपीडी क्रमांक ११४ ला भेट द्या, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उप अधिष्ठाता तथा शल्यचिकित्सा विभागप्रमुख डॉ. मारोती पोटे, प्रा. डॉ. विश्वनाथ



पुजारी, डॉ. दीपक शेजवळ, डॉ. मोनिका युनाती, डॉ. सुखदा बुवा, अधिसेविका संगीता शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्तनाच्या कर्करोगाविरुद्ध एकत्र उभे राहणे हि यावेळची थीम आहे. जेव्हा आपण एकत्र उभे राहतो तेव्हा आपण अधिक मजबूत होतो. तुम्ही कर्करोगातून बचावलेले असाल किंवा बदल घडवू इच्छिणारे असाल तर समाजात मदतीसाठी तुमचा आवाज आणि कृती महत्त्वाची असतात, अशी माहिती प्रस्तावनेतून नोडल अधिकारी सहयोगी प्रा.डॉ. संगीता गावित यांनी दिली.

**पथनाट्याद्वारे जागृती**

यावेळेला एमबीबीएसचे विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. कर्करोग जीवघेणा जरी असला तरी लवकर निदान झाल्यास कर्करोगातून पूर्ण बरा होऊन रुग्ण सामान्य जीवन जगू शकतो असा संदेश पथनाट्यातून देण्यात आला. प्रसंगी अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून मार्गदर्शन केले. यावेळी सहयोगी प्रा.डॉ. संगीता गावित, सहयोगी प्रा.डॉ. रोहन पाटील, सहायक प्रा.डॉ. मिलिंद चौधरी, डॉ. समीर चौधरी, डॉ. तुषार चौधरी, वरिष्ठ निवासी डॉ. कृतिका मखमले, सहायक अधिसेवक तुषार पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शर्वरी कदम यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. अमेय नेहेते, डॉ. अश्विनी चौरे, डॉ. महेश वाघ, डॉ. संकेत जैन यांच्यासह विद्यार्थी, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सुंदर माझा परिवार अंतर्गत १९ ऑक्टोबर रोजी भव्य रांगोळी स्पर्धा

**जळगाव** : जळगाव जनता सहकारी बँक, राष्ट्र सेविका समिती आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने दीपोत्सव काळात सुंदर माझा परिवार अंतर्गत रविवार १९ ऑक्टोबर रोजी भव्य रांगोळी स्पर्धा आयोजीत करण्यात आली आहे.

सण उत्सव निमित्ताने दारापुढील अंगण सुशोभित करण्यासाठी आकर्षक रांगोळी परंपरा, हि हिंदू कुटुंबाची खरी ओळख आहे. या परंपरेनुसार यंदा दीपोत्सवानिमित्त रविवार १९ ऑक्टोबर रोजी जळगाव जनता सहकारी बँकेच्या सहकार्याने रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी स्पर्धक ज्या परिसरात रहिवास आहे, त्यात सहभागी सदस्य, किमान दहा सदस्य व्यक्ती कुटुंबांची संख्या असावी. एका परिसरातून एक अशी रांगोळी चार बाय चार फूटपेक्षा जास्त लांब-रूंद मोठी असावी. मुक्त प्रकार यात संस्कार भारती, ठिपके, मुक्तहस्त चित्र या कोणत्याही प्रकारात असावी. यासाठी मिठ, भुसा, रांगोळी किंवा फुले असे साहित्य वापरता येतील. आपले सण आणि उत्सव किंवा आपण निवडलेल्या विषयावर रांगोळी खाली सामाजिक संदेशयुक्त घोषवाक्य असावीत. रांगोळी स्पर्धेत कोणत्याही देवी देवता राष्ट्रध्वज, भगवाध्वज यांचा रेखाटनाचा समावेश नसावा.

रांगोळी स्पर्धा निशु:ल्क असून स्पर्धेसाठी १७ ऑक्टोबरपर्यंत स्पर्धकांनी जळगाव जनता बँक शहर शाखेत नाव नोंदणी करावी.

स्पर्धा परिक्षण रांगोळीसह परिसर स्वच्छता, सजावट, व्यक्तींची एकसंघता, वेशभुषा, घोषवाक्य या विविध मुद्यांच्या आधारे करण्यात येईल. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत रांगोळीसह सुशोभनाचा किमान दोन मिनिटांचा व्हिडीओ संपर्क सूत्रांना पाठवावा. दुपारी ४ ते ६ वाजेदरम्यान आपणास पूर्वसूचनेनुसार स्पर्धकांच्या परिसराचे प्रत्यक्ष परिक्षण केले जाईल. परिक्षकांचा निर्णय अंतिम निर्णय असेल.

यात विजयी स्पर्धकांना रोख स्वरूपात प्रथम क्रमांक पाच हजार एक रूपये, व्दितीय क्रमांक चार हजार एक आणि तृतीय क्रमांक तीन हजार एक तर एक हजार एक रूपयांची उत्तेजनार्थ अनुक्रमे तीन अशी बक्षीसे रविवार २ नोव्हेंबर रोजी काव्यरत्नावली चौकात सामूहिक तुलसी विवाह सोहळा कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील.

नाव नोंदणीसाठी अंजली हांडे ९९७५७४८१०५, कांचन साने ९४२३९७७६५८, शिल्पा जोशी ९६७३००८३४८, गीता रावतोळे ९४२२२८२९७१, सीमा नेवे ९४०३३८४४८२, स्वाती भावसार ९८२३३१४०८३ यांच्याशी नजीकच्या शाखेत संपर्क साधावा असे आवाहन जळगाव जनता सहकारी बँकेतर्फे करण्यात आले आहे.




# आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त ई-पोस्टर स्पर्धा उत्साहात

## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचा उपक्रम ; ७८ जणांचा सहभाग

**जळगाव, ११ ऑक्टोबर**

आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, जळगाव यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील ई-पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यात राज्यातील ७८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

या वर्षीच्या बालिका दिनाचा विषय होता (मी ती मुलगी आहे; मी नेत असलेला बदल - संकटाच्या आघाडीवरील मुली) ही स्पर्धा प्रसूती व स्त्रीरोग विभाग आणि नर्सिंग स्कॉलर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.या उपक्रमाचा उद्देश बालिकांच्या हक्क, आरोग्य आणि सक्षमीकरणाबाबत जनजागृती करणे तसेच देशभरातील नर्सिंग विद्यार्थिनींना आपली सर्जनशीलता आणि विचारप्रवृत्ती प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.

**देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद**

या स्पर्धेत भारतातील विविध राज्यांमधील ७८ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. स्पर्धकांनी बालिकांच्या सक्षमीकरण, शिक्षण, संरक्षण आणि समानता या विषयांवर आधारित अभिनव आणि विचारप्रवर्तक पोस्टर्स सादर केले. प्रत्येक पोस्टरमध्ये मुलींच्या शक्ती, नेतृत्व आणि समाजातील योगदान चित्रीत करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक मंडळस्पर्धेचे परीक्षण प्राचार्या विशाखा वाघ, सहयोगी प्रा. स्वाती पटनावल यांनी केले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना लैंगिक समानतेसाठी जनजागृती करण्याची प्रेरणा मिळाली आणि समतोल, न्याय्य समाजनिर्मितीकडे योगदान देण्याचे भान निर्माण झाले. कार्यक्रमाने बालिकांमध्ये नेतृत्वगुण जागृत करून त्या बदलाच्या वाहक बनू शकतात हा संदेश प्रभावीपणे अधोरेखित केला. गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचा हा उपक्रम समाजात बालिकांच्या सन्मान, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरला.

# "जागतिक दृष्टी दिना"निमित्त जनजागृती रॅलीने वेधले लक्ष

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नेत्ररोगतज्ज्ञ संघटनेचे आयोजन

**जळगाव**: येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगावच्या नेत्ररोग विभागाच्या वतीने जळगाव नेत्ररोगतज्ज्ञ संघटनेच्या सहकार्याने 'जागतिक दृष्टी दिना'निमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली होती. रॅलीत नर्सिंग, एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. रॅलीत दृष्टिदिनानिमित्त प्रबोधनात्मक संदेश असलेले फलक लक्ष वेधून घेत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांच्याहस्ते हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला प्रारंभ झाला. वैद्यकीय अधीक्षक तथा नेत्रशल्यचिकित्सक डॉ. धर्मे द्र पाटील यांनी प्रस्तावना करून कार्यक्रमाविषयी माहिती दिली. हि रॅली शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ते महात्मा गांधी उद्यान, स्वातंत्र्यवीर चौक दरम्यान काढण्यात आली.



प्रसंगी जळगाव नेत्ररोगतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. रागिणी पाटील, सचिव डॉ. चेतन पाटील, डॉ. अनुप येवले, डॉ. पंकज शहा, डॉ. नीलेश चौधरी, डॉ. उल्हास कोल्हे, डॉ. नयना उभाड पाटील, डॉ. वृषाली पाटील, डॉ. स्वप्नील कोठारी उपस्थित होते.

रॅलीत अधिसेविका संगीता शिंदे, सहायक अधिसेवक तुषार पाटील, परिचारिका संघटनेच्या अध्यक्ष रुपाली पाटील, अक्षय सपकाळ यांनी परिचारिका, जीएमसी नर्सिंग व परिचर्या प्रशिक्षण म हाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह सहभाग घेतला.

रॅलीनंतर शासनाच्या 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियान अंतर्गत ओपीडीमध्ये महिला रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच, निरोगी डोळ्यांसाठी डॉक्टरांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. काही म हिलांना शस्त्रक्रियेची आवश्यकता दिसली. त्या मोफत करण्यात येणार आहेत. रॅलीसाठी महाविद्यालयाच्या नेत्रशल्यचिकीत्सा विभागाचे डॉ. मयुरी राठोड, डॉ. विवेक सोळंकी, डॉ. दिव्या सोनवणे, डॉ. मयुरेश डोंगरे, डॉ. सोफिया अन्सारी, डॉ. प्रियांका पाटील, डॉ. स्वाती असोले आदींनी परिश्रम घेतले.

www.tarunbharat.net
तरुण भारत
आसमंत
रविवार, १२ ऑक्टोबर २०२५




# वेध लागता दिवाळीचे...

**वर्षभर तणावग्रस्तता अनुभवल्यानंतर, धकाधकीचे दिवस सहन केल्यानंतर दिवाळीनिमित्त येणारी आणि सर्वदूर पसरणारी प्रसन्नता हवीहवीशी वाटते. दिवाळीचे पदरव सर्वप्रथम बाजारात जाणवतात. ग्राहकांची वाढती लगबग, हवे ते शोधण्याची धांदल आणि मिळाल्यानंतरचे समाधान पैशात मोजता येत नाही. हेच दृश्य सध्या बाजारात दिसते आहे. खरेदीचा उत्साह ओसंडून वाहतो आहे. भिजलेल्या, चिंतायुक्त मनाला बाजार रिझवतो आहे.**

**स्वाती पेशवे**
swatipeshave67@gmail.com



दसरा संपला की दिवाळीचे वेध लागतात. वर्षातील या सर्वात मोठ्या सणासाठी जमेल तशी काही रक्कम बाजूला टाकली जातेच. त्यामुळे या निमित्ताने घरोघरी मोठी खरेदी होते, मात्र, सर्वसामान्यांच्या आयुष्यात दिवाळी खरेदीचा खरा बहर येतो तो बोनसची रक्कम हाती पडल्यानंतर. हे अतिरिक्त धन, ही माया हाती पडली की खरेदीला खरे धुमारे फुटतात. अर्थात यंदा दिवाळीची दिवेलागण होण्यापूर्वीच आपण ओल्या दुष्काळाची काजळी पुसण्याचे काम करीत आहोत. महाराष्ट्राला पावसाने झोडपून काढल्यामुळे अनेक भागांमधले उभे पीक झोपले आहे. खरे पाहता दिवाळी हा पिके हाती येण्याचा काळ. मशागत केल्यानंतर शेतामध्ये डौलाने पिके डोलताना बघण्याचा हा काळ, मात्र अवकाळी तसेच अतिवृष्टीने यावेळी शेतकऱ्यांच्या डोळ्याला लागलेल्या धारांमध्ये खारेपणा वाढविण्याचेच काम केले. अर्थात सरकार आणि समाजाकडून मिळालेल्या आधाराच्या बळावर शेतकरी पुन्हा उभा राहील आणि प्रत्येकाच्या घरापुढे पणत्या त्याच तेजाने लागतील, अशी आशा आहे. अंधाराप्रमाणेच पणत्यांचा प्रकाश दु:खाचे सावटही दूर करेल आणि नव्या दमाने समाज कामाला लागेल, यात शंका नाही. यापूर्वी सलग तीन वर्षे आपण कोरोनाशी निकराची झुंज घेतली. वर्षभर या ना त्या स्वरूपाच्या आक्रमणाचा, अमेरिकेच्या मनमानी करवाढीचा, युद्धजन्य परिस्थितीचा सामना करीतच आहोत. त्याचा परिणाम म्हणून बाजारातील हेलकावे सहन करीत आहोत. मात्र संकटातून संधी शोधणारा भारतीय समाज आणि मराठी माणूस या स्थितीतही खंबीरपणे उभा आहे. दिवाळीच्या पृष्ठभूमीवर आपण त्याचा हाच निर्धार पाहू शकतो.

शेवटी दिवाळी हे काही एका सणाचे नाव नाही, तर तो आनंदाच्या वाटेने प्रकाशाकडे नेणारा प्रदीर्घ प्रवास आहे. ही आपली हसरी, साजिरी परंपरा आहे. म्हणूनच दिवाळीत आनंद अर्थव्यवस्थेलाही एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या टप्प्यावर घेऊन जातो. यंदाही बाजारपेठेत दिसणारा उत्साह, खरेदीचा ओघ आणि ग्राहकांच्या बदललेल्या सवयी यामुळे दिवाळीची तयारी, लगबग हेच दाखवून देणारी दिसते आहे. ती पारंपरिक स्वरूपातून काहीशा आधुनिक ग्राहकांच्या आवडीनुसार रंगलेली बघायला मिळते आहे. इथे लक्षात घ्यायला हवे की, शहरे आणि ग्रामीण भागातील खरेदीचा वेग, उत्पादनांची मागणी आणि नव्या ट्रेंड्समध्ये स्पष्ट फरक जाणवतो. पहिली बाब म्हणजे सोन्या-चांदीच्या बाजारात यंदाही विशेष उत्साह दिसतो आहे. खरे पाहता सोन्याची किंमत गेल्या काही महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

आकडेवारीच्या भाषेत बोलायचे तर ही तब्बल ३०-४० टक्क्यांची वाढ आहे. सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम १.१७ लाख आणि चांदीची किंमत प्रति किलो १.४० लाखाच्या घरात आहे. तरीही ग्राहकांनी या मौल्यवान धातूंच्या दागिन्यांच्या खरेदीकडे पाठ फिरवलेली नाही. दिवाळी आणि त्यामागोमाग सुरू होणारी लग्नसराई बघता हलक्या वजनाचे आणि १८ कॅरेट सोन्याचे दागिने आता अधिक पसंत केले जात आहेत. राज्यातील दागिन्यांच्या सर्व दुकानांमध्ये खरेदीला उधाण आले आहे. यातही पारंपरिक दागिन्यांपेक्षा हलक्या वजनाच्या मॉडर्न डिझाईन्सच्या दागिन्यांना ग्राहकांची पसंती मिळते आहे. मंगळसूत्र, बांगड्या, कर्णफुले यांच्या पारंपरिक आणि नवीन स्टाईलच्या सेट्सने ग्राहकांना आकर्षित केले आहे. चांदीच्या वस्तूंमध्ये नाणी, पूजेचे छोटे संच तसेच आकर्षक भेटवस्तूंची मागणी वाढते आहे. जीएसटी कपातीमुळे सोने-चांदीच्या बाजारातील किमती थोड्या प्रमाणात स्थिर राहिल्या तर मागणीत आणखी वाढ होऊ शकते.

केवळ सोने-चांदीच्या बाजारातच नव्हे, तर ऐन दिवाळीच्या तोंडावर जीएसटी दरातील कपातीमुळे यंदाची दिवाळी ग्राहकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. किमती काही अंशी कमी झाल्यामुळे कपड्यांच्या विक्रीत १० टक्क्यांपर्यंत वाढ नोंदविली जात असून वस्त्र उद्योगाचा व्यापार दिवाळीपूर्वी वृद्धिंगत झाला आहे. २,५०० पर्यंतच्या कपड्यांवर जीएसटी दर आता १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आल्याचा लाभ घेत, कपातीमुळे होणारा लाभ लक्षात घेत कपडे बाजारात सध्या उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. त्याचबरोबर 'लोकल फॉर व्होकल'चा प्रभाव स्पष्ट दिसत असून यंदाच्या दिवाळीत चिनी वस्तूंच्या मागणीत घट बघायला मिळते आहे. ग्राहक स्थानिक आणि भारतीय उत्पादने अधिक पसंत करीत आहेत. थोडक्यात, 'लोकल फॉर व्होकल' उपक्रमामुळे ग्राहकांना भारतीय ब्रँड्सकडे वळवले गेले आहे, असेही आपण म्हणू शकतो. यामुळे स्थानिक उत्पादकांना फायदा झाला असून या बाजारामध्ये ४.७५ लाख कोटींच्या विक्रीचा उद्देश ठेवण्यात आला आहे.

यंदाच्या दिवाळीमध्ये फॅशनच्या क्षेत्रात काही नवीन ट्रेंड्स दिसून येत आहेत. जसे की, इंडो-वेस्टर्न फ्युजननुसार धोती पँट्स, केप ब्लाऊजेस आणि प्री-ड्रेप्ड साड्या यांचा वापर वाढला आहे. खेरीज ग्राहक सस्टेनेबल फॅशन ट्रेंड अंतर्गत पारंपरिक कापडांचा वापर करीत असून एका वर्गाकडून पर्यावरणपूरक उत्पादनांची मागणी वाढली आहे. या वर्षी पेस्टल आणि मेटॅलिक रंगांच्या कपड्यांचा ट्रेंड बघायला मिळत आहे. पारंपरिक वस्त्रांबरोबरच आधुनिक रंगसंगती, आरामदायक फॅब्रिक आणि नवीन डिझाईन्स ग्राहकांना आकर्षित करीत आहेत. यंदा ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही विक्री प्रकारांमध्ये वाढ झाली आहे. डायरेक्ट-टू-कंझ्युमर प्रकारच्या विक्रीत २५ टक्के वाढ दिसत आहे. ही आकडेवारी ग्राहकांचे ऑनलाईन खरेदीचे प्राधान्य दर्शवते. घरगुती खरेदीमध्ये कपडे, सजावटीच्या वस्तू, दिव्यांचे सेट्स, गिफ्ट पॅक्स आणि फराळ यांचा समावेश मोठ्या प्रमाणावर दिसतो आहे. कॉर्पोरेट गिफ्ट्समध्ये पारंपरिक मिठाईऐवजी आरोग्यदायी, लो-कॅलरी मिठाई, ड्रायफ्रूट्स, कस्टमाईज्ड गिफ्ट्स, ग्रीन पॅकेजिंग अशा नव्या प्रकारच्या भेटवस्तूंचा समावेश केला जात आहे. घरगुती पातळीवरही लोक मित्र, नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तीसाठी भेटवस्तू निवडताना पारंपरिक आणि आधुनिक वस्तूंचा संगम करताना दिसत आहेत. गिफ्ट हॅम्पर्समध्ये फराळ, सजावटीच्या वस्तू आणि घरगुती उपकरणांचा समावेश करून अधिक आकर्षक स्वरूप देण्याचा प्रयत्न प्रकर्षाने जाणवणारा आहे.

यंदा फटाक्यांच्या बाजारात उत्साह असला, तरी पर्यावरणपूरकतेचा ठसा स्पष्ट दिसतो आहे. मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे यासारख्या शहरांमध्ये धूर आणि आवाज करणाऱ्या फटाक्यांवर निर्बंध आहेत. त्याचबरोबर यंदा 'ग्रीन क्रॅकर्स'ची मागणी वाढली आहे. त्यामध्ये धूर आणि आवाज कमी असतो. मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी ग्रीन क्रॅकर्सना विशेष प्रोत्साहन दिले गेले आहे. पारंपरिक फटाक्यांबरोबरच मल्टी-शॉट रॉकेट्स, आकाशदीप आणि झगमगाट करणाऱ्या फटाक्यांना यंदा मोठी मागणी आहे. काही ठिकाणी पावसामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला असला, तरी ग्राहकांचा उत्साह कमी झाला नाही.

फराळाच्या बाजारातही यंदा मोठा बदल बघायला मिळतो आहे. करंजी, चकली, लाडू, शंकरपाळे आदी पारंपरिक पदार्थ अजूनही लोकप्रिय आहेतच; फ्युजन पदार्थांची मागणीही झपाट्याने वाढली आहे. जसे की आता बाजारात चॉकलेट करंजी, चीज लाडू, ड्रायफ्रूट्ससह सजवलेले लाडू, पिस्ता रोल्स यासारखे पदार्थ ग्राहकांना आकर्षक वाटत आहेत. आरोग्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी कमी तेलातील, बेक केलेले किंवा साखरमुक्त पदार्थ उपलब्ध आहेत. सोशल मीडियावरून होम शेफ्स, लघुउद्योग आणि छोटे व्यावसायिक फराळ विक्रीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ऑनलाईन ऑर्डरिंगमुळे ग्राहकांना घरबसल्या फराळ मिळत असून त्याचा व्यापारी लाभ नोंद घेण्याजोगा म्हणावा लागेल.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे वाहनांच्या खरेदीत यंदा कमालीचा उत्साह दिसतो आहे. दसऱ्यापासूनच या बाजारातील चहलपहल वाढली आहे. शहरी भागात इलेक्ट्रिक स्कूटर्स, कॉम्पॅक्ट ई-कार्स आणि नवीन मॉडेल्ससाठी ग्राहक मोठ्या संख्येने खरेदी करीत आहेत. ग्रामीण भागात दुचाकी वाहनांचा ओघ जास्त असून नवीन डिझाईन्स आणि सुविधा पाहता त्यामध्ये खरेदीचा स्तर वाढलेला दिसतो आहे. सरकारकडून दिल्या जाणाऱ्या सबसिडीज, इंधन दरातील बदल आणि पर्यावरणपूरक वाहनांसाठी प्रोत्साहन यामुळे ग्राहक अधिक सजग आणि पर्यावरणपूरक पर्याय निवडताना दिसत आहेत.

एकंदरच नवीन ट्रेंड्समध्ये पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम दिसत असून हे बदलत्या समाजाचे आश्वासक चित्र असल्याचेही आपण म्हणू शकतो. भेटवस्तू, फराळ, फटाके, सजावटीच्या वस्तू, वाहन खरेदी अशा सर्वच क्षेत्रात नवकल्पना, पर्यावरणपूरकता, आरोग्यदायी उत्पादनांचा समावेश समाजाची वाढती समज दाखवून देत आहे. ग्राहकांच्या बदललेल्या सवयींना प्रतिसाद देण्यासाठी विक्रेते सतत नवे प्रयोग करीत आहेत. वाढती ऑनलाईन खरेदी, सोशल मीडियाचा प्रचंड प्रभाव आणि कस्टमाईज्ड उत्पादनांची मुबलक उपलब्धता हे यंदाच्या दिवाळीच्या बाजारातील महत्त्वाचे घटक सांगता येतील.

# मृत्यूचे सौदागर

**प्रा. नंदकुमार काळे**



मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये १४ मुलांच्या मृत्यूनंतर आता केंद्र आणि राज्य सरकारे खडबडून जागी झाली आहेत. गेल्या महिन्यापासून मृत्यूचे तांडव हळूहळू सुरू असताना त्याच्या खोलात कुणीच गेले नाही. मध्य प्रदेशमधील काही मुले नागपूरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आली होती. त्यातील काहींच्या मृत्यूनंतर केलेल्या शवविच्छेदनात खोकल्याचे औषध दिल्यामुळे मुलांच्या किडनी खराब होऊन मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या औषधांमध्ये कोणते घटक आहेत, हे संबंधित डॉक्टरांना माहीत असायला हवे; परंतु औषध उत्पादक कंपन्यांच्या वेगवेगळ्या बक्षिसांच्या आणि परदेशी टूरच्या आमिषाने डॉक्टरांची मती गुंग झाली. मयताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार या डॉक्टरांनी केला. आता त्यांना अटक करण्यात आली. प्रश्न असा उपस्थित होतो की, तामिळनाडूतील एक कंपनी देशभर खोकल्याची औषधे विकते आणि अन्न आणि औषध प्रशासन विभागाला कधीच या औषधांची तपासणी करावी असे वाटत नाही. 'ना खाऊँगा, ना खाने दुँगा' ही घोषणा ऐकायला चांगली वाटत असली, तरी एकदा औषध विक्रेत्यांच्या मनाचा कानोसा घेतला, तर अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी दरमहा हजारो रुपयांचा हप्ता कसा घेतात आणि औषध दुकानांची तपासणीच कशी केली जात नाही, हे समजू शकते. कर्मचारी कमी असल्याचे कारण पुढे करून तपासणी टाळायची, महिन्याला एका-एका जिल्ह्यातून कोट्यवधीचा मलिदा जमा करायचा आणि रुग्णांच्या जीविताशी खेळ करायचा, हे चक्र सुरू असते. त्यात औषध उत्पादक कंपन्या, अन्न आणि औषध प्रशासन विभाग, डॉक्टर असे सर्वच सहभागी असतात. या सर्वांना अशा प्रकरणात आरोपी करून त्यांच्यावर कारवाई करायला हवी.

मुलांच्या मृत्यूनंतर तामिळनाडू अन्न आणि औषध प्रशासनाने कांचीपुरम येथील 'श्री सन फार्मा'मधून 'कोल्ड्रिफ कफ सिरप'चे नमुने घेतले. त्यात धोकादायक रसायन 'डायथिलीन ग्लायकोल' आढळले. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये मुलांचे मृत्यू घडवणारे हे तेच कफ सिरप आहे. तामिळनाडू, मध्य प्रदेश आणि केरळच्या सरकारने कोल्ड्रिफ कफ सिरपमध्ये धोकादायक रसायने आढळल्यानंतर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. 'श्री सन फार्मास्युटिकल्स'ने बनवलेल्या 'कोल्ड्रिफ कफ सिरप'मुळे अनेक मुलांमध्ये किडनीचे संक्रमण झाले. त्यामुळे त्यांचे मृत्यू झाले. राजस्थानमध्ये आणखी एका 'कफ सिरप' आणि त्याच्या कंपनीवर बंदी घालण्यात आली आहे. 'कफ सिरप'च्या चौकशीसाठी उत्तराखंडमध्येही छापे टाकण्यास सुरुवात झाली. तपासणीमध्ये 'कोल्ड्रिफ कफ सिरप'मध्ये ४८.६ टक्के 'डायथिलीन ग्लायकोल' आढळले. हे एक अत्यंत धोकादायक रसायन आहे. हे आरोग्य विभागाच्या मानकांचे उल्लंघन करते.

मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील घटनेनंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना मुलांसाठी अत्यंत सावधगिरीने खोकल्याची औषधे वापरण्याचा सल्ला दिला आहे. 'दोन वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कोणत्याही प्रकारचे कफ सिरप अजिबात देऊ नये' असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. देशात यापूर्वी घडलेल्या घटना आणि आताची घटना यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला हे सुचले का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुर्घटना घडेपर्यंत मार्गदर्शक सूचना का दिल्या जात नाहीत, याचे उत्तर मिळत नाही. बहुतेक मुलांचा खोकला औषधांशिवाय बरा होतो, म्हणून औषध देण्यापूर्वी मुलांना पाणी, विश्रांती आणि इतर सहायक उपचार प्रदान करण्यास प्राधान्य दिले पाहिजे, असे तज्ज्ञ सांगतात; परंतु औषध कंपन्यांच्या उत्पादनांचा खप वाढवून त्याच्या मलिद्यातून स्वार्थ साधणाऱ्या डॉक्टरांसह अन्य घटकांना पैशाच्या तुलनेत लोकांचे जीव मातीमोल वाटतात. आता विशिष्ट कंपनीकडून खोकल्याच्या औषधांची खरेदी करण्यावर बाजारात पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मुलांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी हे केले जात आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये खोकल्याचे औषध घेतल्यानंतर मुलांचा मृत्यू झाल्यामुळे केंद्र सरकार आता औषधांच्या गुणवत्तेबाबत आणि सुरक्षिततेबाबत कठोर उपाययोजना करण्याची तयारी करीत आहे.

केंद्र सरकारने याबाबत बोलावलेल्या बैठकीचा उद्देश देशात उत्पादित आणि विकल्या जाणाऱ्या कफ सिरप आणि इतर औषधांचे गुणवत्ता नियंत्रण कडक करणे हा आहे. या बैठकीत औषध उत्पादन मानकांचे पालन (शेड्यूल-एम), औषधांचा तर्कसंगत वापर आणि राज्य पातळीवर देखरेख व्यवस्था मजबूत करण्यावर चर्चा होईल. कोणत्याही औषधाच्या गुणवत्तेबाबत कोणताही निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा केंद्र सरकारने दिला आहे. मुलांसाठी बाजारात विकली जाणारी खोकल्याची सर्व औषधे आणि सिरप पूर्णपणे सुरक्षित आणि 'डीईजी/ईजीसारख्या हानिकारक रसायनांपासून मुक्त असावीत, यासाठी आता प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यांकडून औषधांच्या नमुन्यांची चाचणी, उत्पादन युनिट्सची तपासणी आणि संशयास्पद सिरपविरुद्ध कारवाई करण्याच्या प्रगतीचा अहवाल केंद्र सरकारने वारंवार मागायला हवा. येत्या काही दिवसांमध्ये खोकल्याच्या सिरपचे उत्पादन, गुणवत्ता चाचणी आणि देखरेखीसाठी एक सामान्य धोरण ठरवले पाहिजे. यामुळे देशभरातील औषधांची सुरक्षितता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करता येईल. अशा घटना पुन्हा घडू नयेत, म्हणून केंद्र सरकार खोकल्याच्या सिरपच्या उत्पादन आणि विक्रीबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची शक्यता आहे.

राजस्थानमध्ये यापूर्वी भरतपूर आणि सिकर येथे दोन मुलांचे मृत्यू झाले. त्यात कहर म्हणजे सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत औषध योजनेंतर्गत खोकल्याच्या 'डेक्सट्रोमेथोर्फन हायड्रोब्रोमाईड सिरप आयपी'चे वाटप करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. हे औषध 'केसन्स फार्मा' या खासगी औषध कंपनीने बनविले आहे. येथेही हे औषध प्यायल्यानंतर मुलांचे मूत्रपिंड निकामी झाल्याचे आढळून आले. तथापि, अधिकाऱ्यांचा दावा आहे की, हे सिरप सुरक्षित आहे. कोणत्याही चाचणीत औषधांमध्ये दोष आढळला नाही, तर मग मुलांचे मूत्रपिंड निकामी कसे झाले, याचे कोणतेही उत्तर तिथल्या आरोग्यमंत्र्यांकडे नव्हते. केरळ सरकारने आता खोकल्याच्या इतर औषधांच्या नमुन्यांचीदेखील तपासणी सुरू केली आहे. केंद्रीय औषध नियामक 'सीडीएससीओ'ने हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, तामिळनाडू, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या सहा राज्यांमधील औषध कारखान्यांची तपासणी सुरू केली आहे. कफ सिरप, अँटीपायरेटिक्स आणि अँटीबायोटिक्ससह १९ नमुने गोळा करण्यात आले आहेत. तपासणीचा उद्देश औषधांच्या गुणवत्तेतील कमतरता ओळखणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रक्रिया सुधारणा सुचवणे हा आहे. मध्य प्रदेश सरकारने हिमाचल प्रदेश औषध प्राधिकरणाला इतर संशयित कफ सिरपची तपासणी करण्यास सांगितले आहे. मंत्रालयाने स्पष्ट केले की, 'सीडीएससीओ'ने चाचणी केलेल्या सहा नमुन्यांमध्ये (अँटीबायोटिक्स, अँटीपायरेटिक्स आणि ऑन्डनसेट्रॉनसह) 'डीईजी-ईजी' आढळले नाही. हे नमुने छिंदवाडा येथील आजारी मुलांना देण्यात येणाऱ्या इतर औषधांचे होते.

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी', 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च', 'नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनीअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट', 'सीडीएससीओ' आणि 'एम्स'-नागपूर येथील तज्ज्ञांची टीम आता छिंदवाडा भागातील मृत्यूच्या कारणांचे विश्लेषण करीत आहे. मुंबईमध्येही असेच एक प्रकरण पुढे आले होते. त्यात अडीच वर्षांच्या मुलाची नाडी कफ सिरप दिल्यानंतर सुमारे १७ मिनिटे थांबली. कफ सिरपमध्ये क्लोरफेनिरामाईन आणि डेक्स्ट्रोमेथोर्फन असल्याचे आढळले. अमेरिकेत चार वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये त्याचा वापर करण्यास बंदी आहे. गेल्या वर्षी भारतात बनवलेल्या कफ सिरपमुळे गॅम्बिया आणि उझबेकिस्तानमध्ये ८९ मुलांचा मृत्यू झाला. औषधांमधील भेसळीमुळे जागतिक स्तरावर परवडणारी औषधे देणारी 'जगाची फार्मसी' म्हणून भारताची प्रतिमा खराब झाली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने उत्तर पंजाबमधील 'क्यूपी फार्माकिम लिमिटेड'च्या कफ सिरपच्या काही नमुन्यांची चाचणी केली होती. ती मानवांसाठी हानिकारक असल्याचे आढळून आले. नमुन्यांमध्ये डायथिलीन ग्लायकॉल आणि इथिलीन ग्लायकॉलचे प्रमाण प्रमाणापेक्षा जास्त होते. 'क्यूपी फार्माकिम लिमिटेड' आणि इतर दोन कंपन्यांचे 'मेडेन फार्मास्युटिकल्स' आणि 'मॅरियन बायोटेक प्रा. लि.' यांचे परवाने रद्द करण्यात आले होते. त्यांची निर्यात थांबविण्यात आली. हे सर्व प्रकार पाहता एखादी घटना घडली की, तेवढ्यापुरते जागे व्हायचे आणि विसर पडला की मृत्यूचे तांडव होईपर्यंत कुंभकर्णी झोप घ्यायची, असा प्रशासनाचा पवित्रा दिसतो.



## विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**
७२०८५५५४५८

# गुळाला मुंगळा चिटकून बसं...

'यो यो यो पाव्हणा, सखूचा मेव्हणा,
तुझ्याकडं बघून हसतोय गं,
काहीतरी घोटाळा दिसतोय गं...'

शाहीर वामनदादा कर्डक यांचे हे लोकप्रिय गीत संगीतकार मधुकर पाठक यांनी चालीत बांधले असून श्रावण यशवंते यांनी गायले आहे. गेली किमान ५० वर्षे अत्यंत लोकप्रिय हे गीत ठरले आहे. याच्या एका कडव्याच्या ओळी आहेत- 'गुळाला मुंगळा चिटकून बसं, मेतकूट तुमचं जमलंय तसं' हल्ली शहरी जीवनात गूळ आणि त्याला चिकटलेला मुंगळा, हे दृश्य दिसतच नाही. पूर्वी हे दृश्य सर्रास असे. संतांनीही विविध भौतिक इच्छा-आकांक्षांनी लिप्त झालेल्या माणसाच्या मनासाठी, गुळाला चिकटलेला मुंगळा ही उपमा वापरलेली आहे. गुळाला चिकटलेला मुंगळा ओढून काढला तर तुटतो, पण गुळावरची पकड काही सोडत नाही, तसेच मानवी मन काय वाटेल ते झाले तरी संसारिक मोहांपासून बाजूला हटतच नाही. त्याला त्या मोहांपासून सोडविण्याचा एकच मार्ग म्हणजे श्रीहरीचे नामस्मरण, असे संत सांगतात.

शिवछत्रपती आपल्या आज्ञापत्रांमध्ये, युरोपीय व्यापाऱ्यांबद्दल आपल्या सरदारांना असाच इशारा देताना आढळतात. या युरोपीय गोऱ्या व्यापाऱ्यांना इथे स्वराज्यात फक्त व्यापारच करायचा नसून राज्यविस्तार करायचा आहे. त्यांच्या-त्यांच्या देशी त्यांचे राजे आहेत. त्यांचे राज्य इथे स्थापन करणे हा या टोपीकरांचा अंत:स्थ हेतू आहे. तेव्हा यांना समुद्रकिनारी, नदीकाठी पक्का ठिकाणा, बुरुजबंद, कोटबंद बांधकाम करण्यास कधीही परवानगी देऊ नये. अन्यथा तेवढे ठिकाण आपल्या राज्यातून कायमचे गेले, असे समजा; असा सक्त इशारा शिवछत्रपतींनी दिलेला आहे.

हा इशारा किती अचूक होता, याचे प्रत्यंतर आज ३०० वर्षांनंतरही आपल्या डोळ्यांसमोर आहे. मुंबई, कोलकात्ता आणि चेन्नई ही दलदलमुक्त, खाजणांनी भरलेली, रोगट हवामानाची ठिकाणे इंग्रजांनी पक्की धरून ठेवली आणि ती इतकी पक्की बनवली की, आज स्वतंत्र भारतातही तीच तीन महानगरे सर्व क्षेत्रांत अग्रेसर आहेत.

असो. तर मिळेल तो जमिनीचा तुकडा पार्श्वभागाखाली घट्ट धरून ठेवायचा, ही सवय इंग्रजांनाच नव्हे, तर सगळ्याच युरोपीय लोकांना आहे, असे दिसते. रशियाचे क्षेत्रफळ साधारण १७ लाख ७५ हजार चौरस किमी आहे. तरीही त्याला युक्रेन देश हवा आहे. हे देखील आपण एकवेळ समजू शकतो. कारण युक्रेन हा संपूर्ण युरोप खंडाचे गव्हाचे कोठार असलेला देश मानला जातो. पण स्वतःची अवाढव्य भूमी असूनही रशियाला आर्क्टिक्ट समुद्रातल्या स्पिटस्बर्गेन उर्फ स्फालवार या द्वीप समूहाची चतकोर भर जमीन सोडवत नाही. स्फालबार हा द्वीपसमूह उत्तर ध्रुव प्रदेशापासून जवळ असल्यामुळे सदैव बर्फाच्छादित असतो. त्यामुळे साहजिकच तिथे ध्रुवीय पांढरी अस्वले, व्हेल मासे, हिमकोल्हे आणि रेनडियर हे प्राणी विपुल प्रमाणात आढळतात. स्फालबार द्वीप समूहाचे एकंदर क्षेत्रफळ ३७ हजार ६०० चौ. किमी आहे. इ.स. १५९६ मध्ये डच दर्यावर्दी विल्यम बेरेटंस याने नॉर्वे देशाच्याही उत्तरेकडे प्रवास करीत हा द्वीप समूह शोधून काढला होता. म्हणून आर्क्टिक्ट महासागराच्या या भागाला बेरेटंस् समुद्र हेच नाव पडले आहे. रशिया आणि नॉर्वे या दोन देशांची किनारपट्टी बेरेटंस् समुद्रावर येते. १७ व्या आणि १८ व्या शतकात युरोपीय देशांनी स्फालबार द्वीप समूहांमध्ये मनसोक्त व्हेल शिकारी केल्या. १९ व्या शतकात इथल्या बर्फाखालच्या जमिनीत कोळशाच्या खाणी मिळाल्या. २० व्या शतकाच्या सुरुवातीला पहिले महायुद्ध झाले. त्याच्या शेवटी विजेत्या देशांनी संपूर्ण जगाचीच वाटणी आपल्याला फायदेशीर अशी करून घेतली. १९२० सालच्या स्पिटस्बर्गेन करारानुसार स्फालबार द्वीप समूहावर नॉर्वे देशाची मालकी असल्याचे मान्य करण्यात आले. पण तिथे कोळशाची खाण किंवा व्हेल मासेमारी करण्याचा हक्क सर्वच युरोपीय देशांना असल्याचे ठरविण्यात आले. प्रत्यक्षात नॉर्वे आणि रशियानेच तिथे कोळशाच्या खाणी सुरू ठेवल्या. कारण अन्य युरोपीय देशांना स्फालबार बेटे फार लांब पडतात.

परवा १४ ऑगस्ट २०२५ या दिवशी स्पिटस्बर्गेन करार प्रत्यक्ष लागू झाला. या घटनेची शताब्दी साजरी झाली. आज १०० वर्षांनंतर स्फालबार कोळसा खाणींमधले कोळशाचे उत्पादन जवळपास बंद झाले आहे. म्हणजे नॉर्वेच्या 'स्टोर नॉर्वे' या कोळसा कंपनीने कोळसा खणणे सुरू ठेवले आहे. पण रशियाच्या 'आर्क्टिकुगोल' या कंपनीने २००७ पासून अत्यल्प उत्पादन केले आहे. असे का? तर रशियाचे म्हणणे असे की, स्फालबारच्या खाणींमधून कोळसा काढून तो



रशियात वाहून नेणे किंवा अन्य देशांना विकणे, हे सध्याच्या काळात किफायतशीर राहिलेले नाही. साहजिक आहे. खुद्द रशियात आणि रशियाच्या मध्य आशियातल्या मित्र राष्ट्रांमध्ये तेलाचे आणि नैसर्गिक वायूचे नवेनवे साठे सापडले आहेत, सापडत आहेत. त्यामुळे कोळसा खाणी आता पूर्वीइतका फायदा देत नाहीत. पुन्हा कोळसा जाळल्याने पर्यावरणाची जी काही हानी होते, त्याबद्दल जगभर सर्वत्र बोंबाबोंब सुरू असल्यामुळे कोळशाचा इंधन म्हणून वापर घटलाच आहे.

मग 'आर्क्टिकोगुल' कंपनीचा गाशा गुंडाळा आणि ती भूमी नॉर्वे देशाच्या ताब्यात देऊन मोकळे व्हा ना! छे,छे! असा निर्णय घ्यायला पुतिन सरकार म्हणजे काही नेहरू सरकार नव्हे. आपण हे ऐकले किंवा वाचलेच असेल की, उत्तर ध्रुवावर भारतीय वैज्ञानिकांनी एक कायम स्वरूपी विज्ञान संशोधन केंद्र उभे केले असून त्याला 'हिमाद्री स्थानक' असे नाव आहे. हे हिमाद्री स्थानक उत्तर ध्रुवावर म्हणजे अगदी ध्रुव बिंदूवर नसून याच स्फालबार द्वीप समूहावर आहे. तशीच पोलंडची 'पोलिश पोलर स्टेशन' आणि चीनची 'आर्क्टिक्ट यलो रिव्हर स्टेशन' ही संशोधन केंद्रेही स्फालबारवरच कार्यरत आहेत. ती नॉर्वे देशाच्या अधिकृत परवानगीनेच चालू आहेत. अशा स्थितीत रशिया गाशा गुंडाळून घरी कसा जाईल? स्फालबार बेटांमधल्या बेरेंटस्बर्ग शहराची लोकसंख्या मुळात फक्त २ हजार होती. ती आता ३४० पर्यंत घसरली आहे. तिथल्या प्रयोगशाळांमध्ये एके काळी रशियन शास्त्रसांबरोबरच जर्मन आणि नॉर्वेजियन शास्त्रज्ञही होते. आता फक्त रशियन्स आहेत. पण मग ते काय करत आहेत तिथे? पृथ्वीच्या अति उत्तर भागातील एकमेव गगनचुंबी इमारत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका चार मजली इमारतीतून संपूर्ण बेरेंट्स समुद्रावर लक्ष ठेवून आहेत. म्हणजे आले ना लक्षात? यालाच म्हणतात 'गुळाला मुंगळा चिटकून बसं...'

### संघ गीतांची मोहिनी

इतिहास काळात मराठी साहित्यात तीन प्रकारच्या काव्याने राज्य केले. संत काव्य, पंत काव्य आणि तंत काव्य. ज्ञानोबा, नामदेव, तुकोबा हे संत कवी. वामन पंडित, मोरोपंत हे पंत कवी तर शाहीर परशुराम, रामजोशी इत्यादी लोक हे तंत कवी. त्यांच्यानंतर आधुनिक युगातले पहिले कवी असा मान केशवसुतांना दिला जातो.

या आधुनिक कवींच्या काव्यात प्रेमकविता जरा जास्तच दिसते. स्वातंत्र्यानंतर तर कविता म्हणजे प्रेमकविताच असा एक प्रघातच जणू पडला. कवींनी समाजाला रगेल बनवण्याऐवजी रंगेल बनवले, पुरुषार्थी बनवण्याऐवजी लंपट बनवले.

अशा विपरीत स्थितीत रा. स्व. संघाच्या शाखेवर म्हटल्या जाणाऱ्या कविता किंवा पद्ये किंवा गीते ही नेहमीच गाणाऱ्यांना-ऐकणाऱ्यांना सकस, बलशाली, तेजस्वी जीवनाचा संस्कार देणारी राहिलेली आहेत.

संघाचे ज्येष्ठ प्रचारक विजय कुमारजी यांनी संघ गीतांचे काही गमतीदार किस्से सांगितले. १९७५ च्या आणिबाणीत स्वतः विजयकुमारजी मेरठ जेलमध्ये बंदी होते. संघ कार्यकर्ते, नक्षलवादी, आनंदमार्गी, सर्वोदयी अशा विविध कार्यकर्त्यांना इंदिरा विरोधी म्हणून एकत्रच तुरुंगात डांबण्यात आले होते. संघ कार्यकर्त्यांनी तुरुंगातच रोज संध्याकाळी शाखा लावायला सुरुवात केली. वरील सर्व संघटनांचे कार्यकर्ते कबड्डी किंवा अन्य खेळ खेळण्यासाठी उत्साहाने शाखेवर यायचे. शाखेवर व्यायाम, खेळ यांच्याप्रमाणेच गीत हे व्हायचेच. एक दिवस एका कार्यकर्त्याने एक जबरदस्त गीत सुरू केले-

'नेत्र तीसरा, पलभर यदि, शंकर क्रोधी खोलेंगे ।
रौद्र रूप धर, चंद्रहास ले, असुर शक्ति को तोलेंगे ।
शत्रू रक्त को पीकर अपनी, पूर्ण प्रतिज्ञा कर लेंगे।
तांडव नृत्य दिखाएंगे, स्वयं काल बन जाएंगे ॥'

गीताचे बोलच असे आहेत की, म्हणताना सगळ्यांना भलताच आवेश चढला. मग असे ठरले की, हे गीत आता आठवडाभर म्हणायचे, हा निर्णय ऐकून सर्वोदयी कार्यकर्ते घाबरले आणि म्हणाले, 'आम्ही नाही रे बाबा, आठवडाभर शाखेवर येणार' तर नक्षली कार्यकर्ते भलतेच खूश झाले आणि आठवडाभर अगदी जोरजोरात हे गीत म्हणून त्यांनी तुरुंग दुमदुमन सोडला.

*(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)*

## सिनेसृष्टी

**रमेश विनायक पोफळी**
७७७५९००८२४

### स्वर्गलोकातील देवांगना

# संध्या शांताराम

'दिव्य महेंद्र पदांना अमरांना ।
करि देवांगना मुदितमना वंदना ॥'

इंद्राच्या दरबारात देवांगनेने गायलेले हे पद आहे. संध्या शांताराम या चित्रपटसृष्टीतील देवांगनाच होत्या... राजकमल प्रॉडक्शनची पाण्यामध्ये पुष्पवृष्टी करणारी तरुणी दिसताच, उत्तुंग कलाकृती पाहायला मिळणारच! 'आधा है चंद्रमा रात आधी' १९५९ सालच्या नवरंग चित्रपटातील हे नृत्य गीत अनेक नावीन्याने नटलेले आहे. नायक कवी नवरंग (दिवाकर) च्या उदात्त कविकल्पनेत त्याची साधीभोळी पत्नी जमना, त्याच्या कल्पनेतील सांजशृंगाराने नटलेली नृत्यांगना असते. कल्पक भूमिकेतील जमनालाच तो 'मोहिनी' नावाने पुकारतो. ही दोन्ही पात्रे (कथेप्रमाणे एकच) संध्या या नृत्याभिनेत्रीनेच साकारली आहेत... एका अर्धचंद्राच्या रात्री नायक हे गाणे म्हणत असताना त्याला चक्क डोईवर ८-९ घागरी ठेवून नृत्य करणारी व त्याला मागोमाग यायला लावणारी मोहिनी दिसते.

'पिया आधी है प्यार की भाषा ।
आधी रहेने दो मनकी अभिलाषा...।'

मोहिनीच्या प्रतिसादाने तो आनंदी होतो व दोघे मिळून गातात. डोईवर ८-९ घागरी घेऊन त्याचा तोल सांभाळत गाण्याच्या तालावर बिट्स देऊन शॉट्स देतात. नृत्याचा तालच नव्हे तर स्वरांचे हेलकावेही कानांना जाणवतात. अशी अवघड प्रॉपर्टी घेऊन नृत्य करीत प्रणयाचे प्रदर्शन करणारे हे गाणे या क्षेत्रात प्रथमच असेल. याचे श्रेय संध्या यांच्या नृत्यातील पदलालित्याला व मोहक चेहऱ्यावर फुलविलेल्या अभिनयाला जाते. या गाण्यात 'आधा' हा शब्द तब्बल २२ वेळा पेरला आहे.

'अरे जा रे हट नटखट । ना छू रे मेरा घुंघट...'

हेही अभिनव व तितकेच अवघड नृत्य सादर करण्यात संध्या यांनी आपले नृत्य व अभिनय कसब पणाला लावले होते. व्ही. शांताराम या दिग्दर्शकाने यात स्टॉपब्लॉक तंत्र वापरून, मोहिनी एका अंगाने मोहिनी तर दुसऱ्या अंगाने पुरुषाच्या रूपात दिसते. हे आगळे होळी नृत्य तांत्रिक करामतीद्वारे प्रदर्शित करून दर्शकांना तृप्त केले. दोन्ही रूपात संध्या यांचे नृत्य लाघव, अभिनय तसेच याचे चित्रीकरण, या चित्रपटाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

'श्यामल श्यामल बरण । कोमल कोमल चरण ।'

जमना घरातील कामे करीत असताना नायक दिवाकर तिला मोहिनीच्या रूपात कल्पून तिच्या रूपाच्या वर्णनाचे वरील गाणे म्हणतो. मोहिनीच्या नटखट अंदाजात नृत्यांगनेच्या पेहरावात संध्या या स्वयंपाक करण्याचा, सुपाने धान्य पाखडण्याचा, सूप शरीराभोवती फिरविण्याचा, झाडू मारण्याचा अभिनय सहज नृत्यात अभिनित करून एका अद्वितीय अभिनेत्रीचे दर्शन घडविते. तो जेवत असताना त्याला आनंदाने नृत्यातच कमर वाकवून पदर खालीवर करून वारा घालते. हे सर्व केवळ संध्या व शांतारामच करू शकतात. धन्य होती ही कलाकार जोडी!

'नैन सो नैन नाही मिलाओ ।
देखत सुरत आवत लाज... सैया' (लता)
'प्यारसे प्यार आके सजावो ।
मधुर मिलन गावत आज... गुंया' (हेमंत कुमार)

'झनक झनक पायल बाजे' चित्रपटातील हे प्रणयगीत संध्या व गोपीकिशन यांच्या लोभस शास्त्रीय नृत्यावर अभिनव पद्धतीने चित्रित केले आहे. नृत्यातील पदे 'मालगुंजी' रागावर आधारित वरील गाण्यात अतिशय मोहक रीतीने सादर केली आहेत. नृत्य सम्राट गोपीकिशन बरोबर नृत्य सादर करून चित्रपटाला उत्तुंग पातळीवर नेऊन ठेवले आहे. 'नृत्याद्वारे संगीत नुसते ऐकले जात नाही तर पाहतादेखील येते' हे संध्या यांनी सिद्ध करून दाखविले.

'मेरे ऐ दिल बता प्यार तुने किया ।
पायी मैने सजा क्या करू क्या करू ।'

प्रेमात विफलता आल्यावर अगतिक व हताश होऊन आर्त स्वरात नायकाच्या फोटोकडे पाहून विरही अवस्थेत हे गाणे गातानाचे चेहऱ्यावरील हावभाव व हालचाली पाहून संध्या या केवळ नृत्य अभिनेत्री नाही याचा प्रत्यय येतो. हे गाणे एक प्रकारची विरहिनी आहे.

'सैया झुटों का बडा सरताज निकला मुझे छोड चला...'

'दो आँखे बारह हाथ' चित्रपटात वरील गाणे म्हणत रस्त्याने जाणाऱ्या एका खेळणी वालीचा अभिनव रोल संध्या यांनी केला आहे. डोईवर खेळण्याचे टोपले हाताने टिम्पनी वाजवीत व पायाला बांधलेले व तिच्या मागून सरपटत येताना छोट्याशा नगाऱ्यासारखे वाद्य. अशा साजात नटलेल्या संध्या मोकळ्या तुरुंगाच्या शेजारील रस्त्यावरून वरील गाणे म्हणत अल्लड मूडमध्ये जात असते. गाणे म्हणत हे सर्व सांज सोबत वाजवीत खेळण्याची विक्री करीत जातानाचा अप्रतिम अभिनय सादर करून निपुणता सिद्ध केली आहे.

'ऐ मालिक तेरे बंदे हम-' वरील चित्रपटातील हे लता यांच्या आवाजातील प्रार्थना आदिनाथ (व्ही. शांताराम) निधन पावल्यावर त्यांच्या शवाजवळ, सहाही खुंखार कैद्याच्या सान्निध्यात अतिशय आदराने गाते. हे प्रार्थनास्वरूप गाणे आदिनाथ यांचे आवडते असते. या चित्रपटात प्रणय प्रसंगाला थारा नाही. संध्या (चंपा) व आदिनाथ यांची परस्परांबद्दलची ओढ सूचकतेने दाखविली आहे. एका प्रसंगात चंपाशी हे कैदी झोंबाझोंबी करतात तेव्हा आदिनाथ त्यांना वाचवितो; त्या प्रसंगी प्रेमाचा अंकुर तिच्यात जागतो. आदिनाथच्या निधनाच्या वार्तेने अत्यंत विव्हळ होऊन दुःख व भावना आवरू शकत नाही. भिंतीवर आपले हात आपटून बांगड्या फोडते व कपाळावरील कुंकू पुसते. वरील दोन्ही प्रसंगातील तिचा अभिनय उच्च कोटीचा होता. १९५२ सालच्या 'अमर भूपाळी'त पदार्पणातच तिने स्वतःला सिद्ध केले.

'लटपट लटपट तुझं चालणं गं मोठ्या मौजेचं ।
बोलनं गं मंजुळ मैनेचं...'

लता मंगेशकर यांनी गायलेली ही लावणी संध्याने विहंगम नृत्यकौशल्यात चेहऱ्यावरील भाव खासकरून नेत्रपल्लवांच्या कटाक्षाने कुठेही थिल्लरपणा येऊ न देता सादर केली. संध्या यांचा नृत्यानुभव आजही आठवतो.

'कितना मिठा होता है । कितना प्यारा होता है'



'तीन बत्ती चार रास्ता' या चित्रपटात वरील मधुर प्रणयगीत संध्या यांनी कुशल अभिनयात सादर केले.

'निर्दयी प्रीतम प्रणय जाग कर'

'स्त्री' चित्रपटात तिने शकुंतलेचे पात्र साकार करताना वरील गाण्यात प्रियकराच्या प्रतीक्षेतील बेचैनी उत्कृष्ट अभिनित केली.

'पंख होते तो उड आती रे...'

'सेहरा' चित्रपटात संध्या यांच्यावर चित्रित या गाण्यात रोमँटिक मूड उजागर करण्यात संध्या यशस्वी झाल्या आहेत. अतिशय आनंदात स्वैरपणे नाचत हे गाणे पडद्यावर प्रदर्शित झाले. हे गाणे त्या काळी लोकप्रिय झाले होते.

'ज्वानीच्या आगीची मशाल हाती ।
आले मी अवसेच्या भयाण राती-।।'

'पिंजरा' चित्रपटातील हे सर्वांग सुंदर गाणे संध्या व निळू फुले यांच्यावर चित्रित झाले होते. स्त्री, प्रेमाचा शोध घेताना तीव्र भावना जागृत करते. रात्रीच्या भयाण अंःकाराची तमा न बाळगता हातात ज्वानीचे प्रतीक म्हणून जळती मशाल घेऊन शोध घेते. तिला प्रेमाचे प्रतीक दिसल्यावर, ती 'दिसला गं बाई दिसला' हे गाणे वेगळ्याच अंदाजात सुरू करते. संपूर्ण गाणे मशाल नृत्य असून लावणीचा बाज उत्कृष्टपणे प्रतीत केला आहे. प्रत्येक शॉटमध्ये त्यांच्या मानेचे झटके व नेत्रांची भावुक पण चंचल हालचाल, नृत्यात रंग भरते. सुरुवातीला 'छबीदार छबी'चा अंतरा म्हटल्यावर निळू भाऊंची एन्ट्री होते. ते विचारतात-

'चटक चांदणी चतुर कामिनी,
काय म्हणु तुला, तु हाहेस तरी कोण?'

या पुढील अंतऱ्यात बाणेदार पण विनोदी अंगाने नृत्य गीतात त्याचे चटकदार उत्तर देते. लक्षात राहतात ते जगदीश खेबूडकरांचे शब्द व संध्या यांचे नृत्य ललित्य.

'चांदण असून वाटे रात काळी काळी ।
चंदनाची चोळी माझं अंग अंग जाळी ॥'

राम कदम यांच्या संगीतात उषा मंगेशकर यांनी गायलेल्या लावणी प्रधान गाण्याला संध्या यांनी ठसठशीत नृत्यात सादर करून आपल्या लौकिकात भर टाकली.

मराठीतील महान अभिनेत्री विजया देशमुख उर्फ संध्या शांताराम यांचा जन्म २२ सप्टेंबर १९३२ (काही ठिकाणी १३ सप्टेंबर १९३८) रोजी केरळ प्रांतातील कोची येथे झाला. त्यांची वडील बहीण वत्सला देशमुख याही सिने कलाकार होत्या. सुरुवातीची कारकीर्द नाट्य कलाकार म्हणून गेली. विजयाताई व वत्सलाताई करीअर संपादण्यासाठी मुंबईस आल्या. १९५२ साली शांताराम यांच्या 'अमर भूपाळी' चित्रपटासाठी त्यांची निवड झाली अन् चित्रपट प्रवास सुरू झाला.

१९५५ साली 'झनक झनक पायल बाजे' चित्रपटासाठी त्या विख्यात नर्तक गोपीकिशनकडून कथक नृत्य शिकल्या. त्यांच्या चित्रपट कारकीर्दीत त्यांनी केवळ १४ चित्रपटात कामे करून अमाप प्रसिद्धी मिळविली. त्यांचा विवाह चित्रपती व्ही. शांताराम यांच्याशी २२ डिसेंबर १९५६ रोजी झाला. शांताराम यांच्या त्या तृतीय पत्नी झाल्या. १९५५ साली 'दो आँखे बारह हात' चित्रपटासाठी संध्या व व्ही. शांताराम यांना सॅम्युअल गोल्डवीन पुरस्कार मिळाला. 'पिंजरा' व 'चंदनाची चोळी माझं अंग अंग जाळी' या चित्रपटासाठी मराठी फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले.

४ ऑक्टोबर २०२५ रोजी हिंदी व मराठी चित्रपटात महान योगदान देऊन या पृथ्वीवर अवतरलेल्या देवांगना परत स्वर्गलोकी निघून गेल्या. व्ही. शांताराम युगातला व राजकमलचा शेवटला तारा निखळला. परंतु त्यांनी पडद्यावर अजरामर केलेल्या गाण्याचे स्वर दीर्घकाळ कानात साठविले राहतील.

'नेकी पर चले और बदी से टले
ताकी हसते हुये निकले दम
ऐ मालिक तेरे बंदे हम....'

## कथा

**रश्मी वाघमारे**
९९७०१७५२८०

# कळीचे फूल होताना...



महेशने आपले कोचिंग शेड्युल संपवले. कपडे बदलून आता टेनिस कोर्टवरून घरी जाऊया, असा विचार केला. तेवढ्यात त्याच्या लक्षात आले, आज साराच्या शाळेत पालकांची मिटिंग आहे.

''अरे, आज जरा चांगले कपडे आणायला हवे होते, तिच्या शाळेत जाण्यासाठी.'' सारा त्याची आणि मनवाची लेक. वय वर्षे १२. पुण्यातल्या एका नामांकित शाळेत सातव्या वर्गात शिकणारी, त्या दोघांची राजकन्या!

मनवा आणि महेशची दोस्ती टेनिस कोर्टवर झालेली. तो सडसडीत शरीरयष्टीचा सावळा, सतेज तरुण तर मनवा उंच, शेलाटी गौरवर्ण उभट चेहऱ्याची! तिच्या चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज. ती अभ्यासात हुशार आणि खेळात प्रवीण! तो अतिशय खिलाडू वृत्तीचा, खेळकर स्वभावाचा, मैफिलीत रंगत आणणारा, हसवणारा, दिलखुलास व्यक्तिमत्त्व असणारा असा लोकप्रिय टेनिसपटू! तिला त्याचा स्वच्छंद मोकळेपणा मनापासून भावलेला, त्याची कलंदर वृत्ती आवडलेली. त्यांचे सूर जुळले आणि तो तिच्या प्रेमात आकंठ बुडाला.

दोघांचा खेळ उत्तम... या सदरात मोडणारा. त्यांचे मिक्स डबल्स अगदी डोळ्यांचे पारणे फिटवणारे. दोघेही राज्यस्तरावर खेळू लागले. त्यांच्या जोडीचा खेळ बघायला विशेष गर्दी व्हायची. इतके सफाईदार शॉट्स लागायचे की, 'महेश-मनवा' असा जबरदस्त जल्लोष टेनिस कोर्टवर व्हायचा. जवळजवळ तीन वर्षे ही जोडी अबाधित खेळत राहिली, जिंकत राहिली! दोघेही मनाने अधिकाधिक जवळ येत गेले.

मनवाला एका राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ऑफिसरची नोकरी अगदी सहज लागली. ती तिथे लगेच रुजू झाली. मात्र महेशला अशी कायमस्वरूपी नोकरी लागली नाही. तो आपले आयुष्य पूर्वीप्रमाणेच स्वच्छंद जगत होता. टेनिसच्या मॅचेस, कोचिंग, कधी बाहेरगावी जाऊन टेनिसच्या टुर्नामेंट अशी त्याची धावपळ असायची. मनवाच्या घरी लग्नाबाबत विचारपूस होऊ लागली.

''महेश, तू काही विचार केलाय का, आपल्या नात्याचे पुढे काय होणार? फक्त कोचिंगवर कसे काय चालणार?'' मनवाने त्याला थेट प्रश्न केला.

तिचे त्याच्यावर जिवापाड प्रेम होते; मात्र तिच्या मनात कायम एक धाकधूक असे. त्याचे बरेच नाव होते. मात्र अजूनही त्याच्या जीवनात स्थैर्य नव्हते. त्याने तिचा हात हातात घेतला...

''मनू... होईल सारे काही नीट. मी आहे ना. काही काळजी करू नकोस.'' महेशने उत्तर दिले.

''बरे, आपण दोघे करूया मिळून सारे काही, जसे जमेल तसे...'' मनवाने जणू स्वतःला धीर दिला.

ती उच्च मध्यमवर्गीय घरातली, नोकरीपेशा आई-वडिलांची मुलगी. आई-बाबांनी समजावले...

''बघ त्याची वृत्ती कलंदर आहे आणि तुझा स्वभाव वेगळा; पूर्ण विचार करून निर्णय घे. जीवनाकडे तो हव्या तेवढ्या गांभीर्याने बघत नाही.'' तिने सांगितले...

''आई-बाबा, मी पूर्ण विचारांती हा निर्णय घेते आहे.'' त्यांनी आपल्या एकुलत्या एक मुलीचा निर्णय मान्य केला. मनवा आणि महेशने रजिस्टर लग्न केले. छान फुलपाखरी दिवस होते ते. तो घरातली कामे करण्यात मदत करायचा. घराचे व्यवस्थापन करायचा. मनवाची जबाबदारीची नोकरी, घरसंसार आणि महेशचे कोचिंग, असे चक्र सुरू होते.

टेनिस हा खेळ मुळातंच वरच्या क्लासमधला. या खेळातले सारे सामान महाग... बूट, कपडे, रॅकेट, कोचिंग. आपण एका विशिष्ट उंचीवर खेळून काहीतरी भव्य-दिव्य करू, असे महेशचे स्वप्न. मात्र, त्याच्या पदरात फारसे यश पडलेच नाही. मनवा त्याला धीर देई...

तीन-चार वर्षे झाली. मनवा तिच्या नोकरीत रुळली. घरादाराची आर्थिक जबाबदारी मात्र तिच्याच खांद्यावर आली. कारण महेशचे मिळणारे पैसे त्याच्याच खेळावर खर्च होत. हल्लीचे राहणीमान, वाढती महागाई, सर्वांचा ताळमेळ बसवताना दमछाक होई.

साराचे, त्यांच्या परीराणीचे आगमन झाले आणि मनवा संसारात पुरती गुरफटली. मनवाचा खेळ मात्र मागे पडू लागला. ती बँकेच्या कामात अतोनात बुडाली. मोठ्या पदावर असल्यामुळे कामाची जबाबदारी, टार्गेट, घर आणि छोटीशी सारा... ती या साऱ्या चक्रात गरगर फिरू लागली. महेशच्या स्वप्नातले काही सत्यात उतरले नाही. सारा दिवसभर तिच्या पापाच्या देखरेखीत असे. तिची शाळा, तिचे बसमधून जाणे येणे, तिचा अभ्यास, तिच्या सर्व छोट्या-मोठ्या गरजा यासाठी तिला सतत तिचा पापा लागायचा. त्यामुळे त्यांचे दोघांचे एक घट्ट नाते निर्माण झाले. त्यांचे स्वतंत्र असे जग होते, ज्यात मनवा आसपासही नव्हती. तिला कधी कधी अपराधी वाटत असे की, आपण आपल्या लेकीला फारसा वेळ देऊ शकत नाही.

एक दिवस मनवा आणि महेश दोघेही तिला शाळेत सरप्राईज द्यायचे म्हणून घ्यायला गेले. दोघांनाही शाळेबाहेर पाहून सारा खूप आनंदी झाली. मनवाने आपले हात पसरले, साराला जवळ घ्यायला; मात्र सारा सहजपणे महेशच्या मिठीत विसावली आणि त्याच्या गळ्यात हात टाकत म्हणाली,

''पापा, तू मला सांगितलं नाहीस, तू येणार आहेस म्हणून...'' मनवा हिरमुसली. तिला वाईट वाटले. तिने साराला जवळ घेतले; मात्र मनाला तो हलकासा रेशमी सल बोचलाच. मनवाला तक्रार करायला तशी जागा नव्हती; मात्र तिला मधूनच वाईट वाटे, आपली लेक आपल्या जवळची नाही, तिला वडिलांबद्दल प्रेम आहे, मात्र आईबद्दल थोडासा आकस वाटतो.

असाच एक साधारण दिवस... आज मनवाला खूप काम होते. का कुणास ठाऊक काहीतरी बिनसल्यागत वाटत होते. का बरं मला असा ताण जाणवतो आहे? मनवाने विचार केला. सगळंच तर ठीक आहे, लौकिक अर्थाने! प्रेम करणारा नवरा, एक सुंदर अशी लेक, चांगली नोकरी, चांगले राहणीमान... मग मला नक्की काय होतंय? माझ्या मनात काय बोच आहे?

तिच्या मनात आले की, आपलं आयुष्य म्हणजे एक त्रिकोण आहे, त्रिकोणामध्ये दोन बिंदू स्थिर आहेत, महेश आणि सारा; मात्र वरचा बिंदू एकाकी आहे... ती अशा विचारात गुंतलेली असताना साराच्या शाळेतून तिच्या मॅडमचा फोन आला. त्या म्हणाल्या,

''मॅडम, आत्ता साराला तुमची गरज आहे. घ्यायला येता ना... कारण अजून शाळा सुटायला बराच वेळ आहे.''

''हो, हो, बघते... नाहीतर पाठवते तिच्या पापाला.'' तिने उत्तर दिले.

'अरे देवा! आज तर माझी कस्टमर मीट, पुढच्या दहा मिनिटात सुरू होणारी!' तिला आठवलं या मीटिंगसाठी किती मेहनत घेतली होती तिने. आता जाणे कसे शक्य आहे? तिने महेशला फोन केला. तिची निकड सांगितली. मॅडमचा निरोप सांगितला... तिची कस्टमर मीट, त्यात तिचे उपस्थित राहणे किती गरजेचे हेही सांगितले.

पण हाय रे देवा... तो आज नेमका ५० किलोमीटर लांब होता तळेगावला!

काय झालं असेल माझ्या लेकीला...? तब्येत तर बिघडली नसेल? अनेक शंका तिचे मन कुरतडू लागल्या. त्यानंतर मनवाचे लक्ष पार उडाले. तिने घाईघाईने फोन लावून तिच्या वरिष्ठांना सांगितले. तिची एकूणच मनस्थिती पाहता, तिची निकड सर्वांना कळली आणि तिच्यातल्या आईने झेप घेतली आपल्या लेकीकडे!

''काय झाले मिस?'' मनवाने विचारले. मॅडमच्या मागोमाग सारा आली, थोडीशी बावरलेली, हळवी झालेली, डोळ्यात किंचित पाणी आणि तिने 'मम्मा' म्हणत मनवाला घट्ट मिठी मारली. मॅडमने मनवाला खूण केली. मनवाने तिला थोपटले. मायलेकींना स्पर्शाची भाषा कळली.

''अगं एवढेच ना... घाबरू नकोस. मी सांगितले होते ना तुला. चल घरी जाऊ या.'' मनवाने म्हटले,

''अगं सारू... सगळ्या मुलींना यातून जावे लागते. तू मोठी होत आहेस. उमलते आहेस. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, सहजपणे घेण्यासारखी!''

''चल तू कपडे बदल आणि आराम कर. मी तुला गरमागरम सूप करून देते. तुला बरे वाटेल.''

तेवढ्यात महेश आला चिंताग्रस्त असा. त्याने पाहिले तर त्याची सारा तिच्या मम्माला घट्ट बिलगून बसली होती आणि त्यांच्या गुजगोष्टी सुरू होत्या. मध्येच त्या दोघी खुसुखुसु हसतही होत्या. त्याने काळजीने विचारले,

''काय झाले साराला?''

''ते माझे आणि मम्माचे सिक्रेट आहे.'' सारा म्हणाली; आणि महेशच्या प्रश्नार्थक चेहऱ्याकडे बघत मनवा गुणगुणली...

'कळीचे फूल होताना.. आम्ही पाहिले आहे...'

मनवाने आनंदाने एक गिरकी घेतली आणि ते तिघेही एकमेकांना बिलगले. मनवाच्या मनात आता कोणताही बोचरा सल नव्हता. आकाश निरभ्र झाले होते...

## दीपमाळ

**प्रकाश एदलाबादकर**
९८२२२२२११५

# लोभ अहंता न ये मना, जगी विरक्त तोचि जाणा



'द्वा सुपर्णा सयुजा सखाया सामान वृक्ष परिषस्वजाते ।
तयोरन्याः पिप्पलं स्वाद्वत्य नश्नन्न्यो अभिचाकषीति ॥
समाने वृक्षे पुरुषो निमग्नोडनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्ट यदा पश्यत्यन्मीशमस्य महिमानमिती वीतशोकाः ॥'

हा श्लोक मुंडकोपनिषद आणि श्वेताश्वतरोपनिषद यात सापडतो. हा श्लोक मला नेहमी विचार करायला लावतो. एकाच वृक्षावर दोन पक्षी आहेत. त्यापैकी एक फळे खातो आहे आणि दुसरा शांतपणे स्वस्थपणे बसला आहे. फळे खाणारा पक्षी कडू आणि गोड अशी दोन्ही प्रकारची फळे खातो. सुख आणि दुःख यांचे अनुभव घेतो. दुसरा मात्र काहीच खात नाही. म्हणून सुख आणि दुःख याविषयी तो उदासीन आहे आणि आपल्याच चिंतनात मग्न आहे. या श्लोकातील दोन्ही पक्षी परस्परांच्या जवळ बसलेले आहेत हे महत्त्वाचे.

वरील दोनपैकी आपले रूप आपण कोणत्या पक्ष्यात बघावे, असा प्रश्न जेव्हा मनात येतो, त्यावेळेला मला फळे खाणारा पक्षी हाच आपले रूप असल्याचे जाणवते. प्रपंचाचा मार्ग तुडविताना मनामध्ये जगरहाटीविषयी कितीही उदासीनता बाळगावी असे ठरविले तरीही ते साध्य होत नाही. आपले मन विकार आणि विचार यांनी भरलेले असते. जगण्याची सोनेरी- रुपेरी स्वप्ने आपण बघत असतो. ही स्वप्ने वास्तवात यावी म्हणून ऊर फुटेस्तो, मृगजळामागे धावावे तसे धावतो. परंतु जगण्याचे वास्तव जसे जसे पुढे येते, तशी या स्वप्नांना तिलांजली देण्याची पाळी येते. संसारातल्या अनेक कडू आणि गोड अनुभवांना सामोरे जावे लागते. संत तुकोबारायांच्या मनातही हीच अस्वस्थता दिसून येते. जीवनाचे खरे श्रेय कोणते, भाग्याचा क्षण कोणता या प्रश्नाचे उत्तर शोधताना तुकोबारायांचेही मन तळमळले आहे. परंतु आत्मलाभ हाच सुखाचा परमोच्च क्षण आहे, हेच त्यांच्या प्रत्ययाला येते. ते म्हणतात-

'ऐसे भाग्य कई लाहाता होईन ।
अवघे देखे जन ब्रह्मरूप ॥
मग तया सुखा अंत नाही पार ।
आनंदसागर हेलावती ॥'

प्रपंचाचा गाडा रेटताना सर्वच क्षण दुःखाचे नसतात, काही क्षणी सुखाचा कोवळा केशरी प्रकाश आपल्या आयुष्यात पडतो. परंतु सुख हे क्षणिक असते. सुख आणि दुःख यांना समदृष्टीने बघणे हीच किमया साधली पाहिजे. इहलोक आणि परलोक यांच्या पलीकडच्या सुखाची ही कल्पना आहे. यात कोणत्याही तृष्णेचा, लालसेचा, लोभाचा लवलेशही नसतो. अशी स्थिती प्राप्त झाली की, मनामध्ये आत्मप्रकाशाची पहाट फुलू लागते. आत्मानंदात आपण विलीन होतो. वर दिलेल्या उपनिषदाच्या श्लोकात हे दोन्ही पक्षी, एकाच आत्म्याची दोन रूपे म्हणून शास्त्रवेत्त्यांनी समजावून दिली आहेत. (सुप्रसिद्ध साहित्यिक विश्राम बेडेकर यांनी आपल्या आत्मचरित्राला 'एक झाड दोन पक्षी' असे शीर्षक दिलेले आहे. आत्मचरित्राच्या प्रारंभी याच श्लोकाचा त्यांनी उल्लेख केला आहे. मीच मला बघतो आहे, अशी त्यांची लेखनशैली आहे. सहज ओघाने आठवले म्हणून लिहिले.) माणसाला पूर्ण तृप्ती आली की तो निर्भय होतो आणि ही पूर्ण तृप्ती केवळ स्वतःची ओळख झाल्यावरच होते.

'अरे अरे ज्ञाना झालासी पावन ।
तुझे तुज ध्यान कळों आले ।'

हे माउलीचे उद्गार, नरजन्माची धन्यता कशात आहे, हे सांगून जाते. ज्ञानदेवांच्याही आयुष्यात त्यांची अवहेलना, अपमान, उपेक्षा करणारे अनेक प्रसंग आले. त्यांच्याच कशाला अनेक संतांच्या, सत्पुरुषांच्या एवढेच नव्हे, तर समाजात नीतिमूल्ये रुजविण्याची पराकाष्ठा करणाऱ्या संस्थांच्या आयुष्यातही असे उपेक्षेचे, अपमानाचे, दुर्लक्षाचे, अवहेलनेचे प्रसंग येतच असतात. त्यातूनच पुढे जात माणसाला आपले ईप्सित साधावयाचे असते. ही जगरहाटी आहे. जिथे जिथे ज्ञानेश्वर असतील तिथे तिथे विसोबा आणि जिथे जिथे तुकोबा असतील तिथे तिथे मंबाजी असतातच.

योगिराज शांतिब्रह्म ज्ञानदेवांच्या आयुष्यातही असा प्रसंग घडलेला आहे. संन्याशाची पोरे म्हणून समाजाने हिणविलेल्या या चारही मुलांनी अनन्वित छळ सहन केला. ज्ञानदेव आणि सोपानदेव यांच्या झोळीत शेणमाती कालवून त्यांना अन्नच नाकारण्याचे उद्योग याच समाजाने केले. यामुळे माउली क्रोधाविष्ट झाली. माउलीला अतिशय दुःख झाले. आपण या समाजाला यत्किंचितही दुखावले नाही, त्याचा अपमान केला नाही तरीही अशी वागणूक आपल्या वाट्याला का यावी, हा प्रश्न त्यांना छळू लागला. सहनशक्तीची परिसीमा झाली. आपल्या झोपडीची ताटी बंद करून ते आत जाऊन बसले. ही कथा सूज्ञ वाचकांना ठाऊक आहेच. ज्ञानदेवांना या अवस्थेतून बाहेर काढले आणि त्यांना समजावले ते मुक्ताबाईने! आदिशक्ती मुक्ताईचा अधिकार फार मोठा होता. माउली ताटी बंद करून आत का बसली आहे, हे तिच्या लक्षात आले. तिच्यातील आई जागी झाली. 'मला आता या जगात राहण्याची इच्छाच नाही. मला या जगाचा आणि जगण्याचा कंटाळा आलेला आहे. या सर्वांचा तिटकारा आला आहे. कुणाशीही बोलावेसे वाटत नाही.' असे उद्गार विमनस्कपणे काढणाऱ्या माउलीला मुक्ताईने आपल्या ताटीच्या अभंगातून समजावले. आपलीही अनेकदा अशीच अवस्था होते. असे वाटते की, सर्व संबंध तोडून टाकावे. कुणाशीही बोलू नये. एकटेच असावे. सारे जग आपल्यावर उलटले आहे, अशी भावना होते. सहनशक्तीची परीक्षा होते, पण आपल्याला काही मुक्ताईसारखी शक्तिदात्री आज घडीला समजवायला येत नाही, हीच आपली शोकांतिका आहे. म्हणूनच आपल्याला मागे वळावे लागते. आपला शोध आजही ताटीच्या अभंगातूनच घ्यावा लागतो.

आपल्या पौराणिक ग्रंथात अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व अशा आठ सिद्धी सांगितल्या आहेत. या सिद्धी ज्याला प्राप्त होतात त्याला असीम क्षमता प्राप्त होतात, असे मानले जाते. परंतु ताटीच्या अभंगात मुक्ताईने माउलींना जो उपदेश करविला आहे, त्यात या आठही सिद्धीच्या पलीकडली नववी सिद्धी सांगितली आहे आणि ती आहे 'सहन सिद्धी.' अन्याय सहन करण्याची क्षमता वर्धमान होत गेली आणि वृत्ती क्षमाशील होत गेली की, सारे विश्व तुमच्या पायाशी लोळण घेते. गंमत अशी आहे की, सारे आयुष्य आपल्या ओंजळीतून निघून जाते, परंतु आपली वृत्ती सहनशील होत नाही. आज समाजात आणि कुटुंबात तरी काय आढळते? काहीही सहन करण्याची वृत्तीच नष्ट झाली आहे. प्रत्येक ठिकाणी आक्रमकता वाढली आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक या क्षेत्रात हे प्रकर्षाने दिसते. एवढेच कशाला आध्यात्मिक आणि पारमार्थिक क्षेत्रही याला अपवाद राहिलेले नाही. रोजचे वर्तमानपत्र, सोशल मीडिया, दूरचित्रवाणी यावरून येणाऱ्या बातम्या ऐका म्हणजे माझ्या म्हणण्याची प्रचीती येईल.

मुक्ताई म्हणाली होती, 'हे बोलणे तू मनावर घेऊ नकोस. खोट्या जगावर रागावू नकोस. असे केलेस तर तुझ्या खऱ्या क्रोधाचे मोल नष्ट होईल. अरे, माझ्याशी तरी बोल. ताटी उघड आणि झोपडीबाहेर नीघ.' खरेच आहे, ज्ञानच जर रुसून बसले तर मुक्तता येणार कुठून? आपलेही ज्ञान तोकडे पडावे किंवा गोठून जावे अशा वागणुकीला आपल्यालाही सामोरे जावेच लागते. म्हणून मुक्तामाय म्हणाली होती...

'योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥
विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥
शब्द शास्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ॥
विश्व पट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥'

योगी हा नुसता शरीराने पावन असून चालत नाही. तो मनानेही पावन असला पाहिजे. आजूबाजूचे विश्व जरी अग्नीसारखे पेटून उठले असले, तरी आपण पाण्याप्रमाणे राहावे. दुरभिमान आणि अहंकार हे परमार्थाच्या मार्गातील दोन मोठे अडसर आहेत. यांना दूर ठेवले तरच आपले मन विश्वाशी एकरूप होते. ज्या जगावर ज्ञानदेव रुसले होते, त्याच जगाच्या कल्याणासाठी त्यांचा जन्म झाला आहे, हे मुक्ताई त्यांना वारंवार सांगते आहे. ज्यांना समाजाचा उद्धार करायचा असेल त्यांना असे छळ वारंवार सहन करावे लागतात. परंतु एक वेळ अशी येते की, सारे जग त्या सत्पुरुषाच्या पायाशी लोळण घ्यायला येते. शेवटी अहंकारविरहित शुद्ध मन हे सोन्यासारखे असते. सोन्याला आगीत टाका, धुळीत फेका याची चमक जात नाही. सोने कितीही अग्नीत तापवा त्याचे तेज वाढतच जाते. चंदनाला कितीही घासा त्याचा सुगंध वाढतच जातो. उसाला कितीही छाटा त्याची गोडी वाढतच जाते. सत्पुरुषांचेही असेच आहे. समाजात नवविचारांची क्रांती घडवून आणणाऱ्यांनी यासाठीच कधीतरी स्वतःपासून दूर होऊन स्वतःकडे बघितले पाहिजे. आपले व्यक्तिमत्त्व वारंवार परिष्कृत केले पाहिजे. हे सर्व करीत असताना आपले मन आपल्या ध्येयप्राप्तीसाठी अविचल ठेवले पाहिजे. यासाठीच हवी ती 'सहन सिद्धी!' अशीच माणसे संतपदाला पोहोचतात. आपण प्रापंचिक माणसे अति उच्च संतपदाला पोहोचवू शकत नाही, हे जरी खरे असले, तरी त्या दिशेने प्रयत्न करूच नये असे नाही. यासाठी मन स्वच्छ करण्याचे प्रयोग सातत्याने केले पाहिजेत...

'संत तोचि जाणा जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ॥
लोभ अहंता न ये मना । जगी विरक्त तोचि जाणा ॥
इह परलोकी सुखी । शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी ॥
इह परलोकी सुखी । शुद्ध ज्ञान ज्या ॥
मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
आपण एक साधू झाले । येर कोण वाया गेले ॥
उठे विकार ब्रह्मी मूळ । अवघे मायेचे गबाळ ॥
माया नुरे जेव्हा । विश्व ब्रह्म होईल तेव्हा ॥
ऐसा उमज आदिअंती । मग सुखी व्हावे संती ॥
चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघड ज्ञानेश्वरा ॥'

अशारीतीने मुक्ताईने उपदेशिली सहनसिद्धी केवळ ज्ञानदेवांसाठी नसून आपल्यासाठीही आहे, हे समजून घेतले पाहिजे. मनातील सर्व विकार नष्ट होऊन आपण स्थिरचित्त झालो की, फळे खाणाऱ्या पक्ष्याकडे बघत असलेल्या आणि त्याचेच दुसरे प्रतिबिंब असलेल्या उदासीन पक्ष्याची वृत्ती आपल्या अंगी येईल. सर्वत्र समदृष्टीने बघण्याचा योग साधेल. ही वृत्ती अंगी आली की, मुक्ताईने सांगितलेली 'सहनसिद्धी' साधेल.

## सुखात्म

**डॉ. अविनाश भास्कर मोहरील**
९४२३१२३९०६

# आज सरे मम एकाकीपण!



आईच्या गर्भामध्ये एका छोट्याशा बीजाच्या रूपात आपले अस्तित्व निर्माण होते. माता-पित्याचा अंश बनून आपण एका अद्भुत विश्वाच्या दिशेने हळुवारपणे प्रवास करू लागतो. एक अफाट व अनाकलनीय विश्व ज्याच्या उत्पत्तीचे अनेक वैज्ञानिक तर्क आहेत, परंतु त्याच्या शाश्वत अस्तित्वाबद्दल ज्ञान अद्याप अप्राप्त आहे. या विश्वामध्ये आणखी एक अद्भुत गोष्ट आहे, जी येथील सर्वच बाबींची दोन मुख्य गटांमध्ये विभागणी करते. सजीव आणि निर्जीव. सजीवाचे वेगळेपण सिद्ध करणारी चेतना ज्यास 'आत्मा' असे नाव देण्यात आले; ती देखील एक गूढ कल्पना आहे. एका प्रचंड मोठ्या ऊर्जा स्रोताचा एक लहानसा भाग एका जिवात प्रवेशित होऊन एक काया धारण करतो व ती काया काही विशिष्ट कालावधीनंतर त्या उर्जेला पुन्हा कदाचित तिच्या मूळ स्रोताकडे जाण्यास वाट मोकळी करून देते. या प्रवेश अर्थात जन्म आणि गमन अर्थात मृत्यू या दोन विलक्षण टोकांमध्ये प्रत्येकाला मिळालेले जीवन ही या सबंध विश्वातील एक अभूतपूर्व घटना असते. जन्मापूर्वी व मृत्युपश्चात त्या ऊर्जास्रोताच्या नशिबी असलेले एकाकीपण त्या जीवनरूपी कालावधीमुळे सरून जाते व त्या जीवनाला समृद्ध करण्यासाठी अनेक लोक वेगवेगळ्या स्वरूपात भेटत राहतात ज्यामुळे जीवन तेजोमय होऊन जाते. त्या शरीरातील उर्जेला एक आकार प्राप्त होतो व त्यास विस्तारायला, उंच भरारी घ्यायला एक आकाश मिळते. परंतु या विस्ताराकरिता अनेक जण कारणीभूत असतात; म्हणूनच त्यांच्या प्रतीचा तो आत्यंतिक कृतार्थ भाव ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके यांनी एका अत्यंत सुंदर काव्यामध्ये मांडला आहे. जणू निशेच्या अस्तित्वाने काळोखामध्ये बुडून गेलेल्या अवनीस सूर्यनारायणाच्या आगमनाने एकाकीपण सरल्यागत वाटत असेल तसेच माणसाच्या आयुष्यात आईच्या उदरातून बाहेर आल्यावर या अफाट विश्वामध्ये घेतलेला पहिला श्वास म्हणजे त्याचे एकाकीपण संपविणाराच ठरतो, तेथूनच त्याच्या तेजोमय जीवनाचा प्रवास सुरू होतो. शांताबाई लिहितात,

'आज सरे मम एकाकीपण
तेजोमय हो अवघे जीवन!'

एखाद्या व्यक्तीच्या जीवनात हे तेज म्हणजे त्याच्या जीवनाला आकार देण्याकरिता त्याच्या संपर्कात येणारे वेगवेगळे लोक होत. त्या व्यक्तीचे अस्तित्व बहरून येण्यासाठी, त्याला वेगवेगळ्या मानसिक स्थितींमध्ये आधार देण्यासाठी, ठेच लागून पडल्यावर त्याला उचलण्यासाठी, त्याच्या मनातील विविध कल्पनांना दिशा देण्यासाठी, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यासाठी, त्याला मानवाचा जन्म प्राप्त झाला आहे त्यामुळे त्याचे मनुष्यत्व सिद्ध करण्यासाठी, त्याच्या जीवनाच्या विकासासाठी त्याला पावलोपावली मदत करणारे व पाठबळ देणारे अनेक हात तेजोमय संजीवन बनून त्याच्या सोबत असतात. हेच शांताबाईंनी लिहिलेय...

'उजळीत फुलवित चराचराला
हृदयी अजी रविराज उदेला
श्रांत विकल या मम जीवाला
तेज तयाचे दे संजीवन!'

या अशा पद्धतीने अनेकांच्या सहवासाने व सहकार्याने समृद्ध होणारे जीवन कायमच यशस्वीतेच्या मार्गावरून जाते असे नाही. या त्याच्या मार्गात काही अडथळे येतात. काही अडथळे त्याचे स्वतः निर्मित असतात तर काही त्याच्या मार्गामध्ये अवरोध निर्माण करण्यासाठी येतात. अशावेळी हा तेजोमय प्रकाश दुःखाच्या तमाखाली झाकला जातो. प्रवासाची गती कमी होते. अशा वेळी वेदना, अवहेलना किंवा उपेक्षा असल्या बाबींचा सामना करावा लागतो. या अशा प्रसंगी काही वेळा तर हा प्रवास आता पुढे जाऊ शकेल की नाही, इतपत मानसिक दुर्बलता निर्माण होते. कमी-अधिक प्रमाणात असले प्रसंग सर्वांनाच सहन करावे लागतात आणि त्यावेळी परत तेच एकाकीपण डोके वर काढायला लागते. आता मात्र या सर्व वेदनादायी स्थितीत मनावर उमटलेल्या वेदनेवर फुंकर घालण्यासाठी आपल्यासोबत कुणीतरी असते व त्याचे सोबत असणे ही खरी उपलब्धी ठरते. त्या सोबतीमुळे परत एकदा ते दुःखाचे तम ओसरू लागते, वेदनांनी काजळून गेलेले हृदय पुन्हा प्रकाशित होऊ लागते. असे झाले की, आयुष्याला परत नवा बहर येतो व त्याचे सुरेल गाणे होऊ लागते. शांताबाई हे फार सुरेख मांडतात...

'सुवर्ण आरुण प्रकाश पसरे
हृदयीचे उजळले कोपरे
तम दुःखाचे अखिल ओसरे
चित्ती स्फुरले सुंदर गायन!'

या असल्या वेदनांच्या व दुःखाच्या प्रसंगांमध्ये त्या हताश जीवनाला ज्यांनी सांभाळले असते, ज्यांनी त्याच्या मनावरील दुःखाचे तम ओसरविण्यास मदत केली असते, ते तर त्याच्या जीवनाचा खराखुरा आधार बनलेले असतात. त्यांच्या पासून आता कधीही वियोग होऊ नये, असे त्याचे मन कायमच देवाला प्रार्थना करीत असते. अशा व्यक्तीचा सहवास व प्रेम हे त्याला शरीरबंधनाच्या पलीकडे जाऊन आत्मिक वाटू लागते. अर्थात अशा कुण्यातरी आधारभूत ठरलेल्या व्यक्तीचे त्याच्या जीवनातील अस्तित्व, त्याला त्याच्या जीवनाला सचेतन ठेवणाऱ्या त्या ऊर्जास्रोताशी मिसळून गेलेले भासते व त्यामुळे ते नाते किंवा तो संबंध त्याच्या जीवनाचा मूलाधार बनतो. म्हणूनच त्याचे जीवनातील महत्त्व ओळखून त्याने कुठेही जाऊ नये तर सतत सोबत राहावे, अशी अपेक्षा त्याचे मन करीत राहते. ही त्याच्या मनाची अवस्था शांताबाई फार चपखलपणे रेखाटतात...

'असेच या पुढतीही देवा
वियोग अपुला कदा न व्हावा
नातरी टाका तनुही जाळून
जाऊ नका परी आता येथून!'

एखादे जीवन समृद्ध होण्यासाठी त्यास कितीतरी जणांचे सहकार्य लाभत असते, ही आठवण शांताबाई प्रकर्षाने या कवितेत आपल्याला करून देतात. मी व माझे या उक्तीने बरेच वेळा लोक जगतात. माझे सारे माझेच आहे, मी स्वयंपूर्ण आहे, मज कुणाचीही गरज नाही, मी आत्मनिर्भर आहे अशा पद्धतीच्या वल्गनादेखील सहजच केल्या जातात. परंतु विधात्याने मुळात प्रत्येक सजीवाची निर्मिती करताना वेगवेगळ्या आधारांच्या सोबतीनेच त्याला जगणे भाग पडावे, अशी केली आहे. त्याच्या अस्तित्वाच्या पहिल्या अणूच्या निर्मितीसाठी त्याच्या आई-वडिलांच्या आवश्यकतेपासून तो त्याच्या जीवित अस्तित्वाच्या शेवटच्या हुंकारापर्यंत कायम त्याला कुणावर तरी अवलंबून राहावे लागणार, हीच परमेश्वराची योजना आहे. दोन एकाकीपणांमधील सर्वांच्या सहकार्याने उजळून निघणाऱ्या जीवनात या सर्वांप्रती ऋणनिर्देश करण्याचा व कृतज्ञता व्यक्त करण्याचा निदान एक दिवस ठरवावा. त्याकरिता आपला जन्मदिवस हा फारच योग्य राहू शकतो. कारण त्याच दिवशी आपले एकाकीपण सरून आपले जीवन अनेकांच्या मदतीने तेजोमय होण्याची सुरुवात झालेली असते. त्या सर्वांना या दिवशी मनापासून सांगणे असते, माझ्या जीवनाला तुम्हा सर्वांच्या प्रेमाचा व सहकार्याचा जो भरभक्कम आधार लाभलाय, ते माझे पूर्वसंचित आहे व ते कायम माझ्या सोबत राहावे, तुम्ही साऱ्यांनी मला सांभाळत राहावे व आपला स्नेह असाच कायम वृद्धिंगत व्हावा. कारण तुमचे माझ्या जीवनातील अस्तित्व हेच तर खरे संजीवन आहे.. तेच माझे एकाकीपण संपविणारे तेज आहे. केवळ ते आहे, म्हणूनच मी आहे!

## प्रबंधांची बीजे

**श्रीरंग श्री. हिर्लेकर**
९४२२११९८९३

# योगेश्वर कृष्ण व कर्मयोग

भगवान श्रीकृष्ण हे एक विलक्षण तत्त्व आहे. 'यो बुद्धे परतस्तु तः।' बुद्धिवाद्यांना समग्रतेने त्याचे आकलन होणे अशक्य आहे आणि ही जाणीव त्यालाही असल्याने त्याने स्वतःच 'मां तु वेद न कश्चन' म्हणजे मला कोणीच जाणू शकत नाही, या शब्दात सांगितले. मात्र, भक्तियुक्त अंतःकरणाने जो प्रयत्न करेल त्याला मात्र माउलींच्या हरिपाठात म्हटल्याप्रमाणे-

'भावबळे आकळे येरवी नाकळे ।
करतळी आवळे तैसा हरी ।'

असे खात्रीने होईल. गीतेत त्याचा उल्लेख केवळ योगेश्वर असा नसून 'महायोगेश्वर' असा आहे व तो उचितच आहे. 'आचार्य' या शब्दाचे वजन नको तेथे वापरून हरवलेले आहे. 'आचिनोति स आचार्यः' म्हणजे स्वतः आचरण करेल तो आचार्य. त्याने ज्या योगाचा गीतेत सातत्याने उल्लेख केला, विविध अंगाने आयुष्यभर पुरस्कार केला, तो योग स्वतः प्रत्यक्ष आचरून दाखवला आणि म्हणून वरील व्याख्येप्रमाणे कृष्ण खऱ्या अर्थाने योगाचार्य होता. म्हणूनच भागवतानेही त्याचा गौरव 'योगिनां परं तत्त्व' असाच केला.

गीतेत कृष्णाचे आगमन होते ते दुसऱ्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकात. तेथून त्याने जी सूत्रे हाती घेतली ती शेवटपर्यंत म्हणजे १८ व्या अध्यायापर्यंत सोडली नाहीत. नेणत्या अर्जुनाने तीव्र जिज्ञासेने प्रश्न विचारावेत आणि आचार्य कृष्णाने त्याचे समाधान करत गतसंदेह करावे, स्वतःसारखेच स्थिर करावे, असे ते गीतोपनिषद होते.



गीतेचा प्रतिपाद्य विषय म्हणजे कर्मयोग. कर्मच्युत होऊ पाहणाऱ्या अर्जुनाला कर्मप्रवण केल्यावरच तो थांबला. त्यानिमित्ताने सांख्य, ज्ञान, भक्ती या सर्वांचा परामर्ष घेत कर्माचा पुरस्कार केला. 'एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रुणु... कर्मबंधं प्रहास्यसि ।' म्हणजे आतापर्यंत ऐकलेले सांख्य तत्त्वज्ञान कर्मयोगाच्या दृष्टीने ऐकशील तर तू कर्मबंधातून सुटशील आणि ते सांगताना कोणतेतरी ऐतिहासिक संदर्भ न देता स्वतः आचरलेल्या कर्मयोगाचे पाठ त्याला दिले. हा कर्मयोग कसा आचरावयाचा तर अनासक्त आणि ईश्वरार्पण पद्धतीने. 'यत् करोषी यदश्नाषी..तत् कुरुष्व मदपर्णम्।' किंवा 'जे जे करिसी खासी तपशील होमशील बापा रे । कि दान धर्म पार्था अर्पण करी तू मलाचि ते सारे ।' येथे मी म्हणजे समोर दिसणारा वासुदेव कृष्ण इतका सीमित अर्थ नसून सहस्राक्ष सहस्रपात् ईश्वर अध्याहृद आहे.

**योगाच्या व्याख्या** : १८ अध्यायी गीतेचा अभ्यास करताना प्रत्येकी ६ अध्यायांचा एक गट अशी विभागणी करावी. पहिल्या अर्जुनविषादानंतर दुसऱ्या अध्यायाच्या सुरुवातीला सांख्यबुद्धी सांगत योगबुद्धीचा उपन्यास करताना 'योगस्थ कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।' किंवा 'मा फलेषु कदाचन' हे सांगितले, तसेच 'योगःकर्मसु कौशलम् आणि समत्वं योग उच्यते' म्हणजे समत्व बुद्धीने कामनारहित कर्म करण्यातच योगाचे कौशल्य आहे, अशा व्याख्याही सांगितल्या. पुढे स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगताना असक्त कर्माचरण कसे असते, हे विस्ताराने सांगितले.

तिसऱ्या व चौथ्यात 'न मे कर्मफले स्पृहा ।' मी तर अनासक्त. म्हणजे मला स्वतःला काहीच मिळवायचे नाही, मी आदिकाळापासून अनेकांना हेच सांगत आणि करत आलो, असे केल्याने मी अनेक उलाढाली करूनही दोषरहित राहतो, हे स्पष्ट केले. म्हणून माझे जन्मकर्म दिव्य आहे, हेही वर सांगितले. पुढे पाचव्या अध्यायात योग्याचे कर्म आणि त्यातून कैवल्यसाधन एकच कसे ते समजावले. पुढे सहाव्या अध्यायात तप, ज्ञान, कर्मकांडांचा पसारा या सर्वांहून अपेक्षारहित कर्मयोगच कसा श्रेष्ठ हे सांगत 'तस्मात् योगी भवार्जुन' म्हणजे तूसुद्धा माझ्यासारखाच योगी हो, असा आग्रह केला.

आतापर्यंतच्या या तात्त्विक विवेचनानंतर पुढील ७ ते १२ या दुसऱ्या गटात जरी भक्तीच्या माध्यमातून सुरुवात केली तरी त्या सर्वांचा ओघ निःसंग होण्यासाठी माझीच भक्ती कर म्हणजे माझ्याच पद्धतीने निरपेक्ष राहून ईश्वरार्पण बुद्धीने प्राप्त कर्तव्य कसे करावे, हे सांगण्यासाठी होता.

'मय्यासक्तमताः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः'
(माझ्या पद्धतीने वागून हा योग कसा साधेल ते ऐक) किंवा
'अनन्य चेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभं पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।'
(सतत माझेच म्हणजे माझ्या मार्गाचे जो चिंतन करेल तो माझ्याच सारखा योगी होईल)

पुढे १२ व्या अध्यायात तर बहुतांशी हेच सर्व अनेक पद्धतीने सांगून असे जो वागतो तो मला प्रिय होऊन माझ्याच सम होतो हे सांगितले. भक्ताच्या चार अवस्था कोणत्या हे सांगताना आर्त, जिज्ञासू, कामी आणि ज्ञानी हे तर सांगितलेच; पण मला यथार्थ जाणणारा व वागणारा तोच ज्ञानी व तोच मला प्रिय किंवा मी व तो एकच हे बिंबवले. (श्रद्धेने भारले माझ्या ते योगी थोर मानितो). त्यांचा मी उद्धार करतो. 'तेषामहं समद्धर्ता.'

'अहं ब्रह्मास्मिः' याप्रमाणे भक्त, भक्ती व तिचे फलित समजावून देत भक्ताने आराध्यासारखे होण्याकरिता त्याचे आधी स्वरूप समजावून घ्यावे, असे म्हटले. कृष्ण म्हणतो की, माझे अनेक उद्योग आहेत; तरीही मी कशातच अडकलेलो नाही. ते तू नीट समजून घे आणि तसा हो.

'मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।'

नंतर त्याने 'विभूतियोग' या १० व्या अध्यायात आपल्या सर्वत्र पसरलेल्या योगैश्वर्याचे स्वमुखाने वर्णन केले. हेही सांगितले की, हे सर्व विश्व म्हणजे माझ्या खऱ्या स्वरूपाच्या फक्त १ अंशमात्र आहे. पातंजल योगसूत्रातील

'अणिमा गरिमा चैव महिमा लघिमा तथा ।
प्राप्तिः प्राकाम्य ईशित्वं वशित्वंचाष्ट सिद्धयः॥'

या वर्णनाप्रमाणे व्यापलेले ते रूप कृष्णाच्या 'अहं ब्रह्मास्मि'चे प्रत्यंतर होते. दिव्य, श्रेष्ठ, मध्यम, कनिष्ठ, स्थूल, सूक्ष्म, चल, अचल, सजीव, निर्जीव, रमणीय तसेच रौद्र अशा सर्व ठिकाणी तो कसा घनदाट भरला आहे ते सांगितले आणि पुढे ११ व्या अध्यायात त्याच्या त्या तशा सर्वव्यापी रूपाचा प्रत्यय देण्यापूर्वी सामान्यांच्या हे आकलनापलीकडील असल्याने 'दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्' म्हणत ते समजण्याची पात्रताही दिली. हेच पुढे १८ व्या अध्यायात-

'ईश्वरः सर्व भूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।'

माझ्या मायेने मी सर्वांना खेळवतो असे सांगितले.

याप्रमाणे १ ते ६ आणि ७ ते १२ या अध्यायात कर्मयोगाचे विवरणासह प्रत्यंतर देऊन पुढील १३ ते १८ अध्यायांच्या गटात हेच सर्व पुन्हा विस्ताराने सांगितले. १२ व्या अध्यायात ज्ञानप्राप्तीकरिता अनासक्ती, समचितत्त्व, अनन्यभक्ती सांगत कर्मयोग आणि भक्ती यांचे नाते सांगितले. १५ व्या अध्यायात पातंजल प्रणीत कैवल्यप्राप्तीसाठी द्वंद्वमुक्त, सुखदुःखांना सम मानणारेच कैवल्यपदाला नेहमीसाठी जातात, असे आश्वासन दिले. हे स्थान कसे तर आचार्य विनोबा सांगतात तसे-

'न त्यास उजळी सूर्य कायसे अग्निचंद्र हे ।
जेथे गेला न परते माझे अंतिम धाम ते ।'

येथेही पुन्हा मी क्षर आणि अक्षराहून निराळा म्हणूच मी पुरुषोत्तम असे सांगितले.

१६ व्यात आधी दैवी संपत्ती ती काय हे सांगताना सत्त्वसंशुद्धी, ज्ञानप्राप्ती, स्वाध्याय, त्याग या गुणांचा पुरस्कार करून ते सर्व असक्त कर्माकरिता असे सहाय्यभूत होतात, यावर भर दिला. १७ व्यात सदाचरणाची व्याख्या करत नियोजित कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करणे हेच योग्य असे म्हटले. १८ व्या शेवटच्या अध्यायात आतापर्यंत केलेल्या सर्वच उपदेशाचा धावता आढावा घेत-

'चेतसा सर्व कर्माणि मयि सन्यस्य मत्परः
बुद्धियोगं उपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ।'

म्हणजे बुद्धियोगाद्वारे ईश्वरासम व्हावे हे पुन्हा सांगितले. अनासक्ती कर्म करण्यात कधी स्वभावात-वागण्यात कठोरता किंवा रुक्षता आलेली आपण काही थोर समाजसेवकात बघतो. तशी ती न यावी म्हणून कर्म तर अनासक्त व्हावेच, पण ते ईश्वरभक्ती समजत ईश्वरार्पण व्हावे यासाठी भक्तियोगाचे महत्त्व आहे. हे करत करत कैवल्य प्राप्त करावे; नव्हे ते आपोआपच चालून येते. अशा स्थानी पोचलेले महापुरुष जे कर्म करतात त्याची त्यांना वैयक्तिक आवश्यकता नसते. 'जन्मकर्मच मे दिव्यं' सांगणाऱ्या कृष्णाने आयुष्यभर हेच केले. हेच त्याचे दिव्य जन्मकर्म. हाच त्याचा योग.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारा ।' आणि असे करत मोक्षाच्या वाटेवर चालणाऱ्या प्रत्येकाला एक दिवस 'आपणासारखे करिती तत्काळ । नाही काळवेळ तया लागी।' असे महापुरुष वागतात.

# साप्ताहिक राशिभविष्य

रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ ते शनिवार, दि. १८ ऑक्टोबर २०२५

मिलिन्द माधव ठेंगडी/ज्योतिष शास्त्री, ८६००१०५७४६

## महत्त्वाच्या घडामोडी संभव

मेष

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण कुंडलीतील तिसऱ्या स्थानातून सुरू होत आहे. यालाच पराक्रम स्थान म्हणतात. तेथे गुरू चंद्रासोबत एक राजयोग करीत आहे. याचवेळी आपला राशिस्वामी मंगळ बुधासोबत सातव्या स्थानी असून तो राशीला पाहात आहे. ही उत्तम स्थिती आहे. तिसरे स्थान प्रसिद्धी, प्रवासासाठी अनुकूल मानतात. चंद्र गुरूचा उत्तम योग काही धार्मिक कार्ये, तीर्थाटने, प्रवासाचे योग देऊ शकतो. त्यांची भाग्यावर दृष्टी असल्याने नोकरी-व्यवसायादी क्षेत्रात काही महत्त्वाच्या घडामोडी संभवतात. विदेश प्रवासाच्या संबंधानेही काही घटनाक्रम संभवतो. काही भाग्यकारक योग अनुभवास येतील. कुटुंबात आनंद व उत्साहाचे वातावरण राहील.
शुभ दिनांक - १२, १४, १६, १७.

## कुटुंबात उत्साहाचे वातावरण

वृषभ

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील दुसऱ्या स्थानातून सुरू होत आहे. हे धन स्थान आहे तसेच ते कुटुंबाचेही स्थान मानले जाते. येथे गुरू चंद्रासोबत महत्त्वाचा राजयोग बनवीत आहे. राशिस्वामी शुक्र पंचम स्थानात या राजयोगाचा प्रभाव अधिकच वाढतो. त्यामुळे सध्याचे ग्रहमान सर्व तऱ्हेने अनुकूल आहे. अशातच कुटुंबात काही चांगल्या घडामोडी, आनंददायी घटनाक्रम संभवतो. नोकरी-व्यवसायात आर्थिक आवक वाढेल. जुनी येणी लाभतील. युवकांना रोजगार लाभू शकेल. राशिस्वामी शुक्र युवा मंडळींना विवाहयोगासाठी अनुकूल असल्याने तत्संबंधी हालचालींना वेग यावा. काहींना घर, वाहनादि मालमत्ता खरेदीचे योग लाभू शकतात. कुटुंबात उत्साह राहील.
**शुभ दिनांक - १२, १४, १५, १८.**

## कार्यक्षेत्रातील वजन वाढेल

मिथुन

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्याच राशिस्थानातून सुरू होत आहे. येथे चंद्रासोबत गुरू असल्याने गजकेसरी हा अधिकार देणारा शुभ राजयोग साकारला आहे. शिवाय राशिस्वामी बुध पंचम या शुभ स्थानी लाभेश मंगळासोबत आहे. तो लाभ स्थानाला बळ प्रदान करीत असल्याने नोकरी-व्यवसायात आपला वरचष्मा निर्माण होऊ शकतो. आपले महत्त्व, प्रतिष्ठा वाढेल. अधिकारी वर्गाची मर्जी संपादन करता येईल. काही आर्थिक लाभही होऊ शकेल. आपल्या योजनांना महत्त्व दिले जाईल. कार्यक्षेत्रातील ही व्यग्रता वाढत असताना कुटुंबातही आपल्याकडून अपेक्षा वाढेल. त्यांच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. आर्थिक स्थिती उत्तम राहील.
**शुभ दिनांक - १२, १३, १५, १७.**

## खर्च सत्कारणी लागेल

कर्क

या आठवड्याच्या सुरुवातीला राशिस्वामी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील बाराव्या म्हणजेच व्यय स्थानातून सुरू होत आहे. हे खर्चाचे स्थान आहे. मात्र, गुरू व्ययात चंद्रासोबच असल्याने एक महत्त्वाचा राजयोग तेथे झालेला आहे. चंद्रामुळे खर्च वाढता राहणार हे निश्चित आहे. मात्र, गुरू-चंद्र गजकेसरी योगाच्या निमित्ताने तो सत्कारणी लागेल, याची खात्री बाळगा. पराक्रमातील रवी-शुक्र व सुख स्थानातील मंगळ-बुध शिक्षण, विवाहादी कामासाठी, एखाद्या मोठ्या खरेदीसाठी खर्च करावयास लावू शकतात. आपल्या धंदपूर्ती वा हौसेखातर आपण काही खरेदी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. पैशाची आवक उत्तम राहील. काहींना प्रवास योग संभवतात. कुटुंबात समाधान राहील.
**शुभ दिनांक - १५, १६, १७, १८.**

## प्रयत्न कमी पडू नयेत

सिंह

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील एकादश स्थानातून होत आहे. यालाच लाभ स्थान म्हणतात. तेथे गुरू चंद्रासोबत गजकेसरी नावाचा राजयोग करीत आहे. आपण घेत असलेल्या परिश्रमाला मिळणाऱ्या फळाचे हे स्थान आहे. हा राजयोग उत्तम संधी निर्माण करीत आहे. आपल्या राशीत केतू आहे. त्यामुळे उत्तम ग्रहस्थितीचा लाभ घेताना आपले प्रयत्न कमी पडू नयेत याची काळजी घ्या. आपल्या ज्ञानाचा पुरेपूर वापर होऊन उत्तम संधी लाभतील, याची हमी बाळगा. आपले कौशल्य वाढीस लागेल. एखादे प्रशिक्षण घेऊन आपल्या कार्याचा दर्जा वाढवता येईल. अधिकारी वर्गाची मर्जी संपादन करता येईल. सहकाऱ्यांमध्ये वजन वाढेल. कुटुंबाची मदत होईल.
**शुभ दिनांक - १२, १३, १५, १६.**

## सरकारी योजनांचा लाभ

कन्या

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील दशम स्थानातून सुरू होत आहे. हे कर्म व सामाजिक प्रतिष्ठेचे स्थान आहे. तेथे असलेला गुरू व गोचरीचा चंद्र यांचा गजकेसरी नावाचा राजयोग झाला आहे. अशातच आपला राशिस्वामी बुध हा मंगळासोबत धन स्थानात आहे. अतिशय शुभ व उत्तम संधी देणारे योग या सप्ताहात लाभले आहेत. सामाजिक प्रतिष्ठा, मानसन्मान, कार्यक्षेत्रात प्रगती, कुटुंबात महत्त्व वाढणे असे अनुभव या आठवड्यात येतील. चंद्र-गुरूचा योग सरकार-दरबारी कामी कामे वेगाने रेटण्यास उत्तम असल्याचे सुचवीत आहे. सरकारी योजनांचा लाभ घेता येईल. व्यवसायात वाढ करता येईल. कुटुंबात आनंद व उत्साहाचे वातावरण राहील. पाहुण्यांचे आगमन संभवते.
**शुभ दिनांक - १२, १३, १४, १७.**

## भाग्यवर्धक संधी लाभतील

तूळ

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील नवम स्थानातून सुरू होत आहे. यालाच भाग्य स्थान म्हणतात. हे प्रवास, तीर्थाटन व कुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळींचेही स्थान आहे. हे धार्मिक कार्याचेही स्थान आहे. तेथे गुरू चंद्रासोबत गजकेसरी नावाचा राजयोग करीत आहे. त्यामुळे हा आठवडा काही भाग्यवर्धक संधी निश्चितपणे देऊ शकतो. त्यासाठीची धडाडी व प्रेरणा आपल्या राशीत असलेले मंगळ व बुध देतील. राशिस्वामी शुक्र व्ययात आहे. त्यामुळे आपले प्रयत्न कमी पडू नयेत, याची काळजी घ्या. काम अर्ध्यातच सोडू नका. उमेद टिकवून ठेवली तर एक उत्तम काळ आपली वाट पाहात आहे. लवकरच त्याची चांगली फळे मिळतील.
**शुभ दिनांक - १२, १३, १५, १७.**

## किरकोळ शारीरिक कुरबूर

वृश्चिक

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण कुंडलीतील अष्टम स्थानातून सुरू होत आहे. शारीरिक, मानसिक त्रास, आरोग्याची हानी, वेदना व पीडा यांचे हे स्थान आहे. अशात आपला राशिस्वामी मंगळ बुधासोबत व्यय स्थानात असल्याने अष्टमाच्या पीडा छळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही ना काही शारीरिक त्रास, तब्येतीची कुरबूर, किरकोळ अस्वास्थ्य जाणवू शकते. येथे चंद्रासोबत गजकेसरी नावाचा राजयोग करीत असलेला गुरू हा धनेश असल्याने तो आपला आर्थिक डोलारा सांभाळेल. आर्थिक आवक वाढेल. काहींचे सामाजिक महत्त्व, प्रतिष्ठा वाढेल. नोकरी-व्यवसायात चांगले घटनाक्रम अनुभवाल. कुटुंबात मात्र जरा नाराजीचा सूर उमटू शकतो. रुसवे-फुगवे सांभाळावे लागतील.
**शुभ दिनांक - १४, १५, १६, १८.**

## युवांना उपयुक्त संधी

धनू

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील सप्तम स्थानातून सुरू होत आहे. सातवे स्थान हे जीवनातील जोडीदार व व्यवसायातील भागीदाराचे आहे. येथे चंद्रासोबत गुरू असून तो गजकेसरी नावाचा उत्तम राजयोग करीत आहे. हा राजयोग सप्तमातून झालेला असल्याने युवा मंडळींना जीवनातील जोडीदार लाभण्यासाठी अनुकूल काळ आहे, असे म्हणता येईल. विवाहाचा कारक शुक्र दशम स्थानात व विवाह स्थानाचा स्वामी लाभात आहे, हे शुभ सूचक आहे. या आठवड्यात तत्संबंधी हालचाली वाढू शकतात. काहींची प्रेमप्रकरणे आता विवाह बंधनात साकारली जाऊ शकतात. नोकरी-व्यवसायाच्या प्रयत्नातील युवकांना उपयुक्त संधी लाभाव्यात. आर्थिक स्थिती उत्तम राहील.
**शुभ दिनांक - १२, १३, १४, १७.**

## नोकरीत अनुकूल योग

मकर

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील सहाव्या स्थानातून सुरू होत आहे. हे आरोग्य व कर्मसंबंधी स्थान आहे. तेथे चंद्रासोबत असलेल्या गुरूचा गजकेसरी नामक राजयोग झाल्याने हे कर्म स्थान सक्रिय झाले असून विशेषतः नोकरीच्या शोधातील युवांसाठी अनुकूल योग देणारे ठरले आहे. अशात आपला राशिस्वामी बुध व मंगळाचे ही दशम कर्मस्थानात गूळपीठ जमले आहे. यामुळेही युवांच्या नोकरी-व्यवसायासाठी काही अनुकूल संधी निर्माण होणार आहेत. शिक्षणाला एखाद्या प्रशिक्षणाची जोड देऊन आपले ईप्सित गाठता येऊ शकेल. साहित्य, कला, संगीत या क्षेत्रात कार्यरत असलेल्यांसाठी हा आठवडा विशेष ठरावा. कलेचे कौतुक होईल. आर्थिक आवक समाधानकारक राहील.
**शुभ दिनांक - १२, १४, १६, १८.**

## भरीव कामगिरी संभव

कुंभ

या आठवड्याच्या सुरुवातीला आपला राशिस्वामी चंद्र कुंडलीतील पंचम या शुभ स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. हे शिक्षण, संतती व छंदाचे स्थान आहे. ते आधीच मुक्कामी असलेल्या गुरूचा गोचरीने चंद्रासोबत गजकेसरी हा श्रेष्ठ राज योग बनला आहे. विशेषतः शिक्षण क्षेत्रात कार्यरत मंडळींच्या हातून भरीव कामगिरी पार पाडली जाऊ शकेल. विद्यार्थी वर्गाला तसेच परीक्षेस बसलेल्या युवकांना हा काळ उत्तम व अपेक्षित लाभ देणारा राहील. काही युवा मंडळींना त्यांच्या जीवनाचा जोडीदार या आठवड्यात गवसू शकतो. कुटुंबासह प्रवासाच्या योजना आखल्या जाऊ शकतात. बरेच काळापासून करायची राहिलेली खरेदी आता होऊन आनंद देईल. राशिस्वामी शनी धन स्थानातून आवक वाढवेल.
**शुभ दिनांक - १२, १४, १५, १८.**

## विविध आनंदाचे क्षण

मीन

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीत चतुर्थ स्थानातून सुरू होत आहे. हे राहते घर, माता, वाहनादि सौख्याचे स्थान आहे. तेथे अगोदरच वास्तव्यास असलेल्या आपल्या राशिस्वामी गुरूसोबत गोचर चंद्राचा गजकेसरी नामक राजयोग बनला आहे. अशात व्ययेश व लाभेश शनी आपल्या राशीत आहे. त्याची शुक्रावर दृष्टी असल्यामुळे खरेदी, प्रवास, पाहुण्यांचे आगमन असे वेगवेगळे आनंदाचे क्षण देणारा हा सप्ताह आहे. या काळात युवांना जीवनाचा जोडीदार शोधता येईल. नोकरी-व्यवसायात काही बदल करू इच्छिणाऱ्यांना अपेक्षित संधी लाभाव्यात. वाहन किंवा घरासाठी काही मोठी खरेदी घडेल. प्रवास, पर्यटनाला जाण्यासंबंधीच्या योजना आखल्या जातील. कुटुंबात आनंद राहील.
**शुभ दिनांक - १२, १४, १६, १८.**

# गाथा पर्यावरणाची

मिलिंद बेंडाळे


**आपण नकळत दररोज हजारो मायक्रोप्लॅस्टिक कण गिळत आहोत. हा अदृश्य शत्रू मेंदूपर्यंत पोहोचला आहे. प्लॅस्टिकच्या कपमधून दिला जाणारा गरम चहा, प्लॅस्टिकच्या डब्यातून दिला जाणारा नाश्ता, इतर वेळी होणारा नॉन-स्टिक भांड्याचा वापर ही रोजची निरुपद्रवी वाटणारी प्रत्येक कृती एका नव्या गंभीर संकटाच्या जवळ घेऊन जात आहे. हे संकट आहे शरीरात हळूहळू विषारी थर साचवणाऱ्या मायक्रोप्लॅस्टिक्सचे.**

## पर्यावरणाला धक्का देताहेत मायक्रोप्लॅस्टिक्स

मायक्रोप्लॅस्टिकचे संकट आता प्रत्येकाच्या घरात पोहोचले आहे. हे संकट कसे आले, त्याचा इतिहास काय हे समजून घेतले पाहिजे. सिंथेटिक प्लॅस्टिकचा इतिहास १९ व्या शतकाच्या मध्यापासूनचा आहे. कोणत्याही शोधाप्रमाणे, विशिष्ट समस्येवर उपाय शोधण्याच्या उद्देशाने कृत्रिम प्लॅस्टिकची सुरुवात झाली. १९ व्या शतकात प्रामुख्याने कंगवा, बिलियर्ड बॉल, पियानो आणि इतर साहित्य बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कासवाच्या कवचाची आणि हस्तिदंताची उपलब्धता कमी होऊ लागली. युरोपमध्ये पियानो की, बिलियर्ड बॉल आणि कंगव्यांची मागणी वाढत होती, तर हस्तिदंत आणि कासवाच्या कवचाची उपलब्धता कमी होत होती. १८६२ मध्ये पहिले खरे कृत्रिम प्लॅस्टिक, पार्केसाईन तयार करण्याचे श्रेय अलेक्झांडर पार्केस यांना दिले जाते. ते लवकरच काही उत्पादनांसाठी कासवाच्या कवचाचा आणि हस्तिदंताचा स्वस्त पर्याय बनले. १९०७ मध्ये बेल्जियन रसायनशास्त्रज्ञ लिओ बेकेलँड यांनी बेकलाईट तयार केले, जे सर्व उद्देशांसाठी पहिले कृत्रिम प्लॅस्टिक होते. त्यानंतर 'बीएएसएफ, ड्यूपाँट, इम्पिरिअल केमिकल इंडस्ट्रिज आणि डाऊ केमिकल्ससारख्या प्रमुख अमेरिकन आणि ब्रिटन कंपन्यांनी संशोधन, उत्पादन विकास आणि विपणनात गुंतवणूक केल्याने विकासाला वेग आला. दुसऱ्या महायुद्धात पॅराशूटपासून रडार केबलिंग, वाहन आणि विमानाच्या चाकांपर्यंत सर्वत्र प्लॅस्टिकचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर प्लॅस्टिकचा नागरी वापर झपाट्याने वाढला. कपड्यांपासून अन्न पॅकेजिंगपर्यंत सर्वत्र नायलॉन, रेयॉन, पॉलिस्टिरीन, पेट आणि टेफ्लॉनचा वापर केला जात होता. प्लॅस्टिकचा वापर दशकांपासून वाढत होता आणि आता शास्त्रज्ञ, धोरणकर्ते आणि नागरिकांना हे अप्रिय सत्य लक्षात येत आहे की, प्लॅस्टिकला इतके उपयुक्त बनवणारे गुणधर्म प्रत्यक्षात पृथ्वीला प्रदूषित करत होते.

वस्तुतः प्लॅस्टिक पूर्णपणे नष्ट करता येत नाही. ते दशके किंवा शतके कुजत नाही, खराब होत नाही. अशा परिस्थितीत टाकून दिलेले प्लॅस्टिक जमिनीवर आणि महासागरांमध्ये जमा होते. त्यामुळे एक मोठी पर्यावरणीय आपत्ती निर्माण होते. टाकून दिलेल्या प्लॅस्टिकमुळे पृथ्वीला आणि मानवी जीविताला असलेला धोका आता चांगलाच स्थापित झाला आहे; परंतु अद्याप कोणताही समाधानकारक उपाय सापडलेला नाही. उपाय शोधण्याच्या प्रयत्नांना हवा तो पाठिंबा किंवा संसाधने मिळाली नाहीत. बायोकेमिस्ट्री आणि मायक्रोबायोलॉजीमध्ये संशोधनासाठी अनेक रंजक क्षेत्रे आहेत. प्लॅस्टिकचे सेवन करणारे आणि त्याचे छोट्या घटकांमध्ये विघटन करणारे बॅक्टेरिया वेळोवेळी नोंदविले गेले आहेत; परंतु त्यावर पुढे काम झाले नाही. 'फोटो ऑक्सिडेशन'सारख्या इतर पद्धती अद्याप व्यापकपणे अंमलात आणल्या गेलेल्या नाहीत. सरकारी धोरणे सामान्यतः प्लॅस्टिकचा वापर कमी करण्यावर लक्ष केंद्रित करतात; परंतु बहुतेक देशांमध्ये ती फारशी यशस्वी झालेली नाहीत. कारण कृत्रिम प्लॅस्टिकचे पर्याय सहज उपलब्ध नाहीत किंवा परवडणारे नाहीत. गेल्या दोन दशकांमध्ये सूक्ष्म आणि नॅनोप्लॅस्टिक्सच्या व्यापकतेबद्दल एक नवी चिंता निर्माण झाली आहे. प्लॅस्टिकचे विघटन होण्यास दशके लागतात आणि ते इतके लहान तुकड्यांमध्ये असते की, उघड्या डोळ्यांनी पाहणे कठीण असते. गेल्या दशकात संशोधकांना सूक्ष्म आणि नॅनोप्लॅस्टिक्स सर्वत्र आढळून आले. अगदी माती, महासागर, नद्या, जमिनीपासून समुद्रातील सजीव प्राण्यांमध्ये आणि मानवी अवयवांमध्ये. रक्तवाहिन्यांपासून श्वसनसंस्थेपर्यंत, यकृत आणि मेंदूपर्यंत त्याचा लीलया वावर आहे.

मानवासाठी सूक्ष्म आणि नॅनोप्लॅस्टिक्स किती धोकादायक आहे, यावर नुकतेच मंथन सुरू झाले आहे. सुरुवातीच्या अभ्यासात दीर्घकालीन जोखीम असल्याचे दिसून आले; परंतु जोखमींचे नेमके स्वरूप आणि व्याप्ती निश्चित होण्यास वेळ लागेल. यासंदर्भात असे काही पुरावे आहेत, जे शरीरात जळजळ निर्माण करू शकतात. एक गृहीतक असे आहे की, विविध अवयवांमधील नॅनोप्लॅस्टिक रसायनांमुळे कर्करोगासह विविध समस्या उद्भवू शकतात. इतर अभ्यासातून दिसून आले आहे की, रक्ताभिसरण प्रणालीतील सूक्ष्म आणि नॅनोप्लॅस्टिक्स हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी धोका वाढवू शकतात. सूक्ष्म आणि नॅनोप्लॅस्टिक्सचा संबंध रोग आणि आयुर्मानाशी असला, तरी हे दुवे स्थापित करण्यासाठी पुरेसे संशोधन झालेले नाही. हे दुवे स्थापित करण्यास बराच वेळ लागतो.



अलिकडच्या काळात मानवी शरीरावर वायू प्रदूषणाचे धोके आपल्याला समजले नव्हते. या क्षेत्रातील संशोधनासाठी लक्षणीय निधी आणि अभ्यास आवश्यक आहे. सागरी आणि नदीकाठच्या जिवांवर तसेच वनस्पती आणि प्राण्यांवर त्यांचा परिणाम याचाही पुढील अभ्यास आवश्यक आहे. दुर्दैवाने फार थोडे देश या मुद्याकडे लक्ष देत आहेत. मानवांवर मायक्रोप्लॅस्टिक्सच्या धोक्यांचा अभ्यास करण्यासाठी मोठा निधी मिळत नाही. सिलिकॉन व्हॅलीतील काही अब्जाधीश मायक्रोप्लॅस्टिक्स त्यांचे आयुर्मान कमी करू शकतात, ही बाब गांभीर्याने घेत नाहीत, तोपर्यंत या संशोधनाला मोठा निधी मिळेल, अशी शक्यता कमी आहे.


धोरणकर्त्यांचा विचार करता, या दीर्घकालीन धोक्याला तोंड देण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान आणि ग्लोबल वॉर्मिंगसारख्या महत्त्वाच्या समस्या आधीच आहेत, ज्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे; परंतु दुःखाची बाब अशी की, गोष्टी एका टोकापर्यंत पोहोचत नाहीत, तोपर्यंत कोणीही उपाय शोधू इच्छित नाही. मायक्रोप्लॅस्टिक आणि नॅनोप्लॅस्टिकचे हे अतिसूक्ष्म कण आपल्याला डोळ्यांनी दिसत नाहीत; पण ते सर्वत्र आहेत. पाणी, भाज्या, फळे, मीठ अगदी मुलांच्या दुधातही या प्लॅस्टिकचा अंश सापडला आहे. मायक्रोप्लॅस्टिक्स आपल्या जेवण बनवण्याच्या सवयींमधून, वापरात असलेल्या प्लॅस्टिकच्या वस्तूंमधून आणि पाण्याच्या अयोग्य साठवणुकीतून आपल्या शरीरात प्रवेश करतात. एका संशोधनात असे समोर आले आहे की, १९९० च्या तुलनेत २०१८ मध्ये माणसाने सेवन केलेल्या प्लॅस्टिकचे प्रमाण सहापटीने वाढले आहे. हे प्लॅस्टिक शेतीत पिकांच्या मुळांवाटे, जनावरांच्या खाद्यातून आणि प्रक्रिया केलेल्या अन्नातूनही आपल्यापर्यंत पोहोचते. अन जेवढे जास्त प्रक्रिया केलेले असेल, तेवढे त्यात प्लॅस्टिक मिसळण्याची शक्यता जास्त असते. कारण कारखान्यांमध्ये जलद आणि प्रभावी उत्पादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिकचा वापर केला जातो.

या भयानक वास्तवातून बाहेर पडण्यासाठी काही करता येऊ शकते का? नक्कीच! वॉशिंग्टन विद्यापीठातील बालरोग विभागाच्या प्राध्यापक शीला सत्यनारायण यांच्या मते घरात करण्याजोगे असे अनेक सोपे उपाय आहेत, जे आपण लगेचच अंमलात आणू शकतो. त्यामुळे आपल्याला आपल्या जीवनावर थोडे तरी नियंत्रण मिळाल्याचे समाधान मिळेल. पाणी हे मायक्रोप्लॅस्टिकच्या प्रवेशाचे एक मोठे साधन आहे. पाण्याच्या बाटलीचे झाकण प्रत्येक वेळी उघडताना आणि बंद करताना प्रति लिटर ५५३ मायक्रोप्लॅस्टिक कण तयार होतात. बाटलीबंद पाण्यात मायक्रोप्लॅस्टिकचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त असते, हे एका अभ्यासातून समोर आले आहे. नळाच्या पाण्यातही मायक्रोप्लॅस्टिक्स आढळतात. एका अभ्यासानुसार, ब्रिटनमधील नळाच्या पाण्याच्या १७७ नमुन्यांमध्ये प्लॅस्टिकचे कण आढळून आले. तथापि, नळाचे पाणी सुरक्षित असल्यास चांगल्या फिल्टरचा वापर करून मायक्रोप्लॅस्टिक्सचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत कमी करता येते; पण चहा बनवण्यासाठी प्लॅस्टिकयुक्त टी-बॅग वापरल्यास पाण्यातील प्लॅस्टिक कमी करण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरू शकतो, कारण त्यातून अब्जावधी सूक्ष्म कण बाहेर पडतात. अन्न प्लॅस्टिकच्या पॅकेजिंगमध्ये ठेवल्यास त्यात प्लॅस्टिक मिसळणारच. त्यातही प्लॅस्टिकच्या बाटलीतील पाणी किंवा डब्यात ठेवलेले पदार्थ जास्त असुरक्षित असतात. पॅकेज उघडतानाही मायक्रोप्लॅस्टिकचे कण तयार होतात. एका अभ्यासानुसार, फक्त पॅकेट उघडल्याने प्रति सेंटीमीटर २५० मायक्रोप्लॅस्टिकचे कण बाहेर पडतात.

वापरण्यात येणाऱ्या जुन्या प्लॅस्टिकच्या भांड्यांमधून अनेकदा जास्त प्लॅस्टिक कण बाहेर पडतात, हे मलेशियामधील एका संशोधनातून समोर आले आहे. जेवण बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूही मायक्रोप्लॅस्टिक्सचा स्रोत आहेत. चॉपिंग बोर्ड, प्लॅस्टिकचे चमचे आणि स्पॅच्युला यासारख्या वस्तूंमधून हे कण तयार होतात. चॉपिंग बोर्डवर भाजी चिरल्याने तयार झालेले प्लॅस्टिकचे कण भाज्यांमध्ये मिसळतात. नॉनस्टिक भांड्यांमधील कोटिंग खराब झाल्यानेही मायक्रोप्लॅस्टिकचे कण अन्नात जातात. मायक्रोप्लॅस्टिकचे हे संकट भीषण असले, तरी त्यावर 'नियंत्रण' मिळविणे नक्कीच शक्य आहे. पाणी गाळण्यासाठी उत्तम फिल्टरचा वापर करणे, प्लॅस्टिकऐवजी काचेची, स्टीलची किंवा मातीची भांडी वापरणे आणि प्रक्रिया केलेले अन्न टाळणे, हे साधे उपाय मोठे परिवर्तन घडवू शकतात.

*(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)*


# रविवारचे महाशब्दकोडे ५१७



*आडवे शब्द:-* 1) कलंक, 2) चढाओढ, 4) आकडेमोड, 6) सजग; जागरूक, 9) सूर्य; औषधाचा द्रवरूप सत्त्वांश, 10) संपूर्ण अर्थ स्पष्ट करणारा शब्दसमूह, 11) हुक्की; लाट; ऊर्मी, 13) संबंध, 15) एक मराठी धार्मिक पंथ, 16) चिडविण्यासाठी केलेला तोंडाचा चाळा, 17) अनेक ठिकाणांवरून एकत्र करण्याची क्रिया, 19) भित्रा, 21) तिरडी, 22) स्वजन किंवा सगेसोयरे ('आपले ×× समोर उभे पाहून अर्जुनाने युद्ध करण्यास नकार दिला'), 23) लंगडा, 24) डोईजड, 26) चकितपणा, 28) जलप्रपात, 30) निखालस; स्पष्ट, 34) एक पोशाख, 36) मोदक, करंजी इत्यादींचे आवरण, 37) मानाचे परिमाण, 40) टिळा, 41) सतेज, 43) हाडकुळा, 44) एक विदेशी भाषा, 46) एक नदी, 47) गहिरा, 48) एक प्रसिद्ध पतिव्रता, 50) पालनपोषण; संगोपन, 51) सरदार भगतसिंग यांच्यासाठी एक विशेषण, 52) सुंदर डोळे असणारी, 54) पराजित, 55) खोडकर; आचरट, 58) शंभर, 60) सर्वज्ञात, 63) विश्वास, 64) धान्यासाठी बांबूची कोठी, 65) किंमत; घाट; बाह्यस्वरूप, 66) साप; चतुष्पाद प्राणी, 70) एक वाद्य, 72) एक चापट समुद्री मासा, 73) थोर, 74) मेघ, 75) पद्य, 77) चिता, 78) पोक्त, 79) नम्रतेने ओणवा झालेला, 81) एका झाडापासून दुसरे झाड लावण्यासाठी पहिल्या झाडाची तोडलेली फांदी, 82) उपद्व्यापी, 84) एक मेवा, 85) गुर्मी, 87) ओठ, 89) शहाणा, 90) अस्वल; कंटाळा, 91) चिंतन, 93) जोरदार; पाणीदार, 95) उत्साह; आविर्भाव, 96) घोडेस्वार, 97) गैरहजेरीचा दिवस, 98) एक त्वचारोग, 99) डावा, 101) वक्रतुंड, 103) एक धर्मसंस्थापक, 104) चक्राकार, 106) संतती, 108) घागर, 109) वाढ, 110) अग्नीची मोठी ज्वाला; मोठा प्रवाह, 111) पीछेहाट, 112) त्राता, 113) रोख.

*उभे शब्द:-* 1) मृत्यू, 2) संभवनीय, 3) फार पातळ व मऊ, 4) कारण; निकड, 5) मोठे तळे, 6) पुराव्यासह, 7) हिंमत, 8) अनुनासिक, 9) देवाचे अन्य रूपाने पृथ्वीवर येणे, 10) त्राता, 12) वायू, 14) लाक्षणिक अर्थाने फुकटखाऊ, 17) सरकारजमा, 18) घराचे भग्नावशेष, 20) पोकळ जागा, 22) दुष्टावा, 23) पंढरपूरचे लघुरूप, 25) जू, 27) अकल्पित घटनांचा योग, 28) पृथ्वी, 29) धरित्री, 31) उठाठेव, 32) पर्वा, 33) नाटकाचा एक प्रकार ('व-हाड चालले लंडनला'), 35) रावण, 36) चबुतरा, 38) पुरुषोत्तम, 39) शिक्षा, 40) उभट भांडे, 41) जिंकलेला, 42) कळसूत्री लाकडी बाहुली, 45) नूतन, 47) उघड, 48) मलई, 49) मनुष्याचा नाश व्हायचा असला म्हणजे भलत्याच गोष्टी करण्याकडे त्याची प्रवृत्ती होते या अर्थाचा एक वाक्प्रचार, 52) हत्ती, 53) निश्चित, 56) आचरट, 57) उबळ, 59) गोणपाट, 60) सर्वत्र पाणीच पाणी, 61) मुद्दाम, 62) चंद्र, 63) एक लहान चपळ प्राणी, 65) जल, 67) स्त्री, 68) मुख, 69) विस्ताराने, 71) शक्तिमान, 72) अपमान, 75) हिंदीत उणा किंवा कमी, 76) शक्ती, 77) समजूत घालणे, 80) टुमणे, 83) एक संख्या, 84) श्रमिक, 86) गरजू, 88) गुलामगिरी, 92) नट्टापट्टा, 94) कण, 95) मर्यादाचे उल्लंघन, 97) सूर्यप्रकाश असताना पडणा-या पावसाचे एक गमतीदार विशेषण, 100) एक रास, 102) चंद्र, 105) पोटातले पोर, 107) गोळा; एकत्र, 109) झाड. *(उत्तर: पुढील अंकात)*

*मागील शब्दकोड्याचे उत्तर*



AMRITA BHASKAR NANDANWAR 9822568532, 8329510310

## कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)
swatimak@gmail.com

# मध्ययुगीन भारत : काळोख आणि पहाट



भारतातील मध्ययुगाला इतिहासातील काळोख पर्व म्हटले जाते. मध्यपूर्व काळही परकीय आक्रमणाच्या रक्तरंजित इतिहासातच दडलेला आहे. मोगल बादशहांच्या स्वाऱ्या, त्यांनी केलेल्या मंदिरांची नासधूस आणि लुटून नेलेली अमाप संपत्ती यामुळे भारताच्या सुवर्णपर्वावर मध्यपूर्व काळापासून काजळी धरली गेली आणि १८-१९ व्या शतकात ब्रिटिश साम्राज्य पर्वातच लोकमानसात जाज्वल्य राष्ट्रवाद उफाळून वर आला, असा समज दृढ होत गेला.

इतिहासाची पाने आपण बारकाईने वाचली तर लक्षात येते की, ब्रिटिश वसाहत पर्वातच फक्त जाज्वल्य राष्ट्रवाद निर्माण झाला, असे म्हणता येणार नाही. यापूर्वीही मध्यपूर्व काळापासून भारतीय राजांनी आणि जनतेने प्राणपणाने परकीय आक्रमणे रोखली. असंख्य भारतीय सैनिकांनी परकीय आक्रमण थोपविण्यासाठी आपले प्राण गमावले. प्राचीन काळापासूनच राष्ट्रवाद ही संकल्पना होती आणि मध्यपूर्व काळात राष्ट्रवादाच्या संकल्पनेला आकार मिळाला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भारतीय इतिहासावर आधारित कोणतेही पुस्तक उघडले तरी तत्कालीन इतिहासाची रक्तरंजित पाने परकीय आक्रमणांनी गजबजून गेलेली असतात. या पृष्ठभूमीवर आर. नाथ या इतिहासकाराने लिहिलेले 'मध्ययुगीन भारतीय इतिहास आणि वास्तुकला' हे पुस्तक वाचनात आले. त्यामुळे प्राचीन काळापासून भारतीयांच्या मनातला राष्ट्रवाद समजण्यास मदत झाली. राष्ट्रवाद या शब्दापेक्षा 'राष्ट्रभाव' हा शब्द जास्त योग्य आहे असे वाटते.

'राष्ट्रभाव' ही संकल्पना अतिशय प्राचीन काळापासून भारतीयांच्या मनात एका तेजस्वी आणि मनस्वी ज्योतीप्रमाणे तेवते आहे. 'हिमवत-सेतू-पर्यंतम्' (हिमालयापासून ते रामेश्वरपर्यंत) असे भारताचे वर्णन आपले पूर्वजही करायचे. भीष्मपर्वात वर्णन केल्याप्रमाणे भारत वर्षात विविध संवर्गांचे लोक गुण्यागोविंदाने राहायचे. 'आर्या म्लेच्छाश्य कौरव्य तैमिश्राः पुरुषा विभों' आपल्या इतिहासातील पानांमध्ये परकीय आक्रमणे, रक्तरंजित लढाया ही वर्णने येतात. जनसामान्यांच्या राष्ट्रभावाचे वर्णन मात्र क्वचितच आढळते. त्यामुळे भीष्मपर्वातील गुण्यागोविंदाने राहणाऱ्या जनसामान्यांचे वर्णन राष्ट्रभाव व्यक्त करणारे आहे आणि म्हणूनच महत्त्वाचे आहे. विष्णुपुराणामध्ये अतिशय तपशीलवार असे भारत वर्षाचे वर्णन केलेले आहे-

'पूर्वे किराता यस्यांन्ते पश्चिमे यमुनाः स्थिताः।'

यवन पश्चिमेकडे आणि किराट पूर्वेला राहतात, असे विष्णुपुराणात नमूद आहे. दक्षिण भारतातल्या नद्यांची नावे आणि कुरु, पांचाल, मध्यदेश, पूर्वदेश, पुंड्र, कलिंग, मगध, सौराष्ट्र, अभिर यासारखी भारत वर्षाने कवेत घेतलेली जनपदांचीदेखील विष्णुपुराणात रसाळ वर्णने आहेत.

देशाला नुसत्या सीमा असून उपयोग नसतो; येथे राहणारे सगळे आपले लोक आहेत, ही भावना मनाच्या तळाशी असावी लागते. राष्ट्राप्रति प्रेम असावे लागते. अभिमान असावा लागतो आणि ही भावना, हा राष्ट्राभिमान आपल्या पूर्वजांच्या ठायीदेखील होता.

'ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्या मध्ये शूद्राश्च भागशः ।
इज्यायुधवणिज्याद्यैर्वर्तयन्तो व्यवस्थिताः ॥'

या देशात सर्व वर्णांचे लोक एकत्र नांदतात. म्हणजे नुसत्या सीमारेषेने लोक एकत्र येत नाहीत तर धर्म आणि संस्कृतीने लोक एकत्र जोडले जातात, असे विष्णुपुराणात म्हटले आहे. प्राचीन काळात आणि मध्ययुगात भरपूर युद्धे झाली. रक्ताचे पाट वाहिले. परकीय आक्रमणे झाली. जनतेच्या मनात राष्ट्रभाव असल्यामुळे परकीय आक्रमणांना प्रत्युत्तर दिले गेले. चंद्रगुप्त एक (विक्रमादित्य) अतिशय बलाढ्य राजा होता आणि शकांचे आक्रमण थोपवण्यात यशस्वी होऊन त्याने 'आदि वराह' ही पदवी धारण केली. आदि वराह म्हणजे पृथ्वीला परकीय आक्रमणापासून वाचविणारा राजा. मध्य युरोप आणि रोमन साम्राज्य नेस्तनाबूत करणारे हूणदेखील पाचव्या आणि सहाव्या शतकात भारतावर संपूर्ण विजय मिळवू शकले नाहीत. कारण गुप्त राजवटीने अख्ख्या हिंदुस्थानात राष्ट्रभावाचे बीज पेरले होते. भारत म्हणजे फक्त सीमारेषा आखलेला प्रदेश नव्हे तर संपन्न संस्कृतीने उन्नत झालेला राष्ट्र आत्मा आहे, याची जाणीव गुप्त राजवटीने अख्ख्या जगाला करून दिली. आपल्या देशाला बारा ज्योतिर्लिंगांचा देश अशी एकसंध ओळख फक्त सीमारेषांमुळे मिळाली नाही तर संपन्न संस्कृतीमुळे आणि जनमानसाच्या एकत्रित राष्ट्रभावामुळे भारताला अशी समृद्ध ओळख मिळाली.

'सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्।
उज्जयिन्यां महाकालमोंकारं ममलेश्वरम्॥
परल्यां वैजनाथं च डाकियन्यां भीमशंकरम्।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावनेम्॥
वारणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमी तटे ।
हिमालये तु केदारं घ्रुष्णेशं च शिवालये ॥
एतानि ज्योतिर्लिंगानि सायं प्रातः पठेन्नरः।
सप्तजन्मकृतं पापं स्मरेण विनश्यति ॥'

या श्लोकाचा सारांश असा आहे की, जे कोणी ज्योतिर्लिंगांची पूजा करतात किंवा त्यांना स्मरतात त्यांची साता जन्माची पापे धुवून निघतात. केवळ राजकीय हेतूने नाही तर आपल्या धर्म आणि संस्कृतीने प्रेरित होऊन आपण आपल्या सीमारेषा आरक्षित केल्या आणि राष्ट्रभावाची मुहूर्तमेढ प्राचीन काळीच रोवली. शंकराचार्यांनीदेखील हिमालयात बद्रीनाथ, पूर्वेला पुरी, पश्चिमेकडे द्वारका, दक्षिणेकडे शृंगेरी अशा चारी दिशांना मठांची स्थापना करून धार्मिक अधिष्ठानाबरोबरच भारताची राजकीय स्वायत्तता अभंग ठेवली.

अरब साम्राज्याने संपूर्ण जगाला जिंकले, परंतु आपल्या देशाने मात्र तब्बल तीन शतके त्या परकीय सत्तेला रोखून ठेवले होते. सिंध प्रांतात त्यांनी पाय रोवले तरी ते सबंध भारत वर्षात राज्य करू शकले नाहीत. पुलिकेषन चालुक्याने इ. स. ७३८ मध्ये अरब गव्हर्नर तामीमचा नवसारी येथे पराभव केला होता. गुर्जर राजा नागभट्ट यांनी उज्जैन येथे अरबांच्या सैन्याला धूळ चाखली आणि आपल्या देशाला परकीय सत्तेपासून वाचवले होते. ग्वाल्हेरच्या चतुर्भज मंदिरावर त्याची प्रशस्ती लिहिली आहे.

'येनासौ सुकृतप्रमाधिवलवन म्लेच्छाधिपाक्षौहिणीः ।
थ्तुन्दानस्फुरदुग्रहेतिरुचिरैर्छौर्भिश्चतुर्भित्भौ ॥'

याच सुमारास उज्जैन येथे भारतातील राजांनी हिरण्यगर्भ यज्ञ केला आणि गुर्जरांना देशाचे संरक्षक प्रतिहार नेमले होते. इ. स. ८८३ मध्ये प्रतिहार मिहीरभोजाने अरबांचा दारुण पराभव केला होता. त्यानेही चंद्रगुप्त मौर्याप्रमाणेच 'आदिवराह' ही उपाधी लावून घेतली होती. 'आदिवराह' म्हणजेच परकीय आक्रमणापासून पृथ्वीचे रक्षण करणारा राज्यकर्ता असा त्याचा लौकिक झाला होता. इजिप्त, सीरिया, इराक, इराण आणि इतर देशांमध्ये अरब साम्राज्याने पाय रोवले असताना भारतातील राज्यकर्त्यांनी प्राणपणाने आपल्या मातृभूमीचे रक्षण केले. याबद्दल अतीव कृतज्ञता बाळगायला हवी.

सुबुक तिगीनला गजनीचे सिंहासन मिळाल्यावर उत्तर पश्चिमेकडील सीमारेषेवर पुन्हा घमासान सुरू झाले. इ. स. ९९१ ला राजा जयपालने सुबुक तिगीनच्या विरोधात अनेक राज्यांमधील सैन्यांना सामील होण्यास सांगितले. अजमेर आणि कनौजच्या राजांनी आपले सैन्य धाडले; दुर्दैवाने त्यांचा पराभव झाला. पेशावरही हातातून निसटले. भारतातील राजांनी पुन्हा एकदा इ. स.१००८ रोजी परकीय आक्रमणाविरुद्ध राष्ट्रीय युती केली. उज्जैन, ग्वाल्हेर, कनौज, कलिंग, दिल्ली, अजमेरसारखी बलाढ्य राज्ये या युतीत सामील झाली होती. मंदिरांच्या तोडफोडीविरुद्ध, स्त्रियांवरच्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध संपूर्ण देश एक झाला होता. महमूदला पेशावरमध्ये अडकवून ठेवण्यात आले. पण महमूद गजनीच्या सैन्याची तांत्रिक क्षमता श्रेष्ठ होती. त्यामुळे आनंदपालच्या नेतृत्वाखाली असलेल्या भारतीय सैन्याचा पराभव झाला.

पराभव झाला तरी यानिमित्ताने संपूर्ण भारत देश एकसंध झाला. अजमेर येथील सैन्य आणि ओडिशाचे कलिंग सैन्य एकाच ध्येयाने प्रेरित होऊन रणांगणावर लढत होते. भारतमातेचे रक्षण करण्यासाठी असंख्य सैनिकांनी आत्माहुती दिली. इतिहासाच्या जीर्ण पानांमध्ये आत्माहुती दिलेल्या सैनिकांची नावे दिसणारही नाहीत, पण त्या अनाम वीरांचे स्मरण करणे आजही आपले कर्तव्यच आहे. इ. स. १०२६ मध्ये सोमनाथावर आक्रमण करून महमूद गजनी परत जात होता. तेव्हा धरच्या राजा भोजने अतुलनीय धैर्य दाखवून महमूदचा पाडाव केला होता. महमूदला अखेरीस वाळवंटातून पळ काढावा लागला. त्याचे हजारो सैनिक पाण्याशिवाय तडफडत तिथेच मरण पावले. याच राजा भोजने समरांगण सूत्रधार, शृंगार प्रकाश तसेच मंदिरांच्या शिल्पशैलीवर भरपूर पुस्तके लिहिली. अनेक मंदिरेही त्याने बांधली.

यावरून असे दिसते की, जरी महमूदने १०-१५ मंदिरांची लूट केली असली, तोडफोड केली असली, तरी सश्रद्ध भारतीय मनावर त्याचे खोल परिणाम उमटले नाहीत. त्यांचा राष्ट्रभाव कायम राहिला. भक्तिभाव अखंड राहिला. वादळे आलीत आणि गेलीत. मंदिरे उद्ध्वस्त झाली असतीलही, पण पुन्हा नव्याने उभीही राहिलीत. भारतीय संस्कृती आणि राष्ट्रभाव एवढा खोल झिरपला होता की, महमूद गजनीचे वादळ हिंदुस्तानला तोडू शकले नाही. जनसामान्यांच्या मनातील राष्ट्रभाव कमी करू शकले नाही.

इ. स. १०२६ ते ११८६ ही दीडशे वर्षे इतिहास अबोल आहे. महमूद गजनी गेल्यानंतर आणि महमूद घोरी आल्यापर्यंत काय घडले असेल. जनसामान्यांनी आयुष्य कसे रेटले असेल, काय माहीत. तेव्हाही आक्रमणे तर झाली असतीलच; पण राष्ट्रभावाची ज्योत आक्रमणाच्या वादळाने थरथरली असेल का? कोणा अनाम वीराने स्वतःच्या ओंजळीत ती ज्योत धरली असेल, कोण जाणे. भारतीय इतिहास परकीयांच्या आक्रमणाने लिहिला गेला नाही. रक्तरंजित युद्धाने स्मरला गेला नाही. पण अतिप्राचीन काळापासून जनसामान्यांच्या मनात तेवणाऱ्या राष्ट्रभावाच्या उत्कट ज्योतीने राष्ट्राचा सबंध गाभाराच दशदिशांना तेजाळला आहे आणि तोच भारतीय इतिहास आहे.

## संस्कारांच्या देशा

डॉ. रमा गोळवलकर
९४२२११४६२०

### कृतज्ञता आणि सन्मान-४

# ज्येष्ठ आणि वृद्ध

उत्पत्ती, स्थिती आणि लय या सृष्टीच्या तीन अवस्था आहेत. त्यामुळे सगळ्या प्राणिमात्रांत नवजात, शिशु, युवा, प्रौढ आणि वृद्ध अशा अवस्था असलेली प्रजा असते. इथे प्रजा हा शब्द जाणीवपूर्वक वापरलेला आहे. मूळ धातू आहे 'ज' म्हणजे उत्पन्न होणे जन्म घेणे. त्याला 'प्र' म्हणजे पुढे हा उपसर्ग लागून शब्द सिद्ध झालेला आहे प्रजा अर्थात 'जो उत्पन्न झालेला आहे.' या प्रजेच्या परस्पर संबंधांची संरचना म्हणजेच हा समाज. यात पिढ्यांची उतरंड निश्चित असते. सर्वात नंतर जन्मलेलं अर्भक हे समाजाचं भविष्य असतं आणि ते घडवण्याचं दायित्व त्याहून वयानं मोठ्या असलेल्या लोकांकडे असतं. हा नियम सगळ्याच पाठीचा कणा असलेल्या आणि कळपात राहणाऱ्या प्राण्यांत कसोशीनं पाळण्यात येतो.

विविध प्रजाती आकारानं लहान-मोठी श्वापदं असोत की हत्तीसारखा भव्य प्राणी, प्रत्येकाच्या कळपाचे काही नियम असतात आणि त्यात लहानग्यांची काळजी मोठ्यांनी घ्यायची. त्यांना कळपाचे नियम आणि एकत्रित जीवन जगण्याची कला शिकवायची, हा शिरस्ता सगळ्यांच कळपांत पाळण्यात येतो. त्यामुळे शरीरानं सर्वात बलवान, वयानं मोठा आणि अनुभवानं समृद्ध असा कळपाचा एक मुख्य असतो. त्याच्या समूहाच्या हिताचे निर्णय घेणं, दुष्काळ वा दुर्भिक्ष्यासारख्या संकटकाळी सगळ्या सदस्यांचं संरक्षण करणं आणि सदस्यांना समूहाचे नियम पाळण्यास बाध्य करणं हे या मुख्याचं काम. त्याला इंग्रजीत 'अल्फा मेल' म्हणतात.

तर, हत्ती-सिंहासारख्या प्राण्यांच्या कळपांचं नेतृत्व त्यांच्यातली वयानं सर्वात मोठी आणि अनुभवी मादी करते. तसं पाहिलं तर मोठ्या प्राण्यांत मातृसत्ताच असते. वयात येणाऱ्या सगळ्या नरांना कळपातून बाहेर काढून, रक्ताच्या नात्यातून प्रजा उत्पन्न होऊ नये (इनब्रीडिंग) हे महत्त्वाचं काम या नेत्रींना करायचं असतं. एकूण त्यांच्या समूहाची अनुवंशिकता, शिस्त आणि एकसंधता व्यवस्थित राखण्यासाठी ही वृद्धा सतर्क असते. कळपावर तिचा दरारा असतो.

औद्योगिकीकरण आणि त्यातून उद्भवलेल्या भांडवलशाही, कम्युनिझम, सोशलिझम आणि नंतर आलेल्या तंत्रज्ञानाच्या युगात माणूस संसाधन म्हणजे रिसोर्स या एकाच भूमिकेत उरला. बुद्ध्यांक (इंटेलिजन्स कोशंट) आणि शारीरिक तंदुरुस्ती (फिजिकल फिटनेस) चा बोलबाला झाला. पाश्चिमात्यांच्या मानसशास्त्र नावाच्या खुळानं लैंगिकता, पौगंडावस्थेतली मानसिकता, जनरेशन गॅपच्या गप्पा मारायला सुरुवात केली.



भारताचे पंतप्रधान वयानं ज्येष्ठ असलेल्या भारताच्या राष्ट्रपतींना भारतीय पद्धतीनं वंदन करताना

पौगंडावस्था, हार्मोन्सचे चढ-उतार, त्यातून होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक बदल इत्यादींचा सतत प्रचार-प्रसार करून नव्या पिढीच्या समस्या या आवश्यकतेपेक्षा जास्तच मोठमोठ्या करून सांगितल्या जाऊ लागल्या. कम्युनिस्ट आणि समाजवादी लोकांनी व्यक्तिस्वातंत्र्याचे देव्हारे माजवले. जास्तीत जास्त लोकांनी आपल्याकडे आकर्षित व्हावं म्हणून सगळा आटापिटा सुरू झाला. जुन्या पिढीच्या कडक शिस्तीच्या कर्मठ पण काळजीवाहूपणामुळे नव्या पिढीची मुस्कटदाबी, घुसमट, गळचेपी होते. हे तीनही शब्द मराठी आणि इतर सर्वच भाषांत गेल्या दीड शतकातच वापरात येऊ लागले आहेत.



१०४ वर्षांच्या ज्येष्ठ महिलेला वंदन करून भारताच्या पंतप्रधानांनी भारतीय संस्कारांचं पालन केलं

समाजात प्रस्थापित विरुद्ध विस्थापित, गरीब विरुद्ध श्रीमंत, स्त्री विरुद्ध पुरुष, वृद्ध विरुद्ध तरुण अशी दरी असते. ती रुंदावत जाते. प्रस्थापितांचे जुनाट आचारविचार, श्रद्धा, रूढी, परंपरा सारं काही शोषण करण्यासाठीच तयार करण्यात आलेली यंत्रणा आहे, तिच्या विरुद्ध क्रांती करा आणि ती मोडून टाका. मार्क्स, लेनिन, स्टॅलिन, माओ-चे ग्वेरानव्या युगाच्या नव्या व्यवस्थेचे प्रवर्तक आहेत सारखे वैचारिक भिंगऱ्या- भिरभिरे- भोवरे जिथे तिथे भिरभिरू लागले.

यापूर्वी कधीही उद्भवले नव्हते असे नव्या पिढीचे प्रश्न भस्मासुर म्हणून समाजात उभे ठाकले. अभ्यासाच्या टेन्शनचा बाऊपासून कोणीतरी सतत माझ्यावर अन्याय करत आहे, शोषण होतंय ही साशंकता आणि अविश्वास यामुळे नव्या पिढीचं सगळं भावविश्वच झाकोळलेलं आहे. आपल्याकडे कितीही प्रगत तंत्रज्ञान असलं, तरी अनुभवातून येणाऱ्या ज्ञानाचा पूर्ण अभाव आहे, हे विसरून जात 'मी' आणि 'मी'चे सगळे विभक्ती प्रत्यय वापरत नसलेले प्रश्न उगाचच गोंजारत राहणारी नवी पिढी हे आजचं वास्तव आहे.

प्रौढ-वृद्ध पिढीकडे असलेल्या अनुभवांची गंगाजळी (भविष्यकाळात उद्भवणारे खर्च पूर्ण करण्यासाठी नफ्यातून बाजूला काढून ठेवलेला निधी) हा आपल्याला सहज उपलब्ध असलेला एक चांगला ज्ञानस्रोत आहे, या व्यावहारिकतेकडे पूर्ण दुर्लक्ष करून उन्मत्त होऊन धुमसणारी आणि क्रांतीच्या नावाखाली हिंसाचार करणारी 'जेन झी' ही समाजाची एक मोठी समस्याच आहे. घरातल्या वृद्ध व्यक्तीकडे दुर्लक्ष करणं, त्यांचा दुस्वास-अवहेलना करणं, त्यांच्यावर शारीरिक-मानसिक अत्याचार करणं, त्यांना वृद्धाश्रमात धाडणं हा आजच्या काळाचा शिरस्ताच झालेला आहे.

भारतीय संस्कार मात्र ज्येष्ठांचा, वृद्धांचा आदर आणि सन्मान करत सर्वांना संपादून घेत, परस्परांविषयी आत्मीयता आणि सौहार्द राखत नांदणाऱ्या शिस्तबद्ध कुटुंब व्यवस्थेला मानणारा आहे. आपल्याहून एका दिवसानंही मोठी असलेली व्यक्तीदेखील ज्येष्ठ म्हणून वंदनीय आहे. इतकंच काय, तर मोठी भ्रातृजाया (भावजय- भावाची बायको) आपल्याहून वयानं लहान असली, तरी तिला खाली वाकून नमस्कार करायची पूर्वापार चालत आलेली रीत आहे. आपल्याहून मोठ्या व्यक्तीचा योग्य तो मान ठेवण्याची, त्याच्या अनुभवांचा आदर करण्याची, त्यांच्या मार्गदर्शनात वाटचाल करत ध्येय गाठण्याची ही परंपरा रचनात्मक उत्क्रांतीच्या दिशेनं नेते.

मोठ्यांना नमस्कार कुठे, कधी आणि कसा करावा, याचेही नियम निश्चित आहेत. बाहेरगावाहून आल्यानंतर हात-पाय धुवून आधी घरातल्या देवांना आणि नंतरच घरातल्या सर्वांना त्यांच्या वयानुसार नमस्कार करावा. नमस्कार करताना स्थळ आणि अवस्थेचं भान असावं. जेवत असलेल्या, झोपलेल्या किंवा आडव्या अवस्थेतल्या ज्येष्ठ व्यक्तीला नमस्कार करू नये. कोणत्याही खोलीच्या दारात किंवा प्रवेशद्वारात, अंगणात, खुल्या आकाशाखाली आणि रस्त्यावर नमस्कार करू नये. त्या मागचं कारण स्पष्ट आहे- मृत व्यक्तीच्या आडव्या देहाला दारात, अंगणात आणि रस्त्यावर नमस्कार करतात. म्हणून जिवंत माणसांना तसा करू नये तसंच सोयर-सुतकातही नमस्कार करत नाहीत.

## काव्यनाद

### अस्तित्वाच्या खुणा

गाभाऱ्यातून स्रवतो आहे,
असा कृपाप्रसाद देखणा
की ठायी-ठायी दिसती आई,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा
सृष्टी ल्याली गर्भारकांती
अन् झाडे-पाने नव अंकुरती
वसंत ल्याली अवघी धरती,
गे नुरला आनंदोत्सव उणा
या ठायी-ठायी दिसती आई,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा
सकाळ झरते प्रभा फाकती,
दुपार चमके सोन लखाखती
संध्या गाते मग मधुवंती,
रात्र वाजवी आशेचा तुणतुणा
बघ ठायी-ठायी दिसती आई,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा
सौंदर्याने डोळे दीपती,
तशी सुखसोयींची रेलचेल किती
सोहळ्यांतली मोहक स्फूर्ती,
ऐश्वर्याचा साज होतसे दुणा
तिथे ठायी ठायी दिसती आई,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा
विचारातली व्यापक व्याप्ती,
तर्क देतसे समर्पक ज्ञाप्ती
भाव वाढवी समर्पित भक्ती,
चित्त वेधते अशी सुशांत नृणा
तेव्हा ठायी-ठायी दिसती आई,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा
संकटकाळी कुणी धावे मदती,
जगणे उजळण्या हात सोबती
एकांतीही कैक अनुभूती,
दया निराळी काय सांग सगुणा
अशा ठायी-ठायी दिसती आई,
तुझ्या अस्तित्वाच्या खुणा

**धनश्री धारकर**





### कथा-व्यथा शेतकऱ्यांची

वावरात माह्या हाय.
भला जात आड असा.
वर त्याच्या फिरे छान.
बारा माही हा रहाट ॥१॥
कसं शेंदलेल पानी
पाटापटातून साऱ्या
पिका वावरी सगऱ्या
जोजविते, फुलविते ॥२॥
सारं वावर हे कसं
वल, वल, वल, वल
पिकं कशी झुले-झुले
झर, झर, झर, झर ॥३॥
साठे सपान डोयात
उरे ना करज आता
घरवाली हरकन
पोरं-टोरं आनंदन ॥४॥
असा पाऊस जोमात
आड भरला दमात
पानी, पानी, पानी, पानी
आता साऱ्या वावरात ॥५॥
ओला दुष्काळ आला हा
पानी ठरेना डोयात
कसं करू? काय करू?
सारे गुंते कोरड्यात ॥६॥
गाय ढोर पार नेले
खाटकाचे खट् खटे
देव इंदराचा कोप.
म्हने हे परदूषन ॥७॥
आता ये, रे, बा! इठ्ला
दावं मारग हा कसा
जागी जागीच मरण.
अशा कशा भोगवाटा ॥८॥
सारा पाऊस पसारा
उभा व्यवहार ठका
साथ असा आसवाचा
नाही भाका तुकड्याचा ॥९॥
उभं पिक हे वाहिले
म्हने मिळे मुहावजा
काय करू या पैशाचे
भात भाकर मिळेना ॥१०॥

**रेखा भिवगडे**
नागपूर

### खुटा...

शेतीप्रधान हा । लई मोठा देश ।
पुरावा द्या ठोस । इतकुसा ॥
जा...हिंडा कुठंही । कुणालाही पुसा ।
जगे कसाबसा । शेतकरी ॥
कसला फायदा । घेतलं शिक्षण ।
रोगीन नि तण । काढण्यास ॥
तोंड सुखासाठी । धरणीची माया ।
आभाळाची छाया । आहे कुठे ॥
निसर्गही देतो । ऐनवेळी दगा ।
उजाडती बागा । स्वप्नांतल्या ॥
पुढाऱ्यांचा घडा । नेहमी गळका ।
वांझोटा पुळका । दाखविती ॥
भुक्कड योजना । राबे कशीबशी ।
पाण्यातल्या म्हशी । पाण्यातच ॥
शेतात घुसती । हरणं डुकरं ।
हातची भाकर । हिरावती ॥
चोरटी पाखरं । हुरड्यात येती ।
टुचुक टोचती । काळजाला ॥
वेळेवर खत । देतादेता पाणी ।
गेली जिंदगानी । कोमेजून ॥
लाव जीव किती । ओंजार गोंजार ।
करतो बेजार। देवमन्या ॥
कत्तलखाना रे । ही बाजारपेठ ।
बेभावाची नोट । मन कापे ॥
मातीत राबून । खानदान गेलं ।
आपलंही मेलं । जीणं तसं ॥
वाटे बोंबलावं । करावाच संप ।
एंड्रीनचे पंप । जाळुनिया ॥
शेतीचा हा धंदा । जिथं तिथं तोटा ।
खोलवर खुटा । ठोकलेला ॥

**अरुण तिकटे**
९६२३४००२४०



### अभ्यास

स्वतःचा असावा
स्वतःला अभ्यास
जगू नये निरर्थक
ठेवावा कशाचा तरी ध्यास
स्वतःच स्वतःसोबत
खेळावा रास
होऊ नये कधी
आळसाचा घास.
जीवन एक
संपणारा प्रवास
ध्येय ठेवून घ्यावा
एक एक श्वास.


**आशिष देव**
९४२२१३७५१९

### गवसणी घालतो...

हलक्या हलक्या
शब्दांची पेरणी करतो.
सहज समजेल अशी
मी गाणी लिहतो.
दगडावरच्या शेंदुराला
मी माथी लावतो
सहज मनात उतरेल
अशी भजनवाणी गातो.
चित्त घरी असुदे तुझे
घोर जिवाला का लावतो.
मन:शांती जिथे मिळते तिथं
आकाशाला गवसणी घालतो.

**सुधाकर मानवतकर**
७२७६९७५१४३





### लागली मला साठी

लागली मला साठी
होणार वाटाघाटी
पण जगायचं आहे मला
तुमच्या मुळे
आणि तुमच्याच साठी
नको मला ती काठी
नको मला ती कवटी
पण राहा तू माझ्या पाठी
कारण जगायचं आहे मला
पुढच्या पिढीसाठी
पहायचं आहे नातवांना
खाताना चुना-माती
शिकवायच देव-धर्म
त्यांच्या पवित्र मनासाठी
लावून दिवे-वाती
माझे देवदर्शन झाले
हौस मित्र पण निरनिराळे
जगभर फिरून पाहिले
पण सुख-शांती नाही मिळाले
तुमच्या शिवाय जीवनात एकटेपण वाटले
आता वाढू द्या भेटी-गाठी
आपसात नाती-गोती
कारण नाते आहेत मोती
लहान असो की मोठी
हो! नाते आहेत मोती
लहान असो की मोठी

**विजय हरदास**
९४०४८६३६१५

### जेव्हा आई बाप होते

पतीचे दुःख विसरून
जेव्हा आई बाप होते
मुलांच्या अपेक्षा बाळगून
परिस्थितीला सामोरे जाते...

जेव्हा आई बाप होते
तेव्हा हो तिचे आयुष्य
जणू सर्कशीतला विदुषक
हसवून मुलांना करते भाष्य...

जेव्हा आई बाप होते
सदैव ती दुःखी असतेच
हृदयाच्या एका कप्प्यात
आपलं मन सांभाळतेच..

जेव्हा आई बाप होते
मन मात्र निर्मळ ठेवते
उत्कटतेची किंमत न बघता
जिद्दीने मुलांचे भविष्य घडविते...

पतीशिवाय संसार करताना
सुदृढ मानसिकता जपते
प्रेममय वातावरणात ती
सप्तरंगी इंद्रधनुष्य बघते...

**शैला चिमड्यालवार**
९४०५१५९३४०

तरुण भारत // आसमंत
www.tarunbharat.net

## लोकायन

सुधीर पाठक
८८८८३९७७२७

# 'बंगाल फाईल्स' एक दारुण अनुभव

विवेक रंजन अग्निहोत्री व पल्लवी जोशी यांचा 'बंगाल फाईल' हा चित्रपट बघणे हा एक दारुण अनुभव आहे, भयानक अनुभव आहे. या अनुभवात क्रौर्य आहे, विलक्षण भीषणता आहे. म्हणून इतिहासाकडे डोळे बंद करून कधीच बघता येत नाही. जे भीषण क्रौर्य अनुभवले ते पुढील पिढीच्या वाटेला येऊ नये म्हणून विद्यमान पिढीलाच इतिहासाचा आठव करावा लागतो. सामान्यतः फाळणीचा इतिहास म्हटलं की, पश्चिम भारत, पंजाब, कराची, लाहोर येथील भीषण आठवणी स्मरतात. स्पर्धा तुलनेने त्या भागावर आणि फाळणीच्या घटकावर बरेच लिहिले गेले आहे, चित्रांकितही केले आहे. भीष्म सहानी यांची 'तमस' कादंबरी व त्यावर आधारित 'तमस' ही सिरीयल अनेकांना आठवत असेल. दूरदर्शनवर ही मालिका दीर्घकाळ सुरू होती. खूप लेखकांनी फाळणीचा भीषण अनुभव स्वतः घेऊन तो आपल्या लिखाणातून नवीन पिढीला संक्रमितही केला आहे. 'बुनियाद' ही मालिकाही लोकप्रिय ठरली होती. 'होलो कास्ट ऑफ पार्टिशन, ट्रजिक स्टोरी ऑफ पार्टिशन' किंवा अगदी अलिकडचे प्रशांत पोळ यांचे 'ते पंधरा दिवस.' या सर्वांतून पाकिस्तान निर्मितीनंतर पंजाबमधील फाळणी कळते आणि त्या फाळणीनंतर त्या वेदना कळतात. पण फाळणी झालीच का? त्याला काँग्रेसची संमती मिळविण्यासाठी मुस्लिम लीगने काय षडयंत्र केले? याबाबत फारसे लिहिले गेले नाही.

खूप वर्षांपूर्वी ख्यातनाम गांधी विचारवंत, कवी या. मु. पाठक यांनी बंगालची फाळणी गृहीत धरून शशी मोहन नावाचे खंड काव्य रचले होते. प्राचार्य पाठक हे नागपूरच्या डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. काँग्रेस पक्ष फाळणी स्वीकारत नाही व गांधीजी म्हणतात, माझ्या मृतदेहानंतर मगच फाळणीचा विचार होऊ शकतो. त्यावर उपाय काय करायचा हा मुस्लिम लीगसमोर प्रश्न होता; आणि म्हणून जिना यांनी डायरेक्ट ॲक्शन करण्याचे ठरविले. जोवर हिंदू समाजावर हल्ले होत नाही, त्यांच्या मालमत्तेचे नुकसान होत नाही, त्यांच्या मानबिंदूवर आघात होत नाही, हिंदू महिलांवर अत्याचाराचे भीषण रूप जगाला दिसत नाही, तोवर फाळणीला काँग्रेसची मान्यता मिळत नाही. हे ठरवूनच 'डायरेक्ट ॲक्शन डे'चा चरचरणारा चटका बंगाल प्रांताला देण्यात आला. बंगाल प्रांतात मुस्लिम लीग सत्तेवर आला होता. सुर्हावर्दी हे बंगालचे पंतप्रधान झाले. जिना आणि सुर्हावर्दी या दोघांनी १६ ऑगस्ट १९४६ हा दिवस डायरेक्ट ॲक्शनचा दिवस ठरविला. त्या काळात कलकत्त्यामध्ये २४ पोलिस ठाणी होती; त्यापैकी २२ ठाण्यांचे प्रमुख मुस्लिम नेमले गेले. दोन जी ठाणी उरली होती, त्यात अँग्लो इंडियन फौजदार होते. एकाही पोलिस स्टेशनला हिंदू फौजदार नव्हता व शिपाई नव्हते. सर्व पोलिसांना, पोलिस दलाला सक्त ताकीद होती की, कुणाच्याही तक्रारी आल्या तरी मुसलमानविरुद्ध कुठलीही कारवाई करायची नाही. सर्व शाळा, कचेरी, कार्यालय यांना सुट्टी घोषित करण्यात आली. तो रमजान महिन्यातील पवित्र दिवस होता. शस्त्रास्त्रे, दगड, तलवारी, बंदुका, पेटविण्यासाठी रॉकेल, पेट्रोल हे आक्रमणासाठीचे साहित्य मोठ्या प्रमाणात साठविण्यात आले होते.

१६ ऑगस्टला नमाजाच्या निमित्त मोठ्या प्रमाणात मुसलमान एकत्रित आले. नमाज आटोपताच झालेल्या प्रक्षोभक भाषणांनी क्षुब्ध होत हिंदूंच्या घरादारावर हल्ले सुरू केलेत. खूप मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली, जीवितहानी झाली, अनेक लोक बेघर झालेत. हिंदू महिलांवर जबर शारीरिक अत्याचार, विनयभंग, बलात्कार आदी प्रकार करण्यात आले. मुस्लिम जमावाचे हे थैमान तब्बल दोन दिवस सुरू होते. रात्र झाल्यावरही त्याला खंड पडला नव्हता; उलट रात्री अधिक चेव येत होता. स्वतः पंतप्रधान सुर्हावर्दी हे नियंत्रण कक्षात बसून सूचना देत होते. हिंदूंच्या मदतीला कोणीही जाणार नाही. मदत मागणारा हिंदू समाजातील कितीही मोठा माणूस असला, तरीही त्याला मदत मिळत नव्हती. कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बॅनर्जी यांनी याचा दाहक अनुभव घेतला. १६ आणि १७ या दोन दिवसात कलकत्ता शहरांमध्ये ४० हजार हिंदूंचे शिरकाण झाले. सुर्हावर्दीची नोंद इतिहासात 'बुचर ऑफ बेंगॉल' अशी झाली. 'कलकत्ता किलिंग' अशीही या घटनेची नोंद झाली. हावडा, हुबळी मेरी बुर्ज, २४ परगणा येथून मुस्लिमांचे शस्त्रसज्ज मोर्चे निघून शहीद मिनारला पोहोचत होते.

सुरुवातीला असलेली उपस्थिती २०००, ५००० करीत संख्या ३०,००० करत लाखांवर पोचली होती. नंतरच जमावाने हिंसाचार सुरू केला. घराघरात शिरून पुरुषांना बाहेर काढून मारणे. त्यांचा जीव घेणे, रस्तोरस्ती स्त्रियांची अब्रू लुटणे असे प्रकार सुरू झाले. या महिलांचे वय वगैरेही न बघता अब्रू लुटणे, लैंगिक अत्याचार होत होते. अत्यंत हीन, घृणास्पद वर्तन सुरू झाले होते. कागदोपत्री कलकत्ता येथे संचारबंदी लागू झाली होती, पण या संचारबंदीची अंमलबजावणी करायला कुठलीही यंत्रणा नव्हती. त्यामुळे कलकत्ता येथे रात्रभर धर्मांधांचा नंगानाच सुरू होता.

बंगालचे गव्हर्नर फ्रेडरिक बरोज यांनी लष्कराला पाचारण केले, पण याची खातरजमा करून की, अत्याचारी मंडळांची अत्याचार करण्याची ऊर्मी संपत आली आहे. हे बघूनच १८ तारखेला दुपारनंतर लष्कर कलकत्ता येथे दाखल झाले. सय्यद अब्दुल फारुकी व एलिया द मिस्त्री या धर्मवेड्या मुसलमानांनी केशोराम कॉटन मिल परिसरावर हल्ला केला. या कॉटन मिल परिसरात मोठ्या प्रमाणावर ओडिसी कर्मचारी राहत होते. त्यांच्या वस्तीतील चारच जण कसेबसे वाचू शकले.

हिंदू समाजातील उच्चभ्रू परिवारावर तर ठरवून हल्ले होत होते. त्यांना बाहेर जाण्यासाठी गाडीला पेट्रोल मिळणार नाही, याचीही दक्षता घेतली होती. घरात घरकाम करणारी नोकर मंडळी होती. त्यांनीही मालकांच्या घरातील मुली, महिलांची अब्रू घेतली. हा सर्व आघात इतका अनपेक्षित व धक्कादायक होता की, त्यातून सावरणेही हिंदू समाजाला कठीण झाले. या आघातातून हिंदू उभे राहिले आणि प्रतिकार करणे सुरू केले तेव्हा पाकिस्तान निर्मितीची ही प्रयोगशाळा थांबली.

'बंगाल फाईल' चित्रपटात सांगितले आहे की, गोपाळ मुखोपाध्याय-पाठा हा मांस विक्री करणारा हिंदू खाटीक उभा झाला. त्याने संघटित हिंदू शक्ती बलशाली केली आणि आक्रमकांना धडा शिकविला.

पु. भा. भावे हे एकमेव असे मराठी साहित्यिक होते, ज्यांनी या घटनेचे गांभीर्य जाणले. या मुस्लिम आक्रमणाने वाताहत झालेल्या हिंदू समाजाच्या वेदना त्यांनी शब्दबद्ध केल्यात. त्यांनी अप्रतिम मराठी कथा या कलकत्तेच्या घटनेवर आणि पुढील नौखाली येथील अत्याचारावर लिहिल्या. 'घायाळ' या नावाने त्यांचा कथासंग्रहही त्यावेळी निघाला होता. त्याच नावाचे नाटकही त्यांनी मराठी नाट्यसृष्टीला दिले होते. 'घायाळ' हे नाटक व कथासंग्रहातील कथा अंगावर काटा आणणाऱ्या, मनाचा थरकाप उडविणाऱ्या आणि मुर्दाड मनालाही तेजाची ऊर्मी व्हावी यावी, अशा आहेत. या 'घायाळ' कथासंग्रहाचे पुनः प्रकाशन नागपूरच्या लाखे प्रकाशन यांनी केलेले आहे. या कथासंग्रहात एकूण ११ कथा आहेत. या हल्ल्यामुळे बेभान शरणार्थी म्हणून जगणाऱ्या हिंदू जनमानसाच्या भावविश्वाचे दर्शन त्यात होते. मुस्लिम अत्याचाराला बळी पडलेल्या युवतींच्या, काही सुनांच्या कथाही यात आहेत. या कथांमध्ये वातावरण वाचताना आजही अंगावर काटा येतो. ते दुःख, त्या वेदना त्या महिलांनी कसे पचविले असेल, हे उमजत नाही. विशेषतः यातील 'हिमानी' ही कथा तर हृदय पिळवटून टाकते. हिमानी १२-१३ वर्षांची असताना या अत्याचाराची बळी ठरते. पुढे कठोर जीवन जगायला वाचते आणि आपले जीवन जगू लागते. मृत्यूही सौम्य व प्रेमळ वाटावा असे जीवन ती जगते; पण प्रेम, ममता, करुणा या सर्व भावना तिच्यासाठी जळून खाक झालेल्या असतात. काही वर्षांनी एक युवक तिच्यावर प्रेम करू लागतो. तिला विनंती करतो की, माझ्याशी लग्न कर. पण तिचा होकार येत नाही. त्याला हे जाणवत असतं की, हिमानी आता आपल्यामध्ये गुंतू लागली आहे. हा मराठी युवक तिला नऊवारी पातळ भेट देतो. या नऊवारी पातळात तुला बघायचे आहे, अशी भावना व्यक्त करतो. हिमानी त्याप्रमाणे वस्त्र बदलते आणि एका क्षणी तिचे स्वतःवरील नियंत्रण सुटते. जुने भावविश्व तिला पूर्ण घेरून उरते. ती प्रक्षोभित होऊन ओरडते. वात झालेल्या उन्मादी माणसाप्रमाणे ती वर्तन करते. आपला पदर फेडते, चोळी फाडते आणि आपली वक्षस्थळे त्याला दाखवते. ती म्हणते, 'बघ हे आहे कारण, लग्न न करण्याचे!' हिमानीच्या वक्षस्थळावरती जागोजागी छापलेले आणि ठप्पे मारलेले असतात. ती अक्षरे होती 'हा आमचा माल आहे. ही आमची दासी आहे. ही वापरलेली वस्तू आहे.' हिमानी फाटलेल्या स्वरात बोलत राहते... 'हे सर्व डाग त्यांनी मला ढाक्यात दिलेले आहेत. त्यांनी मारलेले हे शिक्के आहेत आणि हेच आहे मी लग्न न करण्याचे कारण.' कालौघात आपला देश या सर्व डागण्या विसरला, मनुष्य जात हा कलंक विसरली; पण हिमानी हे सर्व कसे विसरणार?

पु. भा. भावे यांच्याच 'रक्त आणि अश्रू' पुस्तकात बंगाल, करपलेले कुसुम हा चेतविणारा लेख आहे. भावे त्यात लिहितात- कुसुम तुझी आणि तुझ्या मातेची वेदनेची यात्रा जन्मोजन्मी संपूर्ण होणार नाही. तुमचे अश्रू कधीही सुकू नयेत. तुमचे रडणे जन्मभर थांबू नये. बंगालमधून बंगाली हिंदूंना निःशेष करू पाहणारा जातीय निर्णयाचा समंध पेटला आहे. बंगालच्या फाळणीच्या वेळी आकाशपाताळ एक करणाऱ्या बंगाली हिंदू मने मारून टाकली गेलीत. मुस्लिम महत्त्वाकांक्षेच्या पायात हिंदूंच्या नंदिनी चिणून मारण्यात आल्या. खेरीज पाकिस्तानचा इमला उभारला जाणार नाही. एवढ्याच साठी तुझा बळी घेण्यात आला. त्यातून 'रड, पोटभर रड' असा सल्ला देऊन पु. भा. भावे पुढे चक्क बंगालच्या कुलदेवतेला आव्हान करतात, 'बंगालच्या कुलदेवते, ऊठ तुझ्या कन्या का विपत्तीत आहे. बंगालच्या रक्षक देवते, ऊठ! तुझी बाळं संकटात आहे. बंगालच्या वास्तुदेवते ऊठ, तुझे पीठ अपवित्र होत आहे. महिषासुरमर्दिनी, तुझ्याशिवाय कुसुमला कोण त्राता आहे? तुझ्याखेरीज तिचे दुःख कोण जाणणार? कोण तिला अभय देणार? तुझ्या तेजाच्या अंशाने प्रत्येक स्त्री तळपू दे. म्हणजे करपून गेलेल्या कुसुमवर नवीन टवटवी चढेल.

जिना आणि सुर्हावर्दी यांचा कलकत्त्याचा हा प्रयोग १०० टक्के यशस्वी ठरला नाही. कारण कलकत्त्यामध्ये हिंदूंची संख्या मोठी होती; शिवाय गोपाल मुखर्जी-पाठा त्यांची फौज घेऊन मध्ये उभा ठाकला होता. त्यामुळे एवढे रणकंदन, अन्याय व अत्याचार होऊनही काँग्रेस पक्ष फाळणीला सज्ज झाला नाही. फक्त महात्माजी कलकत्त्याला आलेत आणि सुरावर्दी सोबत एकाच भवनात राहिलेत. हिंदू मना शांत राहा. उत्तेजित होऊ नका. कायदा हातात घेऊ नका. हिंसाचार करू नका, असे आवाहन करते झाले. हिंदूंना शस्त्र समर्पित करायला सांगितले. गोपाल पाठाने त्याला साफ नकार दिला. त्यामुळे 'डायरेक्ट ॲक्शन'चा दुसरा प्रयोग हा नौखालीला करण्यात आला. नौखाली आता बंगलादेशात गेलेले आहे. तिन्ही बाजूंनी पाण्याने वेढलेले ते गाव आहे. तिथे मुसलमानांची लोकसंख्या ८० टक्के होती तर हिंदू २० टक्के होते. त्यामुळेच 'डायरेक्ट ॲक्शन'च्या पुढच्या प्रयोगासाठी या गावाची निवड करण्यात आली. मुहूर्त ठरला तो कोजागरी पौर्णिमेचा. त्या दिवसाला बंगाल प्रांतात आपल्या महालक्ष्मीसारखा सण असतो. नटून-थटून महिला त्या दिवशी पुजेसाठी निघतात.

पुन्हा कलकत्त्याला जे झाले होते त्याचीच पुनरावृत्ती नौखालीला झाली. हिंदू महिला, मुलीबाळींवरील अत्याचाराने उच्चांक गाठला गेला. जे बाटले, मुसलमान झाले ते पुरुष फक्त वाचले. हा १६ ऑक्टोबर ४६ चा दणका इतका जबर होता की, काँग्रेसलाही फाळणीला मान्यता द्यावी लागली. पण कलकत्ता आणि नौखालीतून आपण काहीही शिकलो नाही, हे प्रत्यक्ष फाळणीच्या वेळी दिसले. या अतिशय दाहक वास्तवाची आठवण होण्याला कारण ठरला तो 'बंगाल फाईल' हा चित्रपट.

या चित्रपटाचे निर्माते विवेक रंजन अग्निहोत्री हे एकदा संघ संपादकांच्या बैठकीला नागपूरला आले होते. त्यांचा 'बुद्धा इन ट्रॅफिक जाम' खूप गाजत होता. तेव्हाच त्यांनी बोलताना सांगितले की, सिनेसृष्टीवर डाव्यांचा पगडा आहे. विकृत इतिहास जनतेसमोर ठेवून ते त्यांना भ्रमित करतात. आम्ही दोघांनीही आता राष्ट्रवादी, देशभक्तिपूर्ण आणि सामान्यजनांना अज्ञात असणारा इतिहास जगासमोर आणणारे चित्रपट काढण्याचे ठरविले आहे. त्यानंतरच 'ताश्कंद फाईल्स', 'काश्मीर फाईल्स' असे चित्रपट निघाले. त्याच चित्रपटांच्या मालिकेतील ज्याला आजच्या भाषेत 'ट्रायलॉजी' म्हणतात त्यातला हा तिसरा चित्रपट. अजूनही अल्पसंख्यक अनुनयाची भूमिका टाकली गेलेली नाही, हे सांगण्यासाठी त्यांनी या चित्रपटाचा प्रारंभ गीता मंडल ही पत्रकार बेपत्ता होण्यापासून केला आहे. मुजफ्फराबाद येथील दडपशाहीचा तपास करण्यासाठी सीबीआयने शिवा पंडित या धाडसी अधिकाऱ्याला नेमले. बंगालमधील सरदार हुसेनी हा सत्ताधारी आमदार पोलिस यंत्रणा, न्यायव्यवस्था, प्रशासन यावर वचक ठेवीत स्वतःचे साम्राज्य निर्माण करतो. या साम्राज्याविरुद्ध उभ्या राहणाऱ्या गीताचे अपहरण होते आणि नंतर त्याच तपास अधिकाऱ्यांसमोर तिला गोळ्या घालून ठार केले जाते. त्याचा एफआयआरदेखील नोंदविण्याची हिंमत त्याला दाखविता येत नाही; उलट त्याने सरदार हुसेनीची माफी मागावी यासाठी वरिष्ठ अधिकारी त्याला बाध्य करतात. संघटित धर्मवेड्या जमावाच्या भीतीपोटी प्रशासकीय यंत्रणा कशी हतबल होते, याचा आजच्या काळातील अनुभव या चित्रपटात अधोरेखित करण्यात आला आहे.

हा चित्रपट पडद्यावर बघणे हा खूपच हिमतीचा भाग आहे. क्रोधाने पेटून उठणाऱ्यांसाठी हा चित्रपट आहे. मुळूमुळू रडणाऱ्यांसाठी अजिबात नाही. अतिरेकी हिंसा व अतिरेकी अहिंसा या दोन टोकाच्या संघर्षाची परिणीती पाकिस्तान निर्मिती झाली. त्यासाठी मुस्लिम लीगला 'डायरेक्ट ॲक्शन'चा प्रयोग करावा लागला, ही वस्तुस्थिती आहे. वास्तव लक्षात आल्यावर हिंदू समाजानेही हल्ल्याला जबरदस्त उत्तर दिले. गोपालचंद्र मुखोपाध्याय-पाठा हे त्याविरुद्ध उभे राहिलेले मुख्य पात्र. त्याच्या पुढाकाराने हिंदू समाज उभा राहतो. जातिभेदाच्या भिंती बाजूला सारल्या जातात. पुन्हा सर्वजण एकत्र येतात आणि आक्रमकांना धडा शिकवतात.

हा सगळा इतिहास फार दाहक आहे. काहीही हातचे राखून न ठेवता सर्व भीषण वास्तव चित्रबद्ध करण्यात आले आहे. तब्बल सव्वातीन तासांच्या चित्रपटातील अधिकांश भाग हा हिंसाचाराने भरलेला आहे. खाटिकखान्यात महिलांची शरीरे लटकवून ठेवली जातात, हे घडले असले, तरी टाळले असते तर चित्रपटाला उणेपण आला नसते. आपण इतिहासाकडे डोळे बंद करून पाहू शकत नाही, हे खरेच आहे. हिंदू महासभेचे नेते चौधरी त्यांनी हिंदूंनी प्रतिकार करावा म्हणून हिंदू समाजाला सिद्ध करण्याचा प्रयास केला त्यामुळेच मुस्लिम जमावाकडून त्यांची झालेली अत्यंत निर्घृण हत्या, रस्तोरस्ती पडलेले प्रेतांचे खच या घटना बघताना संवेदनशील मन विचलित होऊ शकते. त्याचवेळी हिंदू समाज असाच यापेक्षाही भयानक दारुण अनुभवाला सामोरा गेला होता, हे विसरून चालणार नाही. या चित्रपटात पल्लवी जोशी यांनी भारती बॅनर्जी ही भूमिका खूपच प्रभावीपणे साकारली आहे. वृद्ध भारतीला जुना काळ आठवत राहतो. 'घायाळ'मधील हिमानीप्रमाणे भारती ही आपल्या हातावर 'आयेशा जहां' हे नाव कोरलेले असल्याचे कधीच विसरू शकत नाही. आपल्या या नवीन नामांतराच्या जिवंतपणे मरण यातना सहन करत ती जगत असते. भारतीचे चरित्र चित्रण खूपच छान झाले आहे तसेच मिथुन चक्रवर्ती यांनी रंगविलेले, आघात सहन करण्यामुळे खंडित आणि भंग झालेले व्यक्तिमत्त्व खूपच प्रभावीपणे रंगविले आहे.

१४ ऑगस्ट ४७ ला जेव्हा भारताची फाळणी होते, तेव्हाचा प्रसंग या चित्रपटात खूप प्रभावीपणे रेखाटला आहे. हा नौखालीचा प्रसंग आहे. गुलाम नावाचा लीगचा नेता रात्री १२ वाजता लोकांना उद्देशून म्हणतो- 'पार्टिशन अभी हुआ नहीं है, पार्टिशन अभी शुरू हुआ है.' मुळातून पाकिस्तान निर्मितीमागे जी तत्त्वे, जी विचार प्रणाली होती, त्याची पाळेमुळे अजूनही भारतात पसरली आहे, फोफावत आहेत, हा संदेश 'बंगाल फाईल्स' देतो म्हणूनच पश्चिम बंगालमध्ये या चित्रपटाच्या प्रदर्शनावर अजूनही बंदी आहे. बंधने आहेत.

सामान्य जनतेच्या विस्मृतीत गेलेला इतिहास, यातनांची मालिका आणि त्याच्या वेदना त्याचा दाहक अनुभव बंगाल फाईल नवीन पिढीला अनुभवण्यासाठी दिला आहे, हे बंगाल फाईलचे मोठेच योगदान म्हणावे लागेल.

## दुर्ग जिज्ञासा


प्राची श्रीकांत पालकर
९८२३०४९१९८



# भास्करगड

नाशिक जिल्ह्यातील सेलबारी-डोलबारी, अजंठा-सातमाळ आणि त्र्यंबक डोंगररांगेत अनेक दुर्गम दुर्ग वसलेले आहेत. नाशिकच्या पूर्वेकडे पसरलेल्या त्र्यंबक डोंगररांगेतील भास्करगड हरिहर किल्ल्याचा शेजारी दुर्ग आहे. पूर्वी डहाणू-सोपारा बंदरातून नाशिककडे येणाऱ्या व्यापारी मार्गाचे संरक्षण करण्यासाठी या मार्गावर दुर्गबांधणी करण्यात आली. गोंडा घाटावर लक्ष ठेवण्यासाठी हरिहर आणि भास्करगड अत्यंत उपयुक्त किल्ले होते. निरगुडपाडा हे भास्करगडाच्या पायथ्याचे गाव आहे. हरिहर किल्ल्यावर जायला याच गावातून वाट आहे. नाशिकवरून त्र्यंबकेश्वरला जाताना प्रयागतीर्थ तलावासमोरून जाणारा रस्ता घोटी गावात जातो. घोटी येथून निरगुडपाडा येथे जाण्यास रस्ता आहे. आपल्याला नाशिकवरून पोहोचण्यास साधारण साडेतीन तास लागतात. मुक्कामाची गरज पडल्यास गावात राहण्याची आणि जेवणाची सोय होऊ शकते. भास्करगडाला बसगड असेही म्हणतात, किल्ल्याची उंची साधारण ३३५० फूट असून किल्ला गिरीदुर्ग प्रकारात मोडतो.

निरगुडपाडा गावात पोहोचलात की, सरळ जाणारी वाट हरिहर किल्ल्यावर जाते आणि गावातून डाव्या बाजूची वाट भास्करगडावर जाते. हरिहर आणि भास्करगड किल्ल्याच्या मध्ये नागाच्या फणीसारखा दिसणारा फणी डोंगर आहे. गावातून चालत निघाल्यावर संपूर्ण डोंगराला वळसा घालून तास-दीड तास चालल्यावर आपण गडाच्या पायथ्याशी पोहोचतो. हरिहर किल्ल्यावर जशी पर्यटकांची गर्दी होते तशी गर्दी भास्करगडावर नसते. गावातून स्थानिक व्यक्ती साथीला घेतल्यास आपली वाट सोपी होते. फणीचा डोंगर आणि भास्करगड याच्या मधल्या खिंडीतील सोंडेवरून चढायला सुरू करून किल्ल्याचे पहिले पठार गाठावे. पठारावरून आपण डावीकडील वाट पकडावी. साधारण तासाभरात आपण एका छोट्या डोंगर सपाटीवर पोहोचतो. येथून समोर पाहिल्यास, एक उद्ध्वस्त झालेला किल्ल्याचा बुरूज दृष्टिक्षेपात येतो. या पठारावरून गडाला वळसा मारून गेल्यावर एक वाट किल्ल्याकडे जाते. येथून पुढे चालत गेलात तर आपण भास्करगडाच्या पायऱ्यांजवळ पोहोचतो.



दोन अजस्त्र कातळभिंतीच्या मधील कातळ कोरीव पायऱ्यांची वाट आपल्याला किल्ल्याच्या पश्चिम दरवाज्याजवळ घेऊन जाते. कातळात खोदलेल्या पायऱ्या पाहून त्यावेळी किल्ल्याच्या बांधकामासाठी किती मेहनत करीत हे दिसून येते. उंच दुर्गम डोंगरावर बांधलेले किल्ले, सह्याद्रीतील रौद्र कातळकड्यांचा सुयोग्य वापर, इतक्या उंचीवर केलेले बांधकाम सगळंच आज कल्पनेच्या पलीकडले आहे. आता किल्ल्याच्या तटबंदीचे ढासळलेले दगड पायऱ्यांवर आले आहेत. त्यामुळे पायऱ्यांची वाट थोडी सांभाळून सतर्कतेने पार करावी. किल्ल्याचा दरवाजा जमिनीत गाडला गेला असून तो सुस्थितीत नाही. दरवाज्याच्या दोन्ही बाजूला कोरलेली कमळाची फुले मात्र लक्षवेधी आहेत. दरवाजा लहान झाला असल्याने वाकून पार करावा लागतो. आत गेल्यावर पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. येथे वरती चढायला थोड्या पायऱ्या आहेत, त्या चढून सपाट भागावर पोहोचावे. उजव्या बाजूची पायवाट आपल्याला किल्ल्याच्या प्रशस्त पठारावर घेऊन जाते.

पूर्व-पश्चिम पसरलेल्या भास्करगडाचा प्रशस्त विस्तार असला, तरी आता गडमाथ्यावर सर्वत्र दगड विखुरलेले असून काही वास्तूंचे अवशेष फक्त शिल्लक आहेत. गडमाथा बेसॉल्ट खडकापासून बनलेला आहे. कातळातील सर्पिलाकार पायऱ्या हे गडाचे मुख्य आकर्षण आहे. इतर किल्ल्यांसारखी भास्करगडावर पाण्याची टाकी आहेत. मंदिराचे अवशेष शिल्लक आहेत. गडावरील वास्तूंचे अवशेष आणि पाण्याची व्यवस्था पाहिल्यावर लक्षात येते की, भास्करगडावर पूर्वी मोठी वस्ती असावी. समोर एका मोठ्या वास्तूचे अवशेष दिसतात. हा किल्लेदाराचा वाडा असावा, किल्लेदाराच्या वाड्याचे अवशेष पाहून पुढे गेल्यावर एक तलाव दिसतो. तलावाच्या आतील खडकात एक टाके खोदले आहे. तलावाच्या काठावर हनुमान मंदिर आहे. मंदिरात शेंदूर लावलेली हनुमानाची मूर्ती आहे. पठाराच्या काठावर दगडांची तटबंदी बांधलेली आहे. येथून पुढे चालत आपण उतवडच्या डोंगरासमोर असलेल्या किल्ल्याच्या दुसऱ्या टोकावर पोहोचतो. उंचीवरून आजूबाजूच्या प्रदेशाचे अप्रतिम दृश्य दिसते. आजूबाजूचा परिसर पाहून, गडावरील आल्हाददायक वाऱ्यात थोडी विश्रांती घेऊन झाली की, आलो त्या दिशेला परत फिरावे. परतीच्या वाटेत एक समाधी तसेच खडकात खोदलेले टाके दिसते. टाक्याच्या जवळही काही भग्न वास्तूंचे अवशेष आहेत. गडमाथ्यावरून उतवड आणि फणीचा डोंगर, हरिहर किल्ला, त्र्यंबकगड, अंजनेरी, ब्रह्माडोंगर अप्रतिम दिसतात.

भास्करगड हा सातवाहन काळात बांधला गेला. किल्ल्यावर पूर्वी देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. त्यानंतर किल्ल्यावर बहमणी राजवट आली. बहमणी सत्तेचा अंत झाल्यावर किल्ला निजामशाहीत सामील झाला. सन १६३६ मध्ये शहाजीराजांनी नव्याने निजामशाहीची घडी बसवताना त्र्यंबकगड आणि हरिहर सोबत भास्करगडही जिंकून घेतला. मात्र, पुन्हा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. मोरोपंत पिंगळे यांनी नाशिक प्रांत स्वराज्यात सामील करून घेताना भास्करगडदेखील जिंकला. व्यापारी मार्गावर असल्याने मोगलांचे लक्ष या प्रदेशातील किल्ल्यांवर होते. त्यामुळे फार काळ किल्ला मराठ्यांच्या ताब्यात राहिला नाही. पुढे पुन्हा मोगलांची सत्ता किल्ल्यावर आली. सन १७३० मध्ये कोळ्यांनी बंड केले आणि किल्ला जिंकला. त्यानंतरच्या काळात किल्ला पेशव्यांनी सांभाळला. ब्रिटिश सत्ता आल्यावर त्यांनी सन १८१८ मध्ये या प्रदेशातील किल्ले ताब्यात घेतले. ब्रिटिशकाळात किल्ल्याची देखभाल नीट न झाल्यामुळे गडकिल्ल्यांचे खूप नुकसान झाले.

हरिहर, भास्करगड आणि या परिसरातील अनेक किल्ले चढणे साहसी कार्य आहे. साहसी पर्यटन सध्या सर्वांच्या आवडीचा विषय झाला आहे. आपली क्षमता सिद्ध करावी, काहीतरी वेगळे करून दाखवावे, असे वाटणे चुकीचे नाही. मात्र माणसाची साहसाची ही नैसर्गिक वृत्ती सध्या चुकीच्या मार्गावर चालली आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा दुर्गम आहेत. येथील अजस्त्र कातळकडे सर करणे हे एक आव्हान आहे. सध्या किल्ल्यांवर घडणाऱ्या घटना बघता दुर्गमतेची जाणीव नष्ट होते आहे. महाराष्ट्रात गिर्यारोहण चळवळीला फार मोठा इतिहास आहे. किल्ले या चळवळीचा मुख्य आधारस्तंभ आहेत. महाराष्ट्राच्या मातीत अनेक अनुभवी गिर्यारोहक घडले. त्यांनी या क्षेत्राला नावलौकिक प्राप्त करून दिले. सुरक्षित गिर्यारोहण करणे अत्यंत महत्त्वाचे असते, त्यासाठी डोंगररांगांकडे सन्मानाने पाहणे शिकायला हवे. ज्यावेळी या दुर्गम डोंगरांशी आपले ऋणानुबंध जुळतात त्यावेळी त्यांच्यावर पाऊल ठेवताना मनात आदरभाव असतो. मग याच डोंगररांगा आपल्याला त्यांच्या अंगाखांद्यावर चढण्यासाठी बळ देतात. साहसी वृत्ती जोपासताना राष्ट्राभिमान मनात जागृत असणे आवश्यक आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी आपल्याला पहिले इतिहास जगता यायला हवा. प्रत्येक प्रदेशाचे आपले असे एक महत्त्व आहे. प्रत्येक किल्ल्याचा एक इतिहास आहे. भटकंती करताना जेथे जातो आहोत तेथे घडलेल्या घटना, महत्त्वाच्या घडामोडींची माहिती घेण्याचा प्रयत्न जरूर करायला हवा. गडकिल्ले हे आपले मानबिंदू आहेत त्यांना जपणे आपले कर्तव्य आहे.

नाशिक परिसरातील हरिहर, भास्करगड आणि इतर काही किल्ले पाहायचे असल्यास सोबतीला अनुभवी गिर्यारोहक असावा. अनेक वर्षांपासून गिर्यारोहण क्षेत्रात नावाजलेल्या काही संस्था विशेष मोहिमा आखतात. ऑनलाईन माहितीवर पूर्णतः विश्वास न ठेवता, आपण नीट पडताळणी करून सुयोग्य समूह निवडावा. दुर्गम किल्ल्यांवर जाताना सोबत प्रस्तरारोहण साहित्य असणे आवश्यक असते; नुसतं साहित्य असून फायदा नसतो तर अडचणीच्या वेळी त्याचा योग्य वापर करता यायला हवा. त्यामुळे साहसी पर्यटन करा मात्र ते सुरक्षित असावे, ही काळजी घ्या. आपण सर्वांनी निसर्गात मुक्त फिरताना, निसर्गाचा आनंद घेताना प्रथम त्याचा आदर करायला शिकावे. निसर्गावर, पर्यावरणावर प्रेम करणे हे आपले कर्तव्यच आहे.

## मुक्तचित्र

डॉ. संतोष पाठारे
९८२०३७४०९३

# चित्रपट रसास्वाद; काळाची गरज



काही दिवसांपूर्वी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात 'चित्रपटाचे सौंदर्य आणि रसास्वाद' या विषयावर व्याख्यान द्यायला गेलो होतो. तिथे चित्रपट निर्मितीचा पदवी अभ्यासक्रम शिकणारे अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून आले होते. त्यांची या माध्यमाबद्दल असलेले समज तसेच ते सविस्तर जाणून घेण्याची इच्छाशक्ती पाहून मी अचंबित झालो. चित्रपट निर्मितीच्या विविध सर्जनशील आणि तांत्रिक अंगांचे प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रात काम करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा तिथल्या प्रत्येक विद्यार्त्याच्या मनात मला दिसली. या विद्यार्त्यांना भविष्यात चित्रपट निर्माण करण्याची संधी मिळाली तर ते नक्कीच चांगल्या कलाकृती निर्माण करू शकतील, याची खात्री पटली. चित्रपट कलेचा अभ्यास करताना त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टी विस्तारित असल्याचा प्रत्ययही आला. चित्रपट तुम्हाला तुमच्या मर्यादित सांस्कृतिक अवकाशाच्या पलीकडे नेतो, विविध व्यक्तिरेखांच्या अंतरंगात डोकावण्याची संधी देतो आणि वैचारिकदृष्ट्या अधिक प्रगल्भ बनवतो, याची जाणीव या विद्यार्थ्यांसोबत चर्चा करताना झाली.

आमच्या चित्रपट रसास्वादाच्या चर्चेत मी विद्यार्थ्यांना नुकताच प्रदर्शित झालेला 'साबर बोंड' चित्रपट पहा, असं सांगितलं होतं. दोन दिवसांपूर्वी मला त्यापैकी एका विद्यार्थ्याचा फोन आला. त्याने मी सुचवला होता म्हणून 'साबर बोंड' थिएटरला जाऊन पाहिला. तो पाहून आल्यानंतर त्याने व्यक्त दिलेली प्रतिक्रिया मला फार महत्त्वाची वाटली. 'साबर बोंड'मध्ये केंद्रस्थानी असलेला 'दोन पुरुषांमधील प्रेमसंबंध' हा विषय आपल्या समाजात निषिद्धच आहे. अनेक जण अशा संबंधाकडे विकृती, अनैसर्गिक शरीर संबंध म्हणूनच पाहतात. या विद्यार्थ्याची सामाजिक जडणघडण जिथे झाली तिथे समलिंगी संबंधाबद्दल उघडपणे बोलले जात नाही किंवा सहानुभूतीने पाहिले जात नाही. या विद्यार्थ्याच्या मनात त्याच प्रकारच्या भावना चित्रपट पाहण्याआधी होत्या, हे त्याने मान्य केले. मात्र, आम्ही केलेल्या चित्रपट रसास्वादाच्या चर्चेमुळे, चित्रपटातील पात्र समजून घेताना समाजातील या घटकाकडे सहानुभावाने बघण्याची नजर तयार केली, असा प्रांजळ कबुलीजबाब त्याने दिला. चित्रपटाचा आशय आणि त्याला सकस करणारी प्रभावी तांत्रिक अंगे यांचा एकत्रित विचार केल्याने चित्रपट मनाला भिडला, अशी प्रतिक्रियाही व्यक्त केली. चित्रपट कसा पाहावा, याचे प्रशिक्षण घेतले तर एखाद्या अनवट विषयावरील चित्रपट समजून घेण्याची नजर तयार होते, हे या घटनेने सिद्ध केले.

'कोर्ट', 'कौल', 'डीसायपल' आणि आता 'साबर बोंड' हे जागतिक पातळीवर गौरविले गेलेले मराठी चित्रपट आपल्या प्रेक्षकांना कंटाळवाणे वाटतात, ते समजत नाहीत याचे मूळ आपण ते समजून घेण्यासाठी आवश्यक असणारी नजर आपण तयार करत नाही, यात आहे. एखादा चित्रपट आपल्याला आवडू शकतो, नावडू शकतो. पण तो आपल्याला का आवडला किंवा का नाही आवडला, याचं विश्लेषण प्रेक्षकाला करता यायला हवं. चित्रपटात दिग्दर्शकाने मांडलेली सौंदर्यस्थळे टिपता यायला हवीत. चित्रपटातील दृश्यरचना, कथनशैली, रंगसंगती, वेशभूषा, व्यक्तिरेखा यांच्यातील परस्पर संबंध आणि त्यातून निर्माण होणारे सौंदर्य यांचा आस्वाद घेता यायला हवा. चित्रपट रसास्वाद शिबिरे, कार्यशाळा, व्याख्याने यातून हे साधता येतं.

पुण्यात १९६२ साली 'एफटीआयआय'ची स्थापना झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी चित्रपट निर्मितीचे प्रशिक्षण घेण्याच्या बरोबरीने जगभरातील दिग्गज दिग्दर्शकांचे चित्रपट समजून घ्यावेत, त्यांचे रसग्रहण करावे यासाठी चित्रपट रसास्वाद हा विषय अभ्यासक्रमात घेण्यात आला. प्रा. सतीश बहादूर यांनी चित्रपट रसास्वादाचा अभ्यासक्रम तयार केला. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे माजी संचालक पी. के. नायर, चित्रपट अभ्यासक डॉ. श्यामला वनारसे यांचे सहकार्य या अभ्यासक्रमाला लाभलं. 'एफटीआयआय'मध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीनेच चित्रपट माध्यम समजून घेण्याची इच्छा असणाऱ्या अभ्यासू प्रेक्षकांसाठी देखील हा अभ्यासक्रम खुला करण्यात आला. प्रा. सतीश बहादूर आणि डॉ. श्यामला वनारसे यांनी या अभ्यासक्रमावर आधारित टिपणं काढली. त्या टिपणांवर आधारित पुस्तके प्रकाशित केली तसेच चित्रफितीदेखील तयार केल्या. चित्रपट समजून घेण्यासाठी या पुस्तकांचा आणि चित्रफितींचा अभ्यासकांना खूप फायदा होत आहे.

गेली अनेक वर्षे 'एफटीआयआय'च्या संकुलात महिनाभराची चित्रपट रसास्वाद कार्यशाळा आयोजित केली जाते. भारतभरातून अनेक इच्छुक प्रेक्षक प्रवेशिका भरतात. त्यातील निवडक प्रतिनिधींची निवड केली जाते. अभिजात आणि समकालीन प्रादेशिक-जागतिक चित्रपटांचे प्रदर्शन, त्यांचे विश्लेषण, समकालीन दिग्दर्शकासोबत चर्चा आणि चित्रपट आस्वादाची मूलतत्त्वे हा या कार्यशाळेचा गाभा असतो. संकल्पना, कथा, पटकथा, कथनशैली, प्रकाशचित्रण, ध्वनी, रंग या घटकांचा प्रेक्षकांच्या आस्वाद क्षमतेशी असलेला संबंध याचा ऊहापोह करणारी तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने कार्यशाळेत अंतर्भूत केलेली असतात. मे-जून-जुलै महिन्यामध्ये होणारी ही कार्यशाळा इंग्रजीतून घेतली जाते तसेच याचा कालावधी महिनाभराचा असल्याने अनेकांना तितका वेळ देणे शक्य होत नाही. याला पर्याय म्हणून 'फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया' या फिल्म सोसायटी चळवळीच्या शिखर संस्थेतर्फे अनेक राज्यांमध्ये मर्यादित कालावधींच्या प्रादेशिक भाषेतील चित्रपट रसास्वाद कार्यशाळा आता आयोजित केल्या जात आहेत. पुण्यामध्ये गेली १५ वर्षे अशी कार्यशाळा मराठी भाषेतून आयोजित केली जाते; ज्यामध्ये दरवर्षी राज्यभरातले साधारण १०० रसिक प्रेक्षक सहभागी होतात.

पूर्वी केवळ चित्रपट क्षेत्राशी निगडित कलावंत, तंत्रज्ञ आणि समीक्षक यांना चित्रपट रसास्वाद कार्यशाळांमध्ये सहभागी होण्याची इच्छा होत असे. आता मात्र सर्वसामान्य प्रेक्षक या कार्यशाळांना प्रतिसाद देताना दिसतात. जागतिकीकरणामुळे चित्रपट माध्यमाबद्दल वाढलेली जाणीव आणि हे माध्यम समजून घेण्याची वाटणारी निकड यामुळे प्रेक्षक रसास्वाद शिबिर/कार्यशाळांना उपस्थित राहण्यास उत्सुक असतात. दूरचित्रवाणी, ओटीटी यामुळे असंख्य चित्रपट आपल्याला उपलब्ध होत आहेत. या चित्रपटांचा दर्जा, ते निर्माण करण्यामागील त्या दिग्दर्शकाची प्रेरणा जाणून घेण्यासाठी रसास्वाद शिबिर मार्गदर्शक ठरते.

आपण लहानपणापासून चित्रपट पाहात असतो, पण आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनलेला नेमका चित्रपट कसा पाहायचा, त्याचा आस्वाद कसा घ्यायचा, याचं शिक्षण मात्र आपल्या शालेय पद्धतीत अजूनही समाविष्ट केलं गेलेलं नाही. शालेय जीवनापासूनच सुजाण प्रेक्षक घडवण्यासाठी चित्रपट रसास्वादाचा अभ्यासक्रम शालेय शिक्षणात समाविष्ट करणे ही काळाची गरज आहे. चित्रपट रसास्वाद कार्यशाळा ही गरज थोड्या फार प्रमाणावर पूर्ण करीत आहेत. त्यांची व्याप्ती वाढली तरच आपल्याकडे सुजाण प्रेक्षक निर्माण होईल आणि पर्यायाने त्याच्या अभिरुचीला साजेसे दर्जेदार चित्रपट निर्माण होतील.

*(लेखक प्रसिद्ध चित्रपट समीक्षक आहेत.)*